म. ग्रं. सं. ठाणे
विषय निबंध
सं. क्र. १४३७
१४३७

# तुकारामांचे निवडक १०० अभंग

REFBK-0012321

৩৩৫৬৮
[illegible]
১১৩৮
১৫/১১/৮২

# तुकारामांचे
# निवडक अभंग

तुकारामांच्या निवडक १०० अभंगांचें सार्थ, सटीप विवेचन

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ... ३३.९३२ ... दि: २८।११।८५
क्रमांक ... १२३२१ ... नों. दि. २८।११।८५

सपादक
डॉ. श्री. म. पिंगे
एम्. ए., पीएच्. डी.
प्रा. गजमल माळी, एम्. ए.
(चॅन्सेलर्स गोल्ड मेडॅलिस्ट)

९२३२१

मूल्य रु. २-००

REFBK-0012321

व्हीनस प्रकाशन : पुणें.

आवृत्ति पहिली
जुलै १९६२

सर्व हक्क प्रकाशकाधीन

प्रकाशक :
स. कृ. जोशी
व्हीनस प्रकाशन
३१० शनिवार पेठ : पुणे २

मुद्रक :
के. पी. राजभोज
समता प्रिंटिंग प्रेस
३०७ घोरपडे पेठ, पुणे २

## संपादकांचें निवेदन—

तुकारामांच्या अभंगांचें वाङ्मयीन मूल्यमापन प्रा. वा. ल. कुलकर्णी यांच्या लेखनाचा अपवाद सोडल्यास अजूनहि झालेलें नाही. मराठी कवितेंत तुकारामाच्या कवितेला अनन्यसाधारण स्थान आहे. त्यांची कविता आजच्या कवितेच्या संदर्भात अनेक नवे प्रश्न उपस्थित करते. साहित्यविषयक विचाराला गति देण्याचें सामर्थ्य या कवितेंत आहे. तुकारामांच्या कवितेतील अनुभवांची [illegible] तर विलक्षण अमोघ आहे. मराठवाडा विद्यापीठानें निवडलेल्या १०१ अभंगांचें या दृष्टीनें संपादन केलें आहे. अभंग, अर्थ आणि विवेचन असा क्रम पाळला आहे. अभंगाचें विवेचन करतांना वाङ्मयीन सौंदर्य स्पष्ट करण्यावर लक्ष केंद्रित केलें आहे. तुकारामांच्या अभंगांचा परिचय व्हावा व [illegible] [illegible] त्यांची [illegible] [illegible] विवेचनांत उपयोग केला आहे. सामान्य वाचकासहि कवितेंतील सौंदर्य आकलन व्हावें, याकरिता विवेचन सुलभ, सोपें केलें आहे. सर्व दृष्टींनी पुस्तक उपयुक्त ठरावें असा हा अल्प प्रयत्न आहे. आमचे मित्र प्रा. रामदास डांगे यांनी आम्हांला भरपूर साहाय्य केलें. त्यांच्या मदतीवाचून हा ग्रंथ इतक्या अल्प काळांत पूर्ण होऊं शकला नसता. पूर्व परिचय नसतांहि आमचें पुस्तक प्रकाशित करण्याचें कार्य श्री. स. के. [illegible] यांनी स्वीकारलें व नंतर जो जिव्हाळा दाखविला त्याबद्दल आम्ही त्यांचे आभारी आहोत.

मिलिंद महाविद्यालय, | —श्री. स. [illegible]
औरंगाबाद १५-६-६२ | —गजमल माळी

................ ता. ........ १२५ ............ १९८८

# तुकाराम

## (शके १५२० ते १५७१)

### प्रास्ताविक

**चरित्र**

तुकारामांचा जन्म देहू येथे इ. स. १५९८ (शके १५२०) मध्ये झाला. तुकाराम हे शूद्र वंशांतील असून त्यांनी वैश्यव्यवसाय केला. आपल्या जातकुळीसंबंधी तुकोबांनी स्वतःच कांही माहिती दिली आहे. "याती शूद्र वैश्य केला वेवसाव." आपण कुणबी आहोंत, हेंहि तुकोबांनी "बरा कुणबी केलो। नाही तरि दंभेचि असतों मेलों" या अभंगांत सांगितलें आहे.

तुकोबांचें कुळ मोऱ्याचें व त्यांचें आडनांव आंबिले हें होतें. तुकोबांचें घराणें चांगलें प्रतिष्ठित व सधन होतें. देहू या गावची महाजनकी या घराण्याकडे वंशपरंपरेने चालत आलेली होती. तुकारामांच्या घराण्यांत विठ्ठलभक्ति आणि पंढरपूरची वारी त्यांच्या आठव्या पूर्वजापासून–विश्वंभरबाबापासून–चालू होती. तुकारामांच्या वडिलांचें नांव बोल्होबा व आईचें कनकाई. यांना तीन मुलगे झाले. थोरला सावजी, मधला तुकाराम व धाकटा कान्होबा. तुकोबांचे मातापिता विठ्ठलभक्त असून, हीच विठ्ठलभक्ति पुढे तुकारामांत उतरली. मातापित्याच्या प्रेमळ छत्राखाली तुकोबांचीं पहिलीं तेरा वर्षें अतिशय सुखासमाधानांत गेलीं. लहानपणीं चेंडू, टिपरी, हमामा इत्यादि खेळ ते खेळत असत. तुकोबांचीं दोन लग्नें झालीं वयाच्या सतराव्या वर्षापर्यंत त्यांनी उत्तम रीतीने संसार केला. पुढे मात्र दैवाचे फासे उलटे पडले आणि त्यांच्यावर संकटामागून संकटें येऊं लागलीं. सतराव्या वर्षीं त्यांच्या आईवडिलांचा मृत्यु झाला व तुकारामांचा मोठा भाऊ सावजी हा विरक्त होऊन तीर्थाटणास गेला. त्याच काळांत मोठा दुष्काळ पडून त्यांची पहिली बायको रखमाबाई व त्यांचा मुलगा संतु हीं दोघेंहि अगदी अन्नान्नदशा होऊन मरण पावलीं. त्यांतच भर म्हणून भरभराटींत असलेला तुकोबांचा व्यापारहि बुडाला !

... ग्रंथ संग्रहालय ठाणे
(अ. क्र. / ...)

तुकोबांची दुसरी बायको जिजाई ही अतिशय तापट होती. तिच्यापासून तुकोबांस सुख तर मिळालें नाहीच, पण त्यांची समाजांत अवहेलना मात्र झाली. याप्रमाणे संसारतापाने तापलेले तुकोबा संसाराकडे पाठ फिरवून देवाकडे वळले. ते देहूजवळच्या भामाईच्या डोंगरावर जाऊन परमेश्वराच्या चरणीं आपल्या चित्तवृत्ति वाहून एकांतीचें सुख अनुभवूं लागले. या एकांतवासांत वृक्षवेली हींच त्यांचीं सोयरीं झालीं व आपल्याशींच आपण संवाद करण्याचें सुख ते अनुभवूं लागले. यामुळे तुकोबांना हा एकांतवास आवडूं लागला. याविषयी तुकोबा एका अभंगांत म्हणतात, "वृक्षवल्ली आम्हां सोयरीं वनचरें। पक्षी ही सुस्वरें आळविती॥ येणें सुखें रुचे एकांताचा वास। नाहीं गुणदोष अंगा येत॥" या एकांतवासांत तुकोबांचें मन शांत झालें व परमेश्वराच्या नामसंकीर्तनानं हरिनामाने ते सुखाची गोडी चाखूं लागले. जणूं काय मनाने ते हरिनामवेलीवर पक्षिराज झाले व भक्तिरसाची गोडी अनुभवूं लागले. याविषयी ते म्हणतात, 'हरिनामवेली पावली विस्तार। फळीं पुष्पीं भार बोल्हावली॥ तेथे माझ्या मना होई पक्षिराज। साधावया काज तृप्तीचें या॥"

अशा स्थितींत तुकोबांवर गुरुकृपा झाली. शके १५४१ च्या माघ शुद्ध १० स गुरुवारीं स्वप्नात तुकोबांस गुरूपदेश झाला. राघवचैतन्य व केशवचैतन्य यांच्या मालिकेंतील बाबाजी नामक सत्पुरुषाने तुकोबांस स्वप्नदर्शन दिलें व रामकृष्ण हरि हा मंत्र सांगितला. याविषयी ' सद्गुरुरायें कृपा मज केली, परी नाही घडली सेवा कांही॥ सांपडविलें वाटे जातां गंगास्नाना। मस्तकीं तो जाणा ठेविला कर॥" हा तुकोबांचा अभंग प्रसिद्धच आहे.

गुरूपदेश झाल्यानतर तुकारामांस कवित्वाची स्फूर्ति झाली आणि कीर्तन करीत असतांनाच त्यांच्या तोंडून काव्यसरितेचा ओघ अभंगरूपाने वाहूं लागला. त्यांचें हें प्रसन्न कवित्व रामेश्वरभट या विद्वानास पाहवेना व त्याने तुकोबांचा छळ केला. या प्रसंगीं ' कायी खावें आता, कोणीकडे जावें। गावांत राहावें कोण्या बळें॥ कोपला पाटील, गावचे हे लोक। आता घाली भीक कोण मज ' अशी तुकोबांची स्थिति झाली. त्यांनी लोकांच्या समाधानासाठी आपल्या अभंगांच्या वह्या इंद्रायणी नदींत बुडविल्या व तेरा दिवस कडक उपवास केला. त्यांच्या या साधनेला फळ आलें. परमेश्वराने त्यांच्या वह्या

तारल्या व त्यांना देवदर्शन घडलें. यानंतर तुकोबांस होत असलेला विरोध थांबला व त्यांचें सर्व जीवन आनंदमय होऊन गेलें.

यापुढे तुकोबा आपला सारा वेळ भजन–कीर्तनांत घालवूं लागले. तुकारामांची वृत्ति अंतर्मुख बनल्याने त्यांची विलक्षण तळमळ झाली. स्त्रीचें लक्ष डोक्यावर असलेल्या घागरीकडे असतें तसें तुकोबांचें लक्ष परमेश्वराच्या चरणांकडे लागलें. मासोळीला पाण्यावेगळें केल्यानंतर ती जशी तडफडते किंवा गर्दीत आईपासून चुकलेलें मूल जसें भिरभिरत्या नजरेने आईचा शोध घेत असतें तसें परमेश्वराचें दर्शन न झाल्यामुळे तुकोबांचें मन तळमळूं लागलें. परमेश्वराची वाट पाहतांना त्यांचे डोळे शिणले. ‘ तूं कृपाळू माउली आम्हां दिनांची साउली ’ असें म्हणून तुकोबा देवाला आळवूं लागले आणि ‘ माउलीहून मवाळ, चंद्राहून शीतळ ’ अशा परमेश्वराला अपराधाची क्षमा करण्याबद्दल विनवूं लागले. देवाची इतकी विनवणी करूनहि देव भेटत नाही हें पाहिल्यानंतर तुकाराम बोलभांड झाले व निलाजरा, भारवाही म्हणून देवास बोल लावण्यासहि त्यांनी कमी केलें नाही. ‘ आम्ही पापी तूं पावन। हें तों पूर्वापार जाण ’ अशी प्रांजल कबुलीहि त्यांनी दिली व ‘ वादें मारी हाका। देवा आइकवी तुका ’ अशा स्थितींत तुकाराम आले.

अशा स्थितींत तुकारामांस देवाचें दर्शन घडून आत्मसाक्षात्कार झाला. सारें जग सच्चिदानंदामुळे प्रकाशित झालेलें व अज्ञानरूपी अंधार नाहीसा झालेला त्यांच्या अनुभवास आला. हा अनुभव तुकारामांनी पुढील अभंगांत सांगितला आहे. ‘ धवळलें जगदाकार। आंधार तो निरसला ।। लपों जातां नाही ठाव। प्रगट पाहे पसारा। ’ वृत्तींतील चंचलता नाहीशी झाली, प्राणाचें कार्य बंद पडलें इतकी एकतानता झाली, त्यांचें अंतरंग ब्रह्मानंदाने शांत झाल्यामुळे प्रपंचादि बाह्य उपाधी या विठ्ठलरूप दिसूं लागल्या. हा अनुभव ‘ तुका म्हणे बाह्यरंग तो विठ्ठल। अंतर निवालें ब्रह्मरसें ।। ’ या शब्दांत तुकारामांनी वर्णन केला आहे. आत्मसाक्षात्काराचीं सर्व चिन्हें त्यांच्या अंगीं उमटलीं व त्यांचा देह आंतबाहेर विठ्ठलाने भरून गेला. आपलें मरण त्यांनी आपल्या डोळ्यांनी पाहिलें. हा अनुपम सोहळा त्यांनी पाहिला. अहंकार नाहीसा झाल्यामुळे सर्वात्मक स्थितीचा त्यांना अनुभव आला. हा अनुभव तुकोबांनी ‘ आपुलें मरण पाहिलें म्यां डोळां। तो जाला सोहळा अनुपम्य ।।

आनंदें दाटलीं तिन्हीं त्रिभुवनें। सर्वात्मपणें भोग जाला ॥' या अभंगांत उत्कृष्टपणें सांगितला आहे. सारांश, परमार्थाची अवघड चढण चढत चढत व टाकीचे घाव सोशीत तुकाराम परब्रह्मपदीं जाऊन पोहोचले.

## चरित्रांतील कांही महत्त्वाचे प्रसंग

आतापर्यंत तुकारामांच्या चरित्राचा जो आढावा घेतला, त्यांत सामान्य माणसाचा साक्षात्कारी संत कसा झाला हेंच यांत आपण पाहिलें. तुकाराम-मांच्या चरित्रांतील हाच महत्त्वाचा भाग होय. याशिवाय तुकोबांच्या चरित्रांत गुरुपरंपरा, शिवसमर्थ भेट व सदेह वैकुंठगमन हे प्रसंग महत्त्वाचे आहेत. तसेंच तुकारामांचा जन्म व निर्याण शक विवाद्य होऊन बसले आहेत. या सर्व विषयांचा परामर्श या ठिकाणीं घेण्यांत येणार आहे.

### जन्म व निर्याण शक

वाई प्रांतांत सापडलेल्या एका वंशावळीवरून राजवाडे यांनी तुकारामांचा जन्मशक १४९० असा मानला आहे. व हा जन्मशक मानून त्यांचें आयुर्मान ८१ वर्षांचें होतें असें ते म्हणतात. तुकोबांच्या अंतकाळीं त्यांची बायको गरोदर होती व त्यांचा धाकटा मुलगा नारायण हा त्यांच्या पश्चात् जन्मला ही गोष्ट ध्यानांत आणल्यास राजवाडे यांचें मत चुकीचें ठरतें. कविचरित्रकार जनार्दन रामचंद्रजी यांनी सरंजामी जंत्रीच्या आधारें तुका-रामांचा जन्मशक १५१० हा ठरविला आहे, पण हेंहि मत निराधार आहे. कै. पांगारकर यांनी तुकारामांचा जन्म १५३० हा ठरविला आहे. त्यांनी महिपतीच्या 'पूर्वार्ध संपले येणें रीतीं' या अभंगाचा आधार आपल्या मता-साठी घेतला आहे. महिपतीने तुकारामांचा २१ व्या वर्षापर्यंत आयुष्यक्रम देऊन 'पूर्वार्ध संपलें येणें रीती' असें म्हटलें आहे. यावरून तुकारामांची हयात ४२ वर्षाची असून त्यांचा जन्मशक १५३० असावा असें पांगारकरांचें म्हणणें आहे. कै. लाड यांनीहि तुकारामाचा जन्मशक हाच मानला आहे; पण 'पूर्वार्ध' हा शब्द काटेकोरपणें वापरून तुकोबांच्या आयुष्याचे पूर्वार्ध व उत्तरार्ध असे दोन भाग पाडण्याचा महिपतीचा विचार नसावा. त्यामुळे हाहि जन्मशक अग्राह्य ठरतो.

तुकारामांच्या जन्मकालाबद्दल चौथें मत भारदे यांचें असून त्यांनी देहू येथील तुकारामांच्या वंशावळीच्या आधारें हा जन्मशक १५२० असा दिला आहे, व सर्व दृष्टींनी तो मान्य होण्यासारखा आहे. हा शक मान्य केल्यास तुकोबांचें जीवनमान ५२ वर्षांचें ठरतें व त्यांनी २१ वर्षें प्रपंच व ३० वर्षें परमार्थ केला असें म्हणणें अगदी श्रेयस्कर ठरतें.

तुकारामांच्या जन्मकालाप्रमाणे त्यांच्या प्रयाणकालासंबंधीहि मतभेद आहेत. तुकारामांचे एक टाळकरी संताजी जगनाडे यांच्या वहींत तुकारामांचा प्रयाणदिवस फाल्गुन वद्य २ सोमवार शक १५७२ हा दिला आहे; तर देहूकरांच्या वहींत हाच काल शक १५७१ हा दिला आहे. राजवाडे यांनी फाल्गुन वद्य २ श. १५७० हा सोमवार येत असल्याने हा प्रयाणशक मानला आहे.

या तीनहि मतांत तुकोबांचें प्रयाण फाल्गुन वद्य २ सोमवारीं झालें या बाबतींत ऐक्य आहे. पण हा योग १५७०–७१–७२ या तीनहि वर्षीं येत नाही, मात्र प्रयाणापूर्वी ५–६ दिवस आधी तुकोबांनी जिजाईस उपदेश केला आहे. हा उपदेश फाल्गुन शुद्ध १२ सोमवारीं केल्याचें दिसतें. असा योग शके १५७१ मध्यें येतो. यावरून तुकोबांचें प्रयाण शके १५७१ त झालें हें म्हणणें बरोबर ठरतें. सारांश, तुकोबांचा जन्मशक १५२० व प्रयाणशक १५७१ हाच ठरतो.

## सदेह वैकुंठगमन

तुकाराम सदेह वैकुंठाला गेले अशी त्यांच्या भक्तमंडळींची दृढ समजूत आहे. त्यांच्या भक्तांनी हें स्वर्गारोहण प्रत्यक्ष घडल्याचें म्हटलें आहे. तुकोबांचे चरित्रकार महिपती यांनी 'तो जगद्‌गुरु तुका वैष्णव भक्त। तई समई होतसे गुप्त' असें म्हटलें आहे. एका कागदपत्रांतहि शके १५७१ सोमवारीं प्रातःकाळीं तुकोबा गुप्त झाले, असा उल्लेख आहे, तर जगनाडे याच्या वहींत ते स्वदेहानिशी गेले असा उल्लेख आहे. या लेखावरून आपणांस कांही गोष्टी स्पष्ट दिसतात.

वृद्धापकाळामुळे पंढरपूरची वारी अशक्य झाल्यावर तुकारामांनी वारकऱ्यांबरोबर पांडुरंगाला निरोप पाठविला व ते उत्तराची वाट पाहत

बसले. अशा स्थितींतच त्यांना पांडुरंगाचें दर्शन झालें. अंतकाळीं विठोबा पावला म्हणून आता या जगाचा व जीवनाचा निरोप घ्यावा असें तुकारामांस वाटूं लागलें. अंतकाळचीं चिन्हें त्यांचीं त्यांनाच दिसूं लागलीं आणि शेवटीं 'पैल हरि आले आहेत, बरोबर गरुडध्वजाचा फडात्कारहि आहे.' आणि 'वैकुंठ श्रीरंग बोलावित आहे' असें म्हणून तुकारामांनी शके १५७१ फाल्गुन वद्य २ स देह ठेविला. ते सदेह वैकुंठाला गेले असें भागवत संप्रदायी मानतात. 'कुडीसहित झाला गुप्त तुका' असें तुकारामांचें स्ववचन आहे. ज्यास गोविंदाचा छंद लागला त्याची कायाहि गोविंदरूपच होते या तुकोबांच्या वचनाप्रमाणे तुकोबा सदेह वैकुंठाला गेले असें म्हणण्याचा परिपाठ पडला असावा असें रानडयांचें मत आहे.

आपण सदेह वैकुंठास जात आहोंत ह्या तुकारामांच्या उद्‌गारांतील तात्त्विक अर्थाकडे फारसें लक्ष न देतां तुकाराम खरोखरच सदेह स्वर्गांत गेले व भक्तांच्या समाधानासाठी त्यांनी टाळ व गोधडी पाठवून दिली असें भावडया भक्तांनी समाधान मानून घेतलें. पण त्यांतल्या त्यांत तर्काला सुसंगत असें अनुमान श्री. हर्षे यांनी काढलें आहे, तें असें:—फाल्गुन वद्य प्रतिपदेस मध्यरात्रींपर्यंत कीर्तन चालूं असतां आणि सर्व श्रोते कीर्तनांत रंगलेले असतांनाच तुकाराम तेथून निघून आसपासच्या अरण्यांत गेले व तेथे एकदोन दिवस राहून नंतर त्यांनी जलसमाधि घेतली. कीर्तनाच्या जागीं तुकारामांची गोधडी व टाळ या वस्तु सापडल्या. मात्र तुकोबांचा देह कोठेहि कोणालाहि मिळाला नाही हें गूढ यांत शिल्लक राहतेंच.

दुसराहि एक तर्क या बाबतींत संभवतो. जगनाडे याच्या वहींत 'ते स्वदेहानसी गेले' असा उल्लेख आहे. याचा अर्थ अंतकाळीं त्यांस कोणी नेलें नाही; ते स्वतः देहानिशीं गेले. तुकोबांनी इंद्रायणीजवळ एक समाधिस्थान बांधविलें होतें व ज्ञानेश्वरांप्रमाणे त्यांनी तींत समाधि घेतली. आंत गेल्यावर दार बंद करून घेतलें. तीन दिवस त्या समाधिमंदिरांत आवाज येत होता. पंचमीचे दिवशीं आवाज राहिला व सर्व शांत झालें. इतकें झाल्यावर तुकोबांचा प्राण गेला, आता थांबण्यांत अर्थ नाही असें समजून मंडळी घरोघर गेली. तात्पर्य, 'तुकोबा सदेह वैकुंठास गेले' याचा उलगडा वरील दोन प्रकारांनी लागतो.

## गुरुपरंपरा

तुकोबांच्या गुरूपदेशाबद्दल मागे उल्लेख करण्यांत आलाच आहे. तुकोबांना हा गुरूपदेश स्वप्नांत ला. तुकोबांना बाबाजी नांवाच्या सत्पुरुषानें उपदेश दिला. हा राघवचैतन्य व केशवचैतन्य या मालिकेंतील पुरुष होता.

तुकारामांच्या गुरुपरंपरेविषयी निरनिराळीं मतें प्रचलित आहेत. राघव, केशव व बाबाजी या तीन निरनिराळ्या व्यक्ति असून तुकारामांस बाबाजी यांनी स्वप्नांत जो उपदेश दिला तो ओतुरास गंगावाटेवर दिला असें बेंद्रे यांचें मत आहे. तर बंगाली चैतन्यप्रभूचा महाराष्ट्राशीं संबंध आला होता व चैतन्यप्रभु प्रत्यक्ष पुण्यास व पंढरपुरास आला होता व त्याने लोकांत नामसंकीर्तनाचें महत्त्व पटवून दिलें असें दिसून येतें. या बंगाली चैतन्यप्रभूचा संबंध तुकारामांशीं आला होता असें मत कै. लाड यांनी मांडलें आहे. या दोन भिन्न मतांमुळे तुकारामांच्या गुरुपरंपरेबद्दल निर्णायक मत देणें कठीण होऊन बसलें आहे.

## तुकाराम-शिवाजी भेट

तुकाराम व शिवाजी यांची भेट एकदाच नव्हे तर दोनतीनदा झाली असावी असें विद्वानांचें मत आहे. त्यांची पहिली भेट पुनवडीस झाली असावी. यावेळीं तुकारामांचें कीर्तन चालू असतांना परचक्र आलें. त्यावेळीं त्यांनी देवाचा धावा केला व शिवाजीला सोडवलें असें भागवत संप्रदायी म्हणतात.

या प्रसंगानंतर कांही दिवसांनी शिवाजीनें तुकारामांना सन्मानपूर्वक बोलावणें पाठविलें. त्यावेळीं तुकारामांनी शिवाजीला जें अभंगात्मक उत्तर लिहिलें तें प्रसिद्धच आहे. पण या पत्रांत शिवाजीच्या अष्टप्रधानांचा उल्लेख असल्याने कांहीजण हे अभंग क्षेपक मानतात. कारण शिवाजीला राज्याभिषेक शके १५९६ मध्ये झाला व तेव्हापासूनच अष्टप्रधानपद्धति प्रचारांत आली, असें त्यांचें मत आहे. पण अलीकडील संशोधनावरून पाहिलें असतां अष्टप्रधानव्यवस्था ही शिवाजीला राज्याभिषेक होण्यापूर्वीपासूनच रूढ होती. त्यामुळे हे अभंग क्षेपक मानण्याचें कांहीच कारण नाही. म्हणून तुकारामांनी वापरलेल्या ‘ चातुर्यसागर सर्वज्ञ राजा ’ इत्यादि विशेषणांवरून व शिवाजी

तुकाराम यांची भेट शके १५७१ च्या ज्येष्ठानंतर लवकरच झाली असली पाहिजे. तुकाराम व शिवाजी यांची ही जी भेट झाली त्यावेळीं तुकारामांचें वय ५१ व शिवाजीचें २१ वर्षांचें होतें.

## तुकारामांची गाथा

तुकारामांस कवित्वस्फूर्ति शके १५४६ त झाली असें मानलें तर तुकारामांनी २५ वर्षे अभंगरचना केली. या अवधींत सुमारें ५ हजार अभंगांची रचना त्यांच्या हातून झाली असावी. नामदेवाच्या ९४ कोटी ४९ लक्ष अभंगांत स्वत:च्या ५ कोटी ५१ लक्ष अभंगांची भर घालून तुकारामांनी शतकोटीची संख्या पूर्ण केली असें महिपती सांगतात, पण या सर्व कवि-कल्पना असून त्यांस तुकारामांच्या वचनांचा अस्सल आधार नाही. तुका-रामांच्या अभंगांची गाथा प्रथम मुंबई सरकारनें सर अलेक्झांडर ग्रांट यांच्या प्रेरणेनें १८६९ मध्ये छापली. ही गाथा कै. शंकर पांडुरंग पंडित यांनी संपादित केली असून त्यांत ४६२१ अभंग आहेत. याचेंच पुनर्मुद्रण सन १९५० मध्ये त्यावेळच्या मुंबई सरकारनें कै. पु. मं. लाड यांच्या संपादकत्वा-खाली केलें. तुकारामांची दुसरी गाथा इ. स. १९०९ मध्ये कै. विष्णु-बोवा जोग यांनी संपादित केली असून ती परंपरेवर आधारलेली असल्यानें सर्वमान्य होऊन बसलेली आहे. वि. ल. भावे यांनींहि "तुकारामाची अस्सल गाथा–" सन १९२१ मध्ये प्रसिद्ध केली असून ही गाथा संताजी जगनाडे यांच्या वहींतील अभंगांवरून तयार केली आहे.

## तुकारामांची शिकवण

तुकारामांची एकंदर अभंगरचना ४६२१ असून, या अभंगांतून निरनिराळे विषय आले आहेत. यांत आत्मनिवेदनपर अभंग बरेच असून, त्यांतून तुको-बांनी आपली कुलपरंपरा, गुरूपदेशाचा प्रसंग, आपला आत्मविकास इत्यादि गोष्टी सांगितल्या आहेत. तसेंच या अभंगांतून प्रपंचांत वावरणारे तुकाराम, नंतर भक्तीची साधना करणारे तुकाराम व आत्मसाक्षात्कारी तुकाराम दिस-तात. याचा थोडासा आढावा पाठीमागे घेतला आहे.

तुकारामांच्या अभंगांतील दुसरा भाग म्हणजे भक्तिमहात्म्य, संतांचीं लक्षणें, पाखांडखंडण, हा असून साधकासाठी त्यांनी परमार्थमार्गाचें विव-

रण करून संतसंग व नामस्मरणाचें महत्त्व विशद केलें आहे. धर्माचें रक्षण करणें हेंच जीवितकार्य आहे. ऋषिमुनींनी जें सांगून ठेविलें आहे तें सचोटीनें करून दाखविण्यासाठी आम्ही इहलोकांत आलों आहोंत. पूर्वीच्या साधुसंतांनी घालून दिलेले मार्ग आम्ही झाडून स्वच्छ करूं व भक्तीचा डांगोरा पिटूं. त्यामुळे कलिकाळाला सुद्धा दरारा बसेल असें तुकारामांनी 'धर्म रक्षावयासाठी करणें आटी आम्हांसि ।' 'आम्ही वैकुंठवासी । आलों याचि कारणासी ।' या अभंगांत सांगितलें आहे.

खरा जो वैष्णव आहे तो देवाची खरी भक्ति करतो. तन, धन हें सर्व त्याला तृणवत् वाटतें. त्याचा नेमधर्म कधीहि टळत नाही. त्याला सर्व जग विष्णुमय वाटतें. त्याचा अहंकार नाहींसा व्हावा लागतो. संसाराचें मायाजाळ तोडून परमेश्वराच्या ठिकाणीं भक्तिभाव निर्माण करावा लागतो. संसाराचा मायापाश तोडणें फार कठिण. एक वेळ वज्राचा सुद्धा भेद होईल, पण संसाराच्या मायापाशाचा भेद होणार नाही. वैष्णवाला हेंच खरें काम करावयाचें असतें. जो मनुष्य असा संसाराविषयी उदास असतो त्याच्याकडे ब्रह्मज्ञान आपण होऊन चालत येतें. मात्र भक्ति ही सोपी तितकीच कठीण आहे हें बजावतांना तुकोबा म्हणतात, "भक्ति तो कठीण शुळावरील पोळी । निवडे तो बळी विरळा शूर ।।"

वैष्णवाचीं लक्षणें सांगितल्यानंतर खरा साधु कसा ओळखावा, खऱ्या साधूचीं लक्षणें कोणतीं हेंहि तुकोबांनी आपल्या अभंगांत सांगितलें आहे. जो दु:खाने गांजलेला आहे अशांना जो आपले म्हणतो तोच साधु म्हणून ओळखावा. साधूचें अंत:करण मृदु असतें. तो निराधारांना प्रेमाने हृदयाशीं धरतो व त्यांचें पुत्रवत् पालन करतो. जो जगाचे आघात सहन करतो तोच खरा संत समजावा. हिऱ्यावर कितीहि प्रहार केले तरी खरा हिरा फुटत नाही. तसेंच जगांतील आघातांनी त्याचें चित्त भंगत नाही. त्याचें मन गंगाजळाप्रमाणे पवित्र असतें. साखर ज्याप्रमाणे अंतर्बाह्य गोड असते तसाच तो अंतर्बाह्य सद्‌गुणांनी भरलेला असतो. अशा संतांची तुलना तुकारामांनी गंगाजळ, अमृत, रवि, दीप, कापूर, परिस, चिन्तामणी या वस्तूंशीं केली आहे. या वस्तूंप्रमाणें संतजन संपूर्णपणें गुणांनीच भरलेले असतात.

भक्त व देव यांमध्ये अभेद असतो. त्यांच्यामध्ये वेगळेपणा दाखवितां येत नाही. इंधनाचा अग्नीशीं संबंध आला तर तें अग्निमयच होतें; किंवा कस्तुरीमध्ये माती मिसळल्यानंतर ती कस्तुरी होते. मात्र हा अभेद निर्माण होण्यासाठी शुद्ध भाव पाहिजे. या भक्तिभावामुळे देवसुद्धा अवतार घेतो. भक्त व देव यांच्यामध्ये हें भक्तिप्रेमाचें बंधन दृढ झालें पाहिजे. हरिरूपीं रंगल्यामुळे सुखदु:खादिक भोगाची जाणीव त्याला नसते. त्याच्या अंत:-करणांत परमेश्वरच भरून राहतो.

संतसंग, भक्ति यांप्रमाणेच नामसंकीर्तनाचा महिमा तुकोबांनी आपल्या अभंगांत गायिला आहे. परमेश्वरावर दृढभाव ठेवून नामसंकीर्तन केलें पाहिजे. ज्या ठिकाणीं दिंड्यापताका झळकत असतात व वैष्णव हरिनामाचा गजर करून गातात आणि नाचतात त्या ठिकाणीं सुख येऊन राहतें. एवढेंच नव्हे तर अशा ठिकाणीं पंढरीचा विठोबा आपलें देवपण विसरून तेथे उभा राहतो. देव, भक्त आणि नामसंकीर्तन यांचा जेथे संगम झालेला असतो, तोच खरा त्रिवेणीसंगम होय. या त्रिवेणी संगमांत (म्हणजे हरिनाम-संकीर्तनांत) दोष नाहीसे होऊन मनुष्य पवित्र होतो. अशा प्रकारचा नाम-संकीर्तनाचा महिमा आहे. हा महिमा ज्याचा तोच जाणेल. कमळाला स्वत:च्या फुलांतील सुगंधाची जाणीव असते काय ? तो सारा सुगंध तिचा उपभोग घेणाऱ्या भ्रमरासच ठाऊक असतो. मोती शिंपलीच्या पोटांत जन्मतें, पण मोत्याचा सहवास किंवा उपभोग त्या शिंपलीला मिळत नाही. त्याप्रमाणे परमेश्वराच्या नामसंकीर्तनाची गोडी व प्रेमसुख भक्तालाच माहीत असतें. हरिनामाशिवाय भक्ताला दुसरें कांही आवडत नाही. सोनें, रुपें हें सुद्धा त्याला मातीसारखें असतें.

धर्माचें पालन करणें हेंच आपलें जीवितकार्य मानून तुकारामांनी नाम-माहात्म्य, संतसंगती इत्यादि विषयांवर आपले विचार प्रगट केले. त्याचप्रमाणे कोणाचीहि भीडभाड न ठेवतां तत्कालीन दांभिक लोकांवर तुकोबा तुटून पडले आहेत. अनुभवाशिवाय ज्ञान सांगणें हें व्यर्थ आहे हें तुकोबांनी अनेक अभंगांत सांगितलें आहे. ‘ शिकल्या बोलाचे सांगतील वाद। अनुभव भेद नाही कोणा ।।’ किंवा ‘ नका दंतकथा येथे सांगो कोणी। कोरडे ते मानी बोल कोण ।।’ या अभंगांत अनुभव हा आवश्यक आहे हें सांगितलें आहे. नुसतीं

भगवीं वस्त्रें घालून व जटा वाढवून व दाही दिशा फिरून देवाचा अनुभव येतो असें नाही. जमिनींत खड्डा खणून राहणारे सगळेच जर साधुपुरुष असते तर मग बिळांत राहणारे उंदीर साधुपुरुष झाले नसते का ? तांब्याचा पैसा हा कितीहि देशांत फिरविला तरी सोन्याची मोहोर म्हणून त्याला किंमत येणार नाही. तसेंच या दांभिकांना संत म्हणून कोणी मानणार नाहीं. या कलियुगांत साधक पुष्कळ झाले आहेत. ते गुडगुडीची लांब नळी तोंडांत घालून तंबाखू ओढतात. मद्यपान त्यांच्या पचनीं पडलेलें असतें. भांग पितात, अभेदाचें तत्त्वज्ञान सांगतात, सभोवतीं शिष्यांचा गराडा असतो व विषय-वासनेंत बुडालेले असतात. तुकोबा अशा सोंगांची वोडंती करतात. असा साधु व असा हरदास हे लोभाचे मांजर बनून दारोदार भीक मागतात. संपत्तीची इच्छा धरूनच हे लोक भक्ति करतात. ही भक्ति म्हणजे अज्ञानाची पूजा होय. त्यांना परब्रह्माची प्राप्ति कशी होणार ?

तुकोबांनी प्रापंचिकांसहि अनेक अभंगांतून उपदेश केला आहे. कोणत्याहि जीवाचा मत्सर करूं नये. प्राणिमात्रविषयी दया बाळगावी, शांत वृत्ति ठेवावी, सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे उत्तम व्यवहार करून पैसा अडका संपादन करावा व मोह न ठेवतां फलाशाविरहित वृत्तीने खर्च करावा, दुसऱ्यावर उपकार करावा, दुसऱ्याची निंदा करूं नये व परस्त्रिया आई-बहिणीप्रमाणे मानाव्या. प्रपंचाच्या बाबतींत उदास असणाऱ्यांचाच देह ब्रह्म-रूप होतो. तात्पर्य, प्रापंचिकांस उपदेश केलेली ही नीति म्हणजे परमार्थाची पूर्वतयारीच आहे व त्या दृष्टीनेच तुकोबांनी प्रापंचिकांस उपदेश केला आहे. दया, क्षमा, शांति या गुणांवरहि तुकोबांचा भर आहे. 'दया तिचें नांव भूतांचें पालन । आणिक निर्दळण कंटकाचें ।।' भूतांचें पालन व कंटकाचें निर्दालन हीच तुकोबांची धर्म व नीतीची कल्पना आहे.

सारांश, तुकारामांनी आपल्या अभंगांतून अनेक विषयांचा परामर्श घेतला आहे. भक्ति, अध्यात्म हे त्यांचे मुख्य विषय असून त्यांच्या अनुषंगाने येणारे संतमहिमा, नामसंकीर्तन, कंटकाचें निर्दालन, प्रापंचिकांनी पाळावयाचीं पथ्यें हेहि विषय त्यांत आले आहेत. या विषयांतूनच भक्तांना परमार्थमार्ग तुकोबांनी दाखविला आहे.

## तुकारामांचें कवित्व

तुकारामांचे सर्व अभंग हे प्रसंगानुसार झाले आहेत. त्यांनी आपल्या अभंगांचें विषयवार वर्गीकरण करून कांहीं अभंगरचना केली नाही. त्यामुळे ज्या ज्या वृत्ति प्रसंगानुसार तुकोबांच्या मनांत उसळल्या त्या त्या त्यांच्या अभंगांत व्यक्त झाल्या आहेत. थोडक्यांत, तुकोबांचे अभंग म्हणजे उत्कृष्ट भावगीतेंच आहेत. तुकारामांच्या अभंगांत विशेष गोष्ट म्हणजे, ते वाचीत असतांना तुकोबांची मूर्ति आपल्या डोळ्यांपुढे उभी राहते. कवि प्रत्यक्ष वाचकाबरोबरच बोलतो व काय सांगणें तें आडपडद्याशिवाय स्वच्छ समोरासमोर सांगतो. यामुळेच त्याच्या शब्दाचा प्रत्यक्ष परिणाम फार होतो. याशिवाय दुसरें असें की, तुकारामांच्या प्रासादिक वाणीमध्ये मराठी भाषेचें जें एक विलक्षण मनोहर व साधें स्वरूप आढळतें तें इतरत्र कोठेंहि आढळत नाही. सोप्या व साध्या शब्दांनी मनावर ठसेल असा उपदेश करणें, तसेंच प्रसंगीं राग, द्वेष, इत्यादि विकारांचें श्रोत्यांच्या मनावर काहूर उभें करणें किंवा एखाद्या निंद्य गोष्टीची अवहेलना करून तिजविषयी तिटकारा उत्पन्न करणें या गोष्टी तुकोबांनी आपल्या अभंगांत लीलेने साधल्या आहेत. तसेंच यांचे दृष्टान्त व दाखले हृदयास जाऊन भिडतील असेच आहेत. बोलणें पाटीभर व अर्थ चिमूटभर असा आधुनिक टीकाकारांचा प्रकार यांच्या अभंगांत कोठेंहि आढळणार नाही. उलट इतरांना पांच वाक्यें लिहूनहि जो अर्थ नीट स्पष्ट करिता येत नाही तो त्यांनी पांच शब्दांतच सांगितलेला आढळेल. यांची शब्दरचना गोड असून शब्द जसे कोंदणांत बसवावे त्याप्रमाणे तेजाने चमकतात व त्यांच्या बैठकीनेंच ते जास्त शोभतात. मनांतला अर्थ थोडक्यांत विशद करावा व आपल्या कल्पनेला मोहक असें मूर्त स्वरूप द्यावें यांतच तुकारामांच्या श्रेष्ठपणाचें गूढ आहे व यामुळेच तुकोबांचे अभंग आज अठरापगड जातींच्या तोंडांत कायमचे राहिले आहेत. तुकोबांच्या अभंगांचे अनेक चरण महाराष्ट्रांत आबालवृद्धांच्या तोंडीं कायमचे बसले असून ते सूत्रवत् उच्चरिले व मानले जातात. यामुळेच तुकोबांच्या शब्दांना स्मृतिकारांच्या शब्दांचें महत्त्व आलें आहे.

तुकारामांचें पहिलें कवित्व या दृष्टीने पाहिलें असतां 'बालक्रीडा' हें पहिलें कवित्व आहे. त्यानंतर जिवंत अनुभव व सूक्ष्म निरीक्षण, चोखंदळ बुद्धि

व मधुर वाणी या गोष्टी जमल्याने तुकोबांचे अभंग हे श्रेष्ठ ठरले. तुकोबांची वाणी मोठी लवचिक आहे. परमेश्वराची वाट पाहतांना त्यांच्या मनाची पाण्याच्या बाहेर काढलेल्या माशाप्रमाणें तळमळ होते, पण भगवीं वस्त्रें परिधान करणाऱ्या सोंगांचा समाचार घेतांना ती अत्यंत भेदक होते. तुकोबांच्या अभंगांत, अनुप्रासाचे उदा. 'कर्पूर कांडणीं काय कोंडाकणी।' शब्दचमत्कार कांही थोडया ठिकाणींच दिसतात, पण काव्याचें बाह्यांग घासून पुसून त्याला झिलई देण्याकडे तुकोबांचें लक्ष कमीच आहे.

तुकारामांच्या अभंगांतील एक विशेष म्हणजे मानवी प्रपंचांतील हास्यरस त्यांनी जागोजागीं टिपला आहे. प्रापंचिकांचा, विषयी जनांचा, लोभी व दांभिक यांचा उपहास करतांना त्यांनी हास्यविनोद निर्माण केला आहे. पंढरपूरला जाणारी सासू आपल्या सुनेला संसारांतील कोणकोणत्या गोष्टी सांभाळावयाच्या तें सांगून जास्त जेवूं नकोस, फार खर्च करूं नकोस हें सर्व सांगते व शेवटीं वेशीपासून परत घरीं येते व 'मुलें लेंकरें घरदार। माझें येथेचि पंढरपूर।' असें म्हणते. यांत म्हाताऱ्या माणसांना सुद्धा संसाराची माया सुटत नाही हें मोठ्या परिणामकारक रीतीने सांगितलें आहे. त्याचप्रमाणे माणसाचा स्वभावधर्म कांही केलें तरी सुटत नाही हें सांगतांना गाढवाला कितीहि शृंगारलें तरी त्याचें कांही घोडें होत नाही किंवा कुत्र्याला पालखींत बसविलें, तरी भुंकणें थांबत नाही हीं उदाहरणें तुकोबांनी दिलीं आहेत. एका क्षुद्र गोष्टीसाठी फार मोठी गोष्ट आपण गमावतों म्हणजे जे केवळ संसारांत गुंतून परमेश्वराला गमावतात त्यासाठी पोपट नळीला धरून राहतो व माकडाचे हातहि फुटाणे धरण्यांत गुंततात याचा दाखला त्यांनी दिला आहे. त्याचप्रमाणे मोक्षाला अधिकारी जी व्यक्ति नाही म्हणजे जो मनुष्य अश्रद्ध आहे अशा मनुष्याला परमार्थाचा उपदेश करूं नये, तो वाया जातो व आपणांस मात्र व्यर्थ श्रम होतात; हें सांगतांना कावळ्याला मोत्यांची माळ घातली तर ती त्याला शोभून दिसेल काय ? किंवा हत्तीला कस्तुरीचा लेप दिला अथवा बगळ्याला उपदेश केला तर या गोष्टी व्यर्थ होतात अशीं उदाहरणें दिलीं आहेत. कोणावरहि उगीच रागावून किंवा डोक्यांत राख घालून आपलें अनहित आपण करून घेणें योग्य नाही हें तुकोबांनी मोजक्या शब्दात व व्यवहारांतील उदाहरणें देऊन

पटवून दिलें आहे. तेलणीवर रुसून एखाद्यानें कोरडी भाकर खाल्ली, तर त्या तेलणीचें काय गेलें ? लोकांना आवडत नाही म्हणून एकाद्या बाईनें नवरा सोडून देणें वेडेपणाचें होईल. शेजारणींच्या रागानें आपण घर सोडलें तर कुत्र्यांना राहण्यास चांगली जागा होईल. ढेकणांच्या त्रासानें आपलें घर जाळणें हें तर मूर्खपणाचें कृत्य होईल. सारांश, व्यवहारांतील दृष्टान्तांनी व उदाहरणांनी तुकाराम आपल्या अभंगांतील आशय उत्कृष्टपणें पटवून देतात.

तुकोबांचें लिहिणें मोठें सूत्रबद्ध असतें. थोड्या शब्दांत मोठा अर्थ सांगण्याचें सामर्थ्य तुकोबांच्या वाणींत आहे, हें मागे सांगितलेंच आहे. यामुळेंच तुकोबांच्या कित्येक वचनांना सुभाषितांचा अर्थ प्राप्त झाला आहे. त्याची कांहीं उदाहरणें पुढे देत आहे.

(१) तुका म्हणे तोचि संत । सोशी जगाचे आघात
(२) तुका म्हणे येथें पाहिजे जातीचे । येरा गबाळाचें काय काम
(३) जे कां रंजले गांजले । त्यांसी म्हणे जो आपुले ।।
तोचि साधु ओळखावा । देव तेथेंचि जाणावा ।।
(४) गाढव श्रृंगारले कोडें । कांहीं केल्या नव्हे घोडें
(५) दया तिचें नांव भूताचें पाळण । आणिक निर्दाळण कंटकाचें

या म्हणीवजा सुभाषितांत प्रपंच, परमार्थ, काव्य सर्व कांही आहे. वाणीतील भेदकता, बुद्धीचें स्वातंत्र्य व अंतरींचा प्रत्यय या तीन गुणांमुळें तुकोबांचें काव्य श्रेष्ठ ठरलें आहे. तुकोबांचें अंतःकरण अत्यंत पवित्र व त्यांत भक्तिरसाचा झरा वाहत असलेला. यामुळे तुकारामांच्या काव्यांत खरी कळकळ, जिव्हाळा, भरून राहिला आहे. आत्माविष्कार हाच त्यांच्या काव्याचा विषय आहे. भक्तीच्या ज्या ऊर्मि त्यांच्या हृदयांत उमटत होत्या, त्यांना तुकोबांनीं शब्दरूप दिलें. तुकोबांची कळकळ, उत्कृष्ट अनुभूति, त्यांचा आत्माविष्कार या गोष्टी पाहिल्या असतां तुकोबांच्या अभंगांत श्रेष्ठ प्रतीचें काव्य भरून राहिलें आहे, याविषयी शंका राहत नाही.

## तुकारामांचे कांही रसिक टीकाकार

तुकारामांचें कवित्व हें ज्याप्रमाणे कांही टीकाकारांना श्रेष्ठ प्रतीचें वाटतें, त्याप्रमाणे तुकारामांच्या काव्यांत दोष काढणारे टीकाकारहि आहेत. जुन्या

पिढींतील एक रसिक कै. वा. ब. पटवर्धन तुकारामांच्या काव्यावर पुढील-प्रमाणे अभिप्राय देतात, "ना आकृतिसौंदर्य, ना विचारनावीन्य; ना शब्दसुभगता, ना विचारांची गंभीरता; ना नादमाधुर्य, ना उत्स्फूर्त सहजता; असेहि कित्येक अभंग आहेत.' या अभिप्रायावरून तुकोबांविषयी पटवर्धनांचें म्हणणें कळतें. त्यांच्या मतें तुकोबांच्या अभंगांत घाई, निष्काळजीपणा व शब्दसौंदर्य व अर्थसौंदर्य यांचा अभाव दिसतो

दुसरे एक रसिक टीकाकार प्रा. रा. श्री. जोग तुकोबांच्या कवित्वाबद्दल म्हणतात, " तुकारामांचे उपमादृष्टान्त समर्पक असले तरी त्यांतून सौंदर्य-निर्मिति होऊं शकत नाही, त्याचप्रमाणे शब्दाचें माधुर्य वा सौकुमार्य इकडे त्यांचें लक्ष नसे. सरळ, सडेतोड, फटकळ, कित्येक वेळां अर्वाच्यहि असें त्यांच्या आत्माविष्काराचें भाषिक स्वरूप होतें. आत्माविष्काराच्या भरांत आपला अर्थ नीट स्पष्ट होईल कीं नाही याचा विचारहि ते अनेक वेळां करीत नसल्यानें त्यांचें लेखन दुर्बोध होई. आत्माविष्काराचें साधन जो शब्द-रचना त्याची योग्य निगा त्यांनी राखली नाही."

वरील दोघांहि रसिकांचे अभिप्राय पाहिले असतां ' तुकोबा हे कलाकार नाहीत व त्यांची वाङमयाभिरुचि निर्दोष नाही ' असें त्या दोघांचें मत असल्याचें दिसून येतें. मात्र तुकोबांच्या अभंगांतील उत्कट अनुभूति व कळकळ यांबद्दल या दोघांनी विरोधी सूर काढला नाही. या अभिप्रायाबरोबरच संतवाङमयाचे एक अभ्यासक कै. पांगारकर यांचेंहि मत पाहण्यासारखें आहे. ते म्हणतात, " तुकोबांच्या या सूत्ररूप वचनांनी मराठी भाषा श्रीमंत झाली असून वाणी आणि विचार, किंवा वाक् आणि अर्थ हीं येथे परम रमणीय आहेत."

तुकोबांचे अभंग अभ्यासल्यानंतर कै. पांगारकरांचा अभिप्राय जास्त समर्पक वाटेल याविषयी शंका राहत नाही.

# तुकारामांचे शंभर अभंग

– १ –

काय खावें आतां कोणीकडे जावें
गांवांत राहावें कोण्या बळें १
कोपला पाटील गांवचे हे लोक
आतां घाली भीक कोण मज २
आतां येणें चवी सांडिली म्हणती
निवाडा करिती दिवाणांत ३
भल्या लोकीं यास सांगितली मात
केला माझा घात दुर्बळाचा ४

---

१. आता मी काय खावें? कोणीकडे जावें? कोणत्या बळावर या गावांत राहावें? कारण ज्यांच्या बळावर आतापर्यंत या गावांत राहिलों, तो पाटील आणि गावांतील लोक माझ्यावर रागावले आहेत. त्यामुळे येथे मला कोण भीक घालणार आहे? 'ह्याने वागण्याचें ताळतंत्र सोडलें' असें म्हणून ते लोक मला कचेरींत खेचून माझा निवाडा करतात. कांही हितचिंतकांनी 'मी संसार सोडला' ही गोष्ट पाटलास सांगितली व अशा रीतीनें माझ्यासारख्या पामराचा घात केला. 'खरोखर या लोकांची संगति कांही ठीक नाही. 'आपण आपलें विठ्ठलाचा मार्ग काढीत जाऊं' असें तुकाराम म्हणतात.

अंत:करणांतील आर्त उद्गारांनी ओला झालेला हा तुकारामांचा अभंग साध्या व सरळ रचनेने मनाची पकड घेतो. लौकिक जीवनांत तुकारामांवर अनेक संकटें कोसळलीं आहेत. शके १५५१ मध्ये दुष्काळ पडला. त्यांत तुकारामांची सारी कुटुंबव्यवस्था उध्वस्त झाली. व्यावहारिक जगांत तुकारामांची मानहानि व कुचंबणा होऊं लागली. रामेश्वरभटाने पाटला-

...२...

तुका म्हणे याचा संग नव्हे भला
शोधीत विठ्ठला जाऊं आतां ५

– २ –

दुडीवरी दुडी,
चाले मोकळी गुजरी.
ध्यान लागो ऐसें हरी,
तुझे चरणीं तैशापरी.
आवंतण्याची आस,
जैसी लागे दुर्बळास •

---

कडून तुकारामांस न्यायासनासमोर उभें केलें. तुकाराम ह्या कटकटींना कंटाळला. परंपरेने घरांत वारी चालत आली होती. तिचा आधार त्यानें आत्मोद्धारासाठी घेतला. विठ्ठलाच्या शोधांत तुकारामांची वाटचाल सुरू झाली.

२. गुजराथी स्त्री डोक्यावर एकावर एक अशा तीन चार पाण्याच्या घागरी घेऊन अगदी सहजतेने–जणू कांही डोक्यावर कांही नाही या थाटांत चालत असते. परंतु तिचें सर्व लक्ष डोक्यावरील घागरींकडे असतें. अगदी तसेंच माझें लक्ष तुझ्या पायाकडे लागूं दे. (मी संसारांत लक्ष देत आहें, असें जरी दिसत असलें तरी संपूर्ण लक्ष तुझ्या पायांकडे लागूं दे.) गरीब भिक्षुक जेवणाच्या आमंत्रणाची नेहमीच वाट पाहत असतो, व्याजाच्या आशेने, लोभी मनुष्य एक दिवस झाला, एक महिना झाला असें नेहमी बोटांवर मोजत असतो. हे देवा, मलाहि तुझ्या दर्शनाचा लोभी कर. दुसरी कोणतीहि प्रापंचिक पीडा माझ्या मागे ठेवूं नको.

तुकाराम आपले दृगनुभव वर्णन करीत असतांना, आपल्या डोळ्यां-समोर प्रत्यक्ष तें चित्र उभें करतात. पहिल्या ओळींतून उभें राहिलेलें दृश्य आणि 'ध्यान लागो ऐसें हरी' हा त्याचा उत्तरार्ध त्यामुळे वेगळाच अर्थ

लोभ्या कळांतराची आस,
बोटें मोजी दिवस मास
तुका म्हणे पंढरीनाथा,
मजला आणिक नको व्यथा

— ३ —

जाणोनि नेणतें करीं माझें मन,
तुझी प्रेमखूण देऊनियां.
मग मी व्यवहारीं असेन वर्तत,
जेवीं जळा आंत पद्मपत्र.

---

प्राप्त होतो. या अभंगांत दृष्टान्ताची 'दुडीवर दुडी' रचलेली असली तरी त्यांतून एकच अर्थ आपलें लक्ष वेधितो. तो म्हणजे तुकारामाच्या मनांतील आतुरता, व देवविषयक एकनिष्ठपणा. हाच अनुभव नामदेवाने याच शब्दांत वर्णन केला आहे.

दुडीवरी दुडी पाण्या निघाली गुजरी,
चाले मोकळ्या करी, परी लक्ष तेथें.
धनलोभ्याने धन ठेवियलें दुरी,
वर्ते चराचरी, परि लक्ष तेथें.

३. हे देवा, तुझ्या प्रेमाची ओळख पटवून देऊन, माझ्या मनाला जाणिवें-तून नेणिवेंत ने. म्हणजे मग पाण्यांतील कमलदलाप्रमाणे मी निर्लेप वृत्तीनें प्रपंचांत राहीन. उन्मनी अवस्थेंत असलेल्या योगिराजाप्रमाणे मीहि कानांनी निंदास्तुति ऐकून न ऐकल्यासारखें करीन. ज्याप्रमाणे जागें झाल्यानंतर स्वप्नांतील सृष्टि, ती खोटी आहे म्हणून विसरून जातो, त्याप्रमाणे ह्या संसाराकडे पाहूनहि (तो स्वप्नांतील सृष्टीसारखा खोटा आहे असें समजल्या-मुळें ) त्याकडे दुर्लक्ष करीन. असें जोंपर्यंत होत नाही तोंपर्यंत जें जें कांही माझ्या हातून होईल तें तें कष्टदायकच ठरेल.

ऐकोनि नाइके निंदास्तुति कानीं,
जैसा कां उन्मनी योगिराज.
देखोनि न देखे प्रपंच हा दृष्टी,
स्वप्नींचिया सृष्टि चेविल्या जेवीं.
तुका म्हणे ऐसें जालियावांचून,
करणें तें तें सीण वाटतसे.

— ४ —

कानडीने केला मऱ्हाटा भ्रतार,
एकाचें उत्तर एका नये.

---

या अभंगांत निष्काम कर्मयोगाचा पुरस्कार तुकारामांनी केलेला आहे. कर्म करावें, पण त्याच्या कर्तृत्वपदाचा अभिमान घेऊं नये. 'हें काम मीं केलें' अशी जाणीव ही 'अहं' वृत्तींतून निर्माण होते. 'मी' 'माझें' ही भूमिका आली की सुखदुःख आलेंच. 'माझी निंदा' म्हणजे 'मला दुःख!' म्हणून कोणत्याहि कर्माच्या आहारीं जाऊं नये. कमळ पाण्यांत राहतें पण पाण्याचा स्पर्श होऊं देत नाही. तद्वत् प्रपंचांत राहावें, कर्में करावीं, पण कर्मफळाचे भोग मात्र अंगीं येऊं देऊं नयेत. जोंपर्यंत 'अहं' (मीपणा) ही जाणीव जात नाही, तोंपर्यंत प्रत्येक कर्माचें बरेंवाईट फळ मिळत राहणारच! या बऱ्या-वाईट फळांतूनच पुढील जन्माचा कार्यक्रम आखला जातो! या बऱ्यावाईट फळांतूनच 'पुनरपि जननं पुनरपि मरणम्' सुरू होतें. म्हणून कर्मांच्या बाबतींत, भक्ताने उदासीन राहावें. "उदासीनाचा देह ब्रह्मरूप."

४. एका कानडी बाईने मराठी भाषिक माणसाशीं विवाह केला. झालें काय की, एकाचें बोलणें दुसऱ्यास कळेना. हे देवा, अशी विसंगत जोड मला देऊं नकोस. मला संतसज्जनाचीच सोबत दे. एकदा तिने 'इल बा' (इकडे या) अशी हाक मारली. त्याला वाटलें की, तिने त्याला शपथच घातली. म्हणून तो पळून गेला! परस्परांस विसंगत अशी जोड असल्यास सुखाऐवजीं कष्टच पदरीं पडतात.

तैसें मज नको करूं कमळापति,
देई या संगति सज्जनांची.
तिने पाचारिलें इलबा म्हणोन,
येरु पळे आण जाली आतां.
तुका म्हणे येरयेरां जें विच्छिन्न,
तेथे बाढे सीण सुखा पोटीं.

— ५ —

माझिये जातीचें मज भेटो कोणी,
आवडीची धणी फेडावया.
आवडे ज्या हरी अंतरापासूनि,
ऐसियांचें मनीं आर्त माझें.

---

या अभंगांत तुकारामांचें मागणें आहे. तुकारामांचें मागणें नेहमीच अर्थपूर्ण असतें. त्याची मांडणीहि इतकी कौशल्यपूर्ण असते की, दात्याने तें ताबडतोब मंजूर करावें ! मी तुझा भक्त आहे; म्हणून माझ्या जातीच्याच लोकांची (वैष्णवांची) संगति दे. नाहीतर माझी स्थिति त्या मराठी भाषिक नवऱ्यासारखी होईल. सूक्ष्म नर्म विनोद हाहि या अभंगाचा विशेष म्हणतां येईल.

५. हे देवा, माझ्या आवडीची तृप्ति होण्यासाठी मला कोणीतरी समानधर्मा भेटूं दे. ज्यांना श्रीहरीविषयी पूर्ण प्रेम आहे, त्यांची भेट व्हावी हीच इच्छा माझ्या मनांत आहे. त्यांच्या भेटीसाठी जीव तळमळतो आणि डोळे सतत त्यांच्या वाटेकडे असतात. त्या विष्णुभक्तांना आलिंगन देतांक्षणींच माझ्या जन्माचें सार्थक होईल. ज्या दिवशीं त्यांच्या संगतींत समाधान होईतों श्रीहरीचें गान करूं, तोच महोत्सवाचा दिवस होय !

तुकारामांच्या साधकदशेंतील अभंग आर्ततेने भरलेले आहेत. अंतःकरणांतील तळमळ शब्दाशब्दांतून काठोकाठ व्यक्त झालेली आहे. भावनांचा

तया लागीं जीव होतो कासावीस,
पाहातील वास नयन हे.
सुफळ हा जन्म होईल तेथून,
देतां आलिंगन वैष्णवांसी.
तुका म्हणे तोचि सुदिन सोहळा,
गाऊं या गोपाळा घणीवरी.

— ६ —

सद्‌गुरुरायें कृपा मज केली,
परी नाहीं घडली सेवा कांहीं.
सांपडविलें वाटे जातां गंगास्नाना,
मस्तकीं तो जाणा ठेविला कर.
भोजना मागती तूप पावशेर,
पडिला विसर स्वप्नामाजी.

उत्स्फूर्त उद्रेक या अभंगांतून प्रकट झाला आहे. संतांच्या सहवासात भगवंतांचें दर्शन होईल यासाठी 'माझिये जातीचा मज भेटो कोणी' हा आर्त टाहो आहे. संतसमागमेंच दसरा–दिवाळी असते, एरवीं प्रपंचांत अमावस्येची काळोखी रात्रच. या अभंगाचें आणखी एक वैशिष्ट्य आहे. या अभंगावरून तुकारामांची जात सहज ओळखून काढतां यावी ! त्याची जात हरिदासाची आहे, 'मानी तो हरिदास ज्या नामीं विश्वास' अशी नामदेवानें हरिदासाची केलेली व्याख्या तुकारामांस तंतोतंत लागू पडते. अशाच तऱ्हेचे, आपल्या जातीचे लोक आपणास भेटावे, म्हणून ही तुकारामांची तगमग.

६. सद्‌गुरूंनी मजवर कृपा करूनहि मला मात्र त्यांची कांहीच सेवा घडली नाही. (स्वप्नांत मला दिसलें की) गंगेचें स्नान करण्यासाठी जात असतांना मला त्यांनी रस्त्यांत गाठलें. त्यांनी माझ्या मस्तकावर आपला हात ठेवला व मला एक पावशेर तूप भोजनासाठी मागितलें. पण मी स्वप्नांत तें विसरलों.

कांहीं कळे उपजला अंतराय.
म्हणोनियां काय त्वरा जाली.
राघवचैतन्य केशवचैतन्य,
सांगितली खूण माळिकेची.
बाबाजी आपलें सांगितलें नाम,
मंत्र दिला रामकृष्णहरी.
माघाशुद्ध दशमी पाहुनि गुरुवार,
केला अंगीकार तुका म्हणे.

— ७ —

संतांनी सरता केलों तैशापरी,
चंदनीं ते बोरी व्यापियेली.
गुणदोष याती न विचारिता कांही,
ठाव दिला पायीं आपुलिया.

---

असा कोणता अडथळा आला कोणास ठाऊक की ज्यामुळे सद्गुरूंना जाण्याची घाई झाली ! राघवचैतन्य, केशवचैतन्य ही गुरुपरंपरेची खूण आणि आपलें 'बाबाजी' हें नांव सांगून 'रामकृष्णहरि' हा मंत्र दिला, माघ शुद्ध दशमीस गुरुवारीं सद्गुरूने माझा स्वीकार केला.

तुकारामांच्या जीवनांतील धन्यतेची ही वेळ आहे. त्यांच्या साधनेवर या दिवशीं श्रीगुरूचें शिक्कामोर्तब झालें होतें. परमार्थमार्गांत श्रीगुरूचें महत्त्व फार. श्रीगुरूच्या प्रसादाशिवाय साधनेची पूर्तता होऊं शकत नाही.

(सविस्तर चर्चा प्रस्तावनेंत पाहा.)

७. चंदनवृक्षाजवळ असलेलें बोरीचें झाडहि गंधमय होतें; संतांनीहि मला तसेंच आपल्यासारखें कृतार्थ केलें. माझ्या गुणदोषांचा किंवा माझ्या हीन जातीचा विचार न करिता आपल्या पायाजवळ त्यांनी आश्रय दिला

तुका म्हणे आलें समर्थाच्या मना,
तरि होय राणा रंक त्यांचा.

– ८ –

हरिनामवेली पावली विस्तार,
फळीं पुष्पीं भार वोल्हावली.
तेथें माझ्या मना होई पक्षिराज,
साधावया काज तृप्तीचें या.
मुळींचिया बीजें दाखविलें गोडी,
लवकरचि जोडी जालियाची.
तुका म्हणे क्षणक्षणा जातो काळ,
गोडी ते रसाळ अंतरेल.

---

सामर्थ्यशाली संतांच्या मनांत आलें, तर ते रंकाचा राजा करतील. (माझ्यासारख्या पापी माणसाला अधिकारावर चढवतील.)

सत्संगाला वारकरी सांप्रदायांत फार महत्त्व आहे. संतांच्या सहवासाने आसक्तीचा निरास होऊन मन सन्मार्गीं लागतें. संताची कृपा होतांच आपली पूर्वावस्था पार पालटते. ‘ संतांचा तो संग नव्हे भलतैसा, पालटावी दशा तात्काळीक ’ त्यासाठी ज्ञानेश्वरांनीहि ‘ चंदनें वेधलीं झाडें, जालीं चंदनाचें निपाडें ’ हाच दृष्टान्त दिला आहे. संतमहात्मे गुणदोष, जातपात, धर्मपंथ यांचा विचार न करतां ‘ आपणासारिखे करिती तात्काळ ’ हें वैशिष्टय लक्षांत घेतलें पाहिजे.

८. हरिनामरूपी वेळ चांगलीच ऐसपैस वाढली असून फुलाफळांनीं बहरून आली आहे. माझ्या मना, तुला जर समाधान हवें असेल तर त्या वेलीवर तूं पक्षी हो. (तिचा उपभोग घे.) जीवाच्या मूळ ईश्वररूपाने ही हरिनामाची गोडी दाखविली आहे; आता त्या फळाची लवकरच प्राप्ति करून घे. क्षणाक्षणानें काळ जात आहे; म्हणून विलंब न लावतां तूं त्याचें सेवन कर; नाहीतर विलंब केल्यास त्याच्या रसास्वादामध्ये अंतर पडेल.

– ९ –

वृक्षवल्ली आम्हां सोयरीं वनचरें,
पक्षी ही सुस्वरें आळविती.
येणें सुखें रुचे एकांताचा वास,
नाही गुण दोष अंगा येत.
आकाश मंडप पृथिवी आसन,
रमे तेथे मन क्रीडा करी.
कंथाकुमंडल देहउपचारा,
जाणवितो वारा अवसरु.

---

वासनांची तृप्ति ही असमाधान निर्माण करणारी असते. हरिनामाच्या गजराने लाभणारी तृप्ति ही मनाचें समाधान करणारी असते; आत्मसुख याच समाधानांतून मिळतें. वेलीच्या हिरव्याकंच गुंफ्यांत पक्ष्याने एकाग्र होऊन तिच्या फुलाफुलांचा आस्वाद घ्यावा तद्वत् हरिनामाच्या विस्तृत वेलीवर मन एकाग्र करून हरिभक्ताने हरिनामाचा आस्वाद घ्यावा.

या अभंगांत तुकारामांची कल्पनाशक्ति कशी बहरून आलेली आहे, याचें दर्शन घडतें. हरिनामाच्या माहात्म्याचें किंवा गोडीचें वर्णन करितांना ती असेंच मनोहर रूप धारण करते.

९. वनांत असणारे अनेक प्रकारचे वृक्ष, विविध वेली, सुस्वर गाऊन आळविणारे पक्षी आणि वनांत भटकणारे पशु हेच आमचे सोयरे होत. यांच्या सहवासाच्या आनंदामुळे हा एकान्त आम्हांला फार आवडतो. शिवाय विजनवास असल्यामुळे कोणताहि गुणदोष अंगाला चिकटत नाही. (गुणदोष नसल्यामुळे निंदास्तुति तरी कशी येणार ? ) आकाश हा मंडप असून पृथ्वी हें बसण्याचें आसन अमर्याद असल्यामुळे जेथे आमचें मन रमतें तेथे आम्ही क्रीडा करतों. देहाच्या सोयीसाठीं गोधडी व कमंडलू आहेत. वारा वेळ दर्शवितो. त्या ठिकाणीं हरिकथेच्या भोजनाचे नाना प्रकारांनी कौशल्यपूर्ण विस्तार करून त्यांचें आवडीने सेवन करूं. या एकान्तवासांत आप-

हरिकथा भोजन परवडी विस्तार,
करोनि प्रकार सेवूं रुची.
तुका म्हणे होय मनासी संवाद,
आपुलाचि वाद आपणांसी.

— १० —

पतिव्रता नेणे आणिकांची स्तुति,
सर्वभावें पति ध्यानीं मनीं.
तैसें माझें मन एकविध जालें,
नावडे विठ्ठलेंविण दुजें.

---

त्याच मनाशीं सुखद संवाद होतो, आणि कधी कधी आपलाच आपल्याशीं वाद होतो.

एकान्तावांचून समाधि लागत नाही, हें तुकारामांनी जाणलें होतें. लोकाचाराचा त्यांना उबग आला होता. 'वार्ता वधूधनाच्या' यांत त्यांना गोडी नव्हती. परमेश्वराचें दर्शन घडावें या हेतूने भामगिरीच्या डोंगरांत राहून चिंतनांत वेळ घालवीत असतांना तुकारामांस आलेला विराट् अनुभव या ठिकाणीं शब्दांकित झाला आहे. निसर्गाशीं आता त्यांचें सख्य जुळलें आहे. 'विराट् होऊन विराटाचें ध्यान' करणें त्यांना सहज शक्य झालें आहे. चिंतनासाठी, मननासाठीं एकान्ताची किती जरूरी आहे, हें या अभंगावरून लक्षांत घ्यावयास हवें.

१०. पतिव्रतेच्या मनांत सर्वच बाबतींत पतीचाच विचार येत असल्यामुळे, ती दुसऱ्याची कांही एक माहिती जाणत नाही. माझेंहि मन तसेंच एकनिष्ठ असल्यामुळे मला, विठ्ठलाशिवाय दुसरें कांहीहि आवडत नाही. सूर्यविकासिनी कमलिनी चंद्रप्रकाशामुळे उमलत नाही; किंवा कोकिळा वसंत ऋतूंतच गाते. लहान मूल आईपुढे आपणहून नाचतें, पण इतरांचें बोलणें देखील त्याला आवडत नाहीं.

सूर्यविकासिनी नेघे चंद्रकळा,
गाय ते कोकिळा वसंतेंसी.
तुका म्हणे बाळ मातेपुढे नाचे,
बोल आणिकाचे नावड़ती.

— ११ —

कन्या सासुऱ्यासि जाये,
मागे परतोनी पाहे.
तैसें जालें माझ्या जिवा,
केव्हां भेटसी केशवा.

---

तुकारामांनी वापरलेले दृष्टान्त कधी पारंपरिक तर कधी संपूर्णतया नवीन असतात. जुन्या दृष्टान्तांचा वापर करतांना तुकाराम त्यास नवाच संदर्भ देतात; आणि त्यामुळे त्या दृष्टान्तांचें नावीन्य आपल्या नजरेंत भरतें. सूर्य, चंद्र, कमलिनी, कोकिळा, वसंत ऋतु, या शब्दांमागे पारंपरिक संकेत उभे आहेत. विशेषत: संस्कृत साहित्यांत यांचा भरपूर पाऊस पडलेला आहे. पण त्याच संदर्भात त्यांचा वापर झाल्यामुळे त्यांच्यांतील अर्थशक्ति, काव्यात्मता नष्ट झालेली आहे. तेच संकेत तुकारामांनी देव-भक्त संदर्भात वापरल्यामुळे एक प्रकारचें नावीन्य आलें आहे. त्या संकेतांतील लोपलेलें काव्य तुकारामांनीं पुन: जिवंत केलें आहे. विठ्ठलाशीं एकरूप झालेल्या तुकारामांनीं स्वत:ला पतिव्रतेचा दृष्टान्त द्यावा हें योग्यच आहे. 'पतिव्रता' हा संतांचा आवडता दृष्टान्त असून त्यांतून त्यांचें मन स्पष्टपणें प्रकट होतें. कबीरजी म्हणतात; 'पतिवरता पति को भजै और न आन सुहाय.'

११. मुलगी सासरीं जाण्यास निघाली म्हणजे माहेराचा वियोग घडणार या व्यथेने मागे पुन: पुन: वळून पाहते. सासरीं निघालेल्या मुलीच्या जीवा-प्रमाणेच माझ्या जीवाची घालमेल होऊं लागली आहे. हे केशवा, तुझें दर्शन केव्हा होईल ? या कल्पनेने माझा जीव व्याकुळ झाला आहे. गर्दींत आई-

चुकलिया मायें,
बाळ हुरूहुरू पाहे.
जीवना वेगळी मासोळी,
तैसा तुका तळमळी.

– १२ –

वाटुली पाहातां सिणले डोळुले,
दाविसी पाउलें कैं वो डोळां.
तूं माय माउली कृपेची साउली,
विठ्ठले पाहिली वास तुझी.

---

यासून चुकलेलें मूल, हुरहूर लागल्यामुळे, जसें भिरभिरत्या नजरेने आईचा शोध घेत असतें किंवा मासळीला पाण्यावेगळें केलें असतां, ती जशी तडफडते त्याप्रमाणे तुझ्याशीं माझा वियोग झाल्यामुळे मी तळमळत आहे.

तुकारामांचा हा अभंग सुप्रसिद्ध आहे. त्यांच्या मनाची आर्तता, व्याकुलता या शब्दांतून पुरेपूर प्रकट झाली आहे. दैनंदिन जीवनांतील कौटुंबिक प्रसंगाच्या साह्याने मनांतील तीव्र भावना येथे स्पष्ट झाली आहे. तुकारामांचा अभंग इतका बोलका आहे की, त्यावर अधिक भाष्य करण्याची गरज नाही.

१२. देवा, तुझी मार्गप्रतीक्षा करतां करता माझ्या डोळ्यांना थकवा आला. माझ्या या डोळ्यांना तुझे पाय केव्हां दाखवशील ? तूं आमच्यासारख्या भक्तबाळावर कृपेचें छत्र धरणारी, आपल्या मायेची पाखर घालणारी आमची मायमाऊली आहेस. हे विठ्ठले आई, तुझ्या दर्शनाची मी कितीतरी आतुरतेने वाट पाहिली. तुला प्रेमालिंगन देण्यासाठी माझे बाहु आतुर झाले आहेत.

'चुकलिया माये, बाळ हुरुहुरू पाहे' हा अनुभव, तुकारामांनी योग्य शब्दांचीं रूपें वापरून आपल्या डोळ्यांसमोर साकार केला आहे. वाट, डोळे, या शब्दांचीं वाटुली, डोळुले अशीं रूपें करून भावनेची तीव्रता तुकाराम

तुका म्हणे माझ्या आसावल्या बाह्या
तुज क्षेम द्याया पांडुरंगा.

— १३ —

जरी मी न्हवतो पतित
तरि तूं पावन कैचा येथ.
म्हणोनि माझें नाम आधीं
मग तूं पावन कृपानिधी.

---

वाढवितात. वाट पाहतां पाहतां वाटच लहान (वाटुली) होते. पुढे पुढे तर सारा देहच वाटेंत विरून जातो. अशा वेळीं डोळयांना आलेला थकवा नि त्याची परिणती डोळे लहान होण्यांत होते. 'विठ्ठल' या पुल्लिंगी नामाचें संबोधनार्थी 'विठ्ठले' हें स्त्रीलिंगी रूपहि असेंच भावपोषक आहे. 'माय-माउली' च्या प्रेमाची अथांगता 'विठ्ठले' या रूपांतून सार्थ व्यक्त झाली आहे. अत्यंत कोमल अशी रचना, योग्य शब्दांचा वापर, अनुभवाला वाट करून देणारी रचना यांमुळे हा मराठींतील संजीवक अभंग आहे. कबीराच्या—

अँखिया तो झांई परी,
पंथ निहार निहार

या वचनांतील किंवा 'शिणले डोळुले पाहता वाटुली, अवस्था दाटली हृदयामाजी' या नामदेवांच्या अभंगांतील अनुभवाची तीव्रता तुकारामांनी अलगद झेलली आहे.

१३. अरे देवा, जर मी पतित नसतों, तर तूं पावन (पाप्यांचा उद्धारकर्ता) कसा ठरला असतास ? म्हणून माझें नांव आधी, नंतर कृपेच्या सागरा, पवित्र करणाऱ्या तुझें नांव ! लोखंडामुळे परिसाचा मोठेपणा; नाहींतर नुसता दगड. कल्पतरु म्हणजे कल्पिलेलें, इच्छिलेलें देणारा—वृक्ष. पण इच्छा करणारा याचकच जर या पृथ्वीच्या पाठीवर नसेल तर कल्पतरूची काय किंमत ? याचकामुळे कल्पतरु हा कल्पतरु आहे !

लोहो महिमान परिसा
नाही तरी दगड जैसा.
तुका म्हणे याचकभावें
कल्पतरु मान पावे.

— १४ —

आम्ही पापी तूं पावन,
हें तों पूर्वापार जाण.

---

ईश्वर आपल्याला अजून दर्शन देत नाही, याची तळमळ तुकारामांना लागलेली होती. मी पतित आहें, तरी तुझ्या पायाजवळून मला दूर करूं नकोस. तुझ्या दर्शनाची तहान मला लागलेली आहे. कृपेच्या वर्षावाने माझें अंत:करण शांत कर, अशी विनवणी करूनहि ईश्वर–दर्शन घडत नाही असें दिसतांच ईश्वराच्या अस्मितेला स्पर्श करून त्याला तुकारामाने डिवचलें आहे. आपल्या बळाचा जर ईश्वराला गर्व झाला असेल तर तो अनाठायीं आहे. कारण तो नांवारूपाला आला भक्तामुळे. ' पतित ' जर नसते तर ' पतितपावन ' ही ईश्वराची बिरुदावली निरर्थक ठरली असती. म्हणून पतितपावन ही पदवी जर परमेश्वराला पाळायची असेल तर त्याने पतितांना दूर ढकलून देऊं नये. पतितांचें त्याच्यावर ऋण आहे. पतितामुळे तो पतित-पावन आहे.

पतितपावन ब्रीद बांधिलें आधीं,
तरी कां उपाधी भक्तासाठी.

असा रोकडा सवाल कान्होपात्राने देवाला टाकला आहे. देवाला त्याचा जबाब देणें क्रमप्रात आहे. तुकारामाचा उद्धार न करून देवाचें चालणार कसें ? असा वकिली थाटाचा अहेर परमेश्वरास तुकारामाने अर्पण केला आहे.

१४. आम्ही पापी असून तूं आमचा उद्धारकर्ता आहेस, ही पूर्वीपासून चालत आलेली परंपरा लक्षांत ठेव. ह्या जुन्या परंपरेंत नवा फेरफार करूं

नवें करूं नये जुनें,
सांभाळावें त्याचें तेणें.
राखावा तो ठाव,
मिरासी करोनि उपाव.
वादें मारी हाका.
देवा आइकवी तुका.

– १५ –

तूं कृपाळू माउली आम्हा दीनांची साउली,
न संरित आली बाळवेशें जवळी.
माझें केलें समाधान रूप गोजिरें सगुण,
निववीलें मन अलिंगन देऊनी.

---

नये. ज्याच्याकडे जें काम असेल तें त्याने सांभाळावें. प्रयत्नपूर्वक ही आपली मिरासदारी रक्षण केली पाहिजे. मी वर्दळीवर येऊन देवास हाका मारतों; आणि हें त्यास ऐकवितों.

तुकारामांस आत्मस्थितिभाव नको. भक्तपणा हा त्यांचा आवडता आहे. 'हें चि दान' तुक्याने अनेकदा मागितलें आहे. परमेश्वराच्या दर्शनाची आर्तता उत्कट रीतीने येथे प्रकट झाली आहे.

१५. देवा, तूं आम्हां दीनांची कृपाळू आई असून आमच्यावर कृपेची सावली करतोस. म्हणूनच त्वरेने तू बाळवेशांत दर्शन दिलेंस. सुंदरसें सगुण रूप धारण करून, मला आलिंगन दिलेंस; त्यामुळें माझें मन शांत असून मी समाधान पावलों. जनांच्या हातून ही माझ्यावर फार मोठी कृपाच झाली ! व संतांनीहि आपल्या पायीं आश्रय दिला ! (लोकांनी मला त्रास दिल्यामुळे, मी तुझी करुणा भाकिली; म्हणून देवदर्शन घडलें. लोकांनी त्रास दिलाच नसता तर तुझें दर्शन घडलें नसतें. तुझें दर्शन घडल्यामुळे संतमंडळींनी माझ्या भगवद्भक्तीस मान्यता देऊन मला आश्रय दिला.) दुःख कसें असतें हें कळूं नये. मी अत्यंत अपराधी आहे. माझे अपराध तूं पोटांत

कृपा केली जना हातीं पायीं ठाव दिला संतीं,
कळों नये चित्तीं दुःख कैसें आहे तें.
तुका म्हणे मी अन्यायी, क्षमा करी वो माझे आई,
आतां पुढे काई तुज घालूं सांकडे.

– १६ –

तूं माउलीहून मयाळ, चंद्राहूनि शीतळ,
पाणियाहूनि पातळ, कल्लोळ प्रेमाचा.

---

घालावेस. यापुढे तुझ्यावर मीं संकट घालूं काय? (अर्थात् मी संकट घालणार नाही.)

तुकारामांच्या प्रासंगिक अभंगांपैकीं हा एक आहे. इंद्रायणीच्या डोहांत, देहूच्या ब्रह्मवृंदाने तुकारामांच्या अभंगांच्या गाथेला जलसमाधि दिली! तुकारामांचें सारसर्वस्व, त्यांची 'अभंग' अशी इस्टेट तिच्यावरून पाणी फिरविलें गेलें! साहजिकच तुकारामांच्या जिवाचेंहि पाणी पाणी झालें.

तुकारामांच्या व्यक्तित्वाचा विकास हा विरोधांतूनच झालेला आहे. व्यक्तींतील गुणांचा प्रकर्ष हा विरोधावांचून होत नाही हा नियम तुकारामांच्या जीवनाने सार्थ करून दाखविला! सामान्यांच्या जीवनांत येणाऱ्या संघर्षांतूनच तुकारामांचें असामान्यत्व जोपासलें गेलें. विरोधाला विरोधाने तोंड न देतां, शांत वृत्तीने तो विरोध सहन करणें, यांतच संतपण आहे. अशा व्यक्तीला परमेश्वराचें सगुण दर्शन झालें असेल यांत शंका वाटत नाही.

१६. हे देवा, तूं आईपेक्षा मायाळू, चंद्रापेक्षा थंड, पाण्यापेक्षा पातळ असणारा प्रेमाचा प्रवाह आहेस. हे सर्वश्रेष्ठ भगवान्, तुला मी दुसऱ्या कोणाची उपमा देऊं? (तूं अनुपमेय आहेस.) मी आपला देह तुझ्या नांवावरून ओवाळून टाकतों. तूं अमृत निर्माण केलेंस, अर्थातच गोड अमृतापेक्षा तूं गोड आहेस. तूं पांचहि महाभूतांचा निर्माता असून सर्वसत्ताधारी आहेस. सर्वसत्ताधारी अशा तुझ्यापुढे मी काय बोलूं? कांही एक न बोलतां मी शांतपणें तुझ्या–

देऊं काशाची उपमा दुजी तुज पुरुषोत्तमा,
ओंवाळूनि नामा तुझ्या वरूनि टाकिलों.
तुवां केले रे अमृता गोड त्या ही तूं परता,
पांचा तत्त्वांचा जनिता, सफळसत्तानायक.
कांही न बोलोनि आतां उगाच चरणीं ठेवितों माथा,
तुका म्हणे पंढरिनाथा क्षमा करीं अपराध.

— १७ —

न देखवे डोळां ऐसा हा आकांत,
परपीडे चित्त दुःखी होतें.
काय तुम्ही येथे नसालसें जालें,
आम्ही न देखिलें पाहिजे हें.

---

पायावर विनम्र भावाने डोकें ठेवतों. माझ्या हातून झालेल्या अपराधांना तूं क्षमा कर.

समाजकंटकांवर तीक्ष्ण शब्दांचा भडिमार करणारे तुकाराम या ठिकाणीं कोमल व हळुवार शब्दांनी ईश्वराची आराधना करतांना दिसतात. पंढरीनाथाचें तुकारामांनी अत्यंत नाजूक शब्दांनी केलेलें हें वर्णन हृद्य आहे. शिवाय या अभंगांत अगतिकता दिसते; हा भावहि मोठा मनोहर आहे. तुकारामांची या अभंगांतील भाषा अमृतापेक्षाहि गोड आहे असेंच म्हणावें लागेल. अरूपाचें वर्णन करतांना शब्द अपुरे पडावेत यांत नवल नाही. अशा वेळीं शब्दांपेक्षा मौनच अधिक अर्थदर्शक असतें.

जिहीं विशेषणीं विशेषिजे, तें दृश्य नव्हे रूप तुझें,
हें जाणे मी म्हणोनि लाजें, वा [illegible] इही ।

अशी कबुली देऊन ' मौनावांचूनि लेणें आंगीं ' दुसरें नाही असा अभिप्राय ज्ञानेश्वरांनी प्रकट केला आहे.

१७. डोळ्यांना पाहवत नाही असा हलकल्लोळ होत आहे दुसऱ्यांना होणाऱ्या दुःखामुळे माझें अंतःकरण कष्टी होतें. काय तुम्ही येथे नसल्यासारखें

परचक्र कोठें हरिदासांच्या वासें,
न देखिजेत देशें राहातिया.
तुका म्हणे माझी लाजविली सेवा,
हीनपणें देवा जिणें जालें.

— १८ —

तुम्हांपाशीं आम्ही येऊनियां काय,
वृथा सीण आहे चालण्याचा.
मागावें हें अन्न तरी भिक्षा थोर,
वस्त्रासी हे थार चिंध्या बिदी.

---

झाले आहांत ? (नाही तर संकट आलेंच नसतें.) आम्हां विष्णुदासांना अशा तऱ्हेचीं संकटें दिसतां कामा नये. हरिदासांच्या सहवासामुळे परचक्र कसें बरें येईल ? एवढेंच नाही तर विष्णुदासांच्या सहवासाने पवित्र झालेल्या देशांत राहणाऱ्या इतर लोकांना देखील दुःख अनुभवास येऊं नये. पण देवा, तुम्ही माझी भक्ति लाजविली; आणि आता हीनदशेचें जिणें नशिबीं आलें ! (लोकांचा माझ्यावरील विश्वास उडेल.)

या अभंगांत तुकारामांची भूमिका कट्टर विष्णुदासाची आहे. विष्णुदासाचें सामर्थ्य तुकारामांस माहीत आहे. आपण विष्णुदास असूनहि ईश्वर आपल्या मदतीस येत नाही हें पाहून त्यांना वाईट वाटतें.

परंपरेप्रमाणे, हा अभंग लोहगावावर परचक्र आलें असतांनाचा आहे. शिवाजीमहाराज एकदा तुकारामांचें कीर्तन ऐकत असतांना ही घटना घडली. त्यांना पकडण्यासाठी यवन अधिकारी आले होते. पण ईश्वरकृपेनें हें संकट निभावलें ! या गोष्टीला ऐतिहासिक प्रमाण उपलब्ध नाही. या अभंगांतील तुकारामांनी वापरलेले शब्द निर्वाणीचे दिसतात. त्यावरून हा प्रसंग जरी खरा असला तरी त्यामागील ऐतिहासिक घटना स्पष्ट होणें आवश्यक आहे.

१८. आम्ही तुमच्याकडे येऊन उपयोग काय ? चालण्याचा व्यर्थ त्रास मात्र होईल ! तुमच्याजवळ अन्नदान मागावें तर भिक्षाच आम्हांस पुरेशी

निद्रेसी आसन उत्तम पाषाण,
वरी आवरण आकाशाचें.
तेथे काय करणें कवणाची आस,
वायां होय नाश आयुष्याचा.
राजगृहा यावें मानाचिये आसे,
तेथे काय वसे समाधान.
रायाचिये घरीं भाग्यवंता मान,
इतरां सामान्या मान नाही.

---

आहे. आणि वस्त्रांच्या बाबतींत चिंध्या हींच आमचीं वस्त्रभूषणें. झोपण्यासाठी दगडासारखी उत्तम शय्या आणि वर आकाशाचें पांघरूण, असें असल्यानंतर कोणत्या गोष्टीची इच्छा करावी ? छे. उलट, त्याने आयुष्याचा नाश होतो. राजदरबारीं मानाच्या आशेने यावे; पण तेथे काय पूर्ण समाधान मिळणार आहे ? राजाच्या घरीं श्रीमंतांना मान असतो. इतर सामान्यांना नसतो. वस्त्र-भूषणांच्या आहारीं गेलेल्या लोकांना पाहून मला तात्काळ मरण येतें (मरणप्राय दु:ख होतें.) आमचें हें स्पष्ट बोलणें ऐकून जर उदास व्हाल तरी हरकत नाही. आम्हां विष्णुदासांचा पालनकर्ता श्रीहरि आमची कधी उपेक्षा करीत नाही. शिवाय नवल असें की, भिक्षेसारखें सुख नाही. तपे, व्रतें, यज्ञ करणारे महाभाग देखील आशाबद्ध असल्यामुळे हीन रीतीनें वागतात ! (आमचें तसें नाही.) मागील जन्मी हरिभक्त असल्यामुळे तुम्ही आज मानाचे श्रीमंत राजे आहांत.

तुकारामांनी शिवाजीराजांना उद्देशून केलेली ही रचना. तुकारामांच्या साधुत्वाची कीर्ति शिवाजी राजांनी ऐकली असेल किंवा प्रत्यक्ष त्यांचें कीर्तनहि ऐकलें असेल. अशा या साधूसाठी त्यांनी 'दिवटया, छत्री, घोडें, अबदागीर पाठवून दिलें व भेटीचें आमंत्रण दिलें ! शिवरायांचें तें आमंत्रण, पण तुकारामांनी त्याला उत्तर दिलें, 'दिवटया, छत्रीं, घोडे हीं आम्हांस बऱ्यांत पडत नाहीत. तुमचें धन आम्हांस मृत्तिकेसारखें आहे. शिवराया,

देखोनिया वस्त्रें भूषणांचे जन,
तात्काळ मरण येतें मज.
ऐकोनिया मानाल उदासता जरी,
तरी आम्हा हरी उपेक्षीना.
आतां हेंचि तुम्हां सांगणें कौतुक.
भिक्षे ऐसें सुख नाही नाही.
तपव्रतयाग महा भले जन,
आशाबद्ध हीन वर्ततातीं.
तुका म्हणे तुम्ही श्रीमंत मानाचे,
पूर्वींचे दैवाचे हरिभक्त.

— १९ —

बाळेविण माय क्षणभरि न राहे,
न देखतां होये कासाविस.
आणिक उदंड बुझाविती जरी,
छंद त्या अंतरीं माउलीचा.

---

तुझें प्रेम मला कळतें, पण वस्त्राविण मलिन झालेली काया, आणि रोडके हातपाय अशी माझी अवकळा; तेथे दर्शनाचा सोहळा तो काय असणार! तरी कृपा करून भेटीची गोष्ट करूं नका; शिवाय, 'तुम्हांपाशीं आम्ही येऊनिया काय, वृथा सीण आहे चालण्याचा.'

विश्वेश्वर गवसल्यानंतर तुकारामांच्या तोंडून ही भाषा निघावी; यांत नवल तें काय?

१९. लहान मूल आईवांचून क्षणभरदेखील राहूं शकत नाही. जर त्याला आई दिसली नाही तर तें कासावीस होतें. इतरांनी त्याला कितीहि समजावण्याचा प्रयत्न केला तरी त्याच्या मनांत आईचाच नाद असतो. (आईचीच

नावडती तया बोल आणिकाचे,
देखोनिया नाचे माय दृष्टी.
तुका म्हणे माझी विठ्ठल माउली,
आणिकांचे बोलीं चाड नाहीं.

— २० —

इच्छिती तयांसी व्हावें जी अरूप,
आम्हासी स्वरूपस्थिती चाड.
आतां नव्हे माझा भाव अनारिसा,
पाउलांनी इच्छा गोवियेली.

---

ओढ असते.) त्याला इतरांचें बोलणें आवडत नाही. उलट आई समोर दिसतांच तें नाचूं लागतें ! माझेंहि तसेंच झालें आहे. माझी माउली विठ्ठल असून मला इतरांच्या बोलण्याचें कांहीच महत्त्व वाटत नाही.

तुकारामांना आता विठ्ठलावांचून दुसऱ्या कशाचाहि ध्यास नव्हता. 'पांडुरंग ध्यानीं पांडुरंग मनीं, जागृती स्वप्नीं पांडुरंग' असा सर्व इंद्रियांतून पांडुरंगाचाच भाव पाझरत होता. अंतःकरणांतील ही तीव्र आर्तता येथे प्रकट झाली आहे.

२०. हे देवा, ज्यांना तुझ्या निर्गुण स्वरूपाची आवड असेल, त्यांच्यासाठी तूं तसा हो. आम्हाला मात्र तुझें सगुण स्थितींतील रूपच हवें. ही माझी इच्छा कधीहि बदलणार नाही. तुझ्या चरणांनी माझी च्छा गंतवून ठेवली आहे. लहान मुलाची मोठ्या माणसाशीं तुलना होऊंच शकत नाही. लहान मुलास दूर सारलें तर तें अधिक बिलगतें. मला तुझ्या नांवाची फार गोडी लागली आहे. कृपा करून माझ्या भक्तिभावाचा भंग करूं नका. मी मुक्तीच्या प्राप्त्यर्थ भक्ति करीत आहें असें समजून आढेवेढे घेशील; पण मी सांगतों, मला मुक्ति नको. ज्यांना मुक्तीची इच्छा आहे अशा पिसाट ब्रह्मज्ञान्यांना तूं चलित कर. माझा भक्तिरस मोक्षापेक्षाहि श्रेष्ठ आहे. पण तूं

लेंकरासी कोठे जाणत्याची परी,
करूं येते दुरी धरावया.
लागली न सुटे नामाची आवडी,
माझी भावजोडी भंगूं नका.
घेसील वेढे मुक्तीच्या अभिळासें,
चाळवीं जा पिसे ब्रह्मज्ञानी.
तुका म्हणे माझा कोठे भक्तिरस,
पाडावया ओस चाळविसी.

– २१ –

नको ब्रह्मज्ञान, आत्मस्थितिभाव,
मी भक्त, तूं देव ऐसें करी.
दावीं रूप मज गोपिकारमणा.
ठेवीन चरणांवरी माथा.

---

त्याला ओस पाडण्यासाठी उगाच चाळवाचाळव करीत आहेस. (तरी माझ्या भक्तिरसाच्या आड येऊं नकोस.)

सगुणभक्तीचा पुरस्कार तुकारामांनी वारंवार केला आहे, त्याला दोन कारणें आहेत. एक तर, सर्वच वैष्णव संतांना सगुण भक्ति अधिक आवडती आहे. 'तूं देव मी भक्त' अशी अवस्था व्हावी यासाठी तुकारामांनी देवास अनेकदा आळविलें आहे. दुसरें कारण तुकाराम ज्यांच्यासमोर आदर्श म्हणून उभे होते तो सामान्य समाज होता. सर्वसामान्य समाजाची नागवणूक होऊं नये, यासाठी संतांनी स्वतःचा आदर्श त्यांच्या डोळ्यांसमोर आचरणानें उभा केला. चंद्रभागेच्या वाळवंटांत सावळ्या विठ्ठलाचें नामसंकीर्तन केलें, आणि 'जनीं' जनार्दनाचा विस्तार केला.

२१. हे देवा, मला ब्रह्मज्ञान नको किंवा निर्गुण स्थितींतील राहणेंहि नको. मी तुझा क्त आणि तूं माझा सगुण देव अशीच स्थिति ठेव. सगुण रूप घेऊन गोपिकांना रमविणाऱ्या भक्तवत्सला, मी तुझ्या पायांवर डोकें ठेवीन.

पाहोनि श्रीमुख देईन आलिंगन,
जीवें निंबलोण उतरीन.
पुसतां सांगेन हितगुज मात,
बैसोनि एकांत सुखगोष्टी.
तुका म्हणे यासी न लावी उशीर.
माझें अभ्यंतर जाणोनिया.

– २२ –

कनकाच्या परियेळीं उजळूनि आरती,
रत्नदीपशोभा कैशा पाजळल्या ज्योती.

---

तुझ्या श्रीमुखाचें दर्शन घेऊन मी तुला आलिंगन देईन; आणि माझ्या पंच-प्राणाचें निंबलोण तुझ्यावरून उतरवून टाकीन. एकांतांत विनोदवचन करीत असतांना, तूं विचारलें असतां, मी तुला माझ्या हिताच्या चार गुजगोष्टीं ऐकवीन. माझें अशा तऱ्हेचें व्याकुळ अंतःकरण ओळखून मला दर्शन देण्यास विलंब लावूं नको.

निर्गुण भक्तीपेक्षा सगुण भक्तीचा पुरस्कार संतांनी केलेला आहे. आत्मज्ञानापेक्षा भक्तिप्रेमसुख अधिक मनोहर आहे अशी त्यांची धारणा होती. 'पुनरपि जननं पुनरपि मरणं' याविरुद्ध असलेले तुकाराम 'याचसाठी जन्म घेईन मी देवा, तुझी चरणसेवा साधावया' असें म्हणतात; तर 'मुक्तपण आम्हा नको देवराया, भेटी मज पाया पुरे बापा,' असे नामदेव उद्गारतात. 'दावी मज रूप गोपिकारमणा' यांतील 'गोपिकारमणा' हें विशेषण साभिप्राय आहे. गोकुळांतील श्रीकृष्णाच्या लीला तुकारामांस हव्या आहेत. निर्गुण परब्रह्म नको होतें. 'आलिंगन,' 'निंबलोण, 'एकान्त ' या शब्दांवरून तुकारामांची भूमिका ही एखाद्या गोपीसारखीच आर्त भक्ताची आहे.

२२. 'सोनियाच्या ताटीं' लावलेल्या आरतीची शोभा ही स्वयंप्रकाशी रत्नदीपाप्रमाणे दिसत असून तींतील ज्योति किती सुंदर प्रज्वलित झाल्या आहेत ! अग बाई, आपण अंतर्बाह्य सुंदर असलेल्या राधा–रुक्मिणी–सत्य-

ओवाळूं गे माय सबाह्य साजिरा,
राहिरखुमाईसत्यभामेच्या वरा.
मंडित चतुर्भुज दिव्य कानीं कुंडलें,
श्रीमुखाची शोभा पाहातां तेज फांकलें.
वैजयंती माळ गळां शोभे श्रीमंत,
शंखचक्रगदापद्म आयुधें शोभत.
सांवळा सकुमार जैसा कर्दळीगाभा,
चरणीचीं नेपुरें वांकी गर्जती नभा.

---

भामा यांच्या पतीस (श्रीकृष्णास) ओवाळूं. त्याच्या चारहि भुजा अलंकारमंडित असून कानांत दिव्य अशीं कुंडलें आहेत. त्याच्या मुखाकडे पाहत असतांना असें दिसतें की, त्याच्या श्रीमुखाचें तेज सर्वदूर पसरलें आहे. मौल्यवान् अशी वैजयंतीमाला त्याच्या गळ्यांत उठून दिसत आहे. आणि शंख, चक्र, गदा व पद्म हीं आयुधें त्याला शोभून दिसत आहेत. हा वर्णाने सावळा असून केळीच्या गाभ्यासारखा नाजूक आहे, त्याच्या पायांतील पैंजण, वाळे यांचा नाद आकाशांत घुमत आहे. अशा त्या श्रीकृष्णाला ओवाळीत असतांना मन जागच्या जागीं स्थिर झालें. त्यामुळे समदृष्टि निर्माण झालेल्या तुकयाला हरिचरणीं समाधि लागली.

तुकारामांचे अभंग लौकिक–अलौकिक, बाह्य-अंतर, घटनांचा चढउतार, आत्मविकासाची वाटचाल, आत्मोद्धाराची तळमळ, इत्यादींची गाथा आहेत. साधकदशेपासून तों समाधीपर्यंत; आणि समाधीपासून तों ‘ तुका आकाशाएवढा ’ होईपर्यंत मनाच्या विविध अवस्थांतून तुकारामांस जावें लागलें. या अभंगांत, तुकारामांस झालेल्या सगुणदर्शनामुळे पुलकित झालेल्या, पूर्ण उमललेल्या त्यांच्या मनाचें दर्शन आपणांस घडतें. त्यांच्या मनश्चक्षूंसमोर श्रीकृष्णाची ती श्यामल मूर्ति उभी आहे. तिचें सर्वांगपरिपूर्ण वर्णन करण्याची तुकारामांची शैली लक्षांत घेण्यासारखी आहे.

आत्मसुखांत लीन झालेल्या तुकारामांचे शब्द किती वेधक आणि वेंचक असतात याचा अनुभव वाचकास येतो.

ओवाळितां मन हें उभें ठाकलें ठायीं,
समदृष्टि समाधि तुकया लागला पायीं.

– २३ –

आधिल्या भ्रतारें काम नव्हे पुरा,
म्हणोनि व्यभिचारा टेकलियें.
रात्रंदिस मज पाहिजे जवळी,
क्षण त्या निराळी न गमे घडी,

---

या अभंगांत तुकारामांनी स्पष्ट केलेला उन्मनी अवस्थेचा अनुभव यापूर्वी अनेक संतांनी चाखला आहे. ' पाहतां पाहतां वेधलेसें मन, जाहलें तें उन्मन दृष्टिभरी ' अशी नरहरी सोनाराची अवस्था झाली होती. एकनाथ तर–

मुखकमळ ज्याचें पहातां सुखाच्या कोटी,
वेधलें मानस, हरपली दृष्टि.
एकाजनार्दनी देखियलें रूप,
रूपचि पाहतां अवघें झालें तद्रूप

असाच अनुभव नोंदवितात.

२३. प्रपंचरूपी पहिल्या पतीच्या सहवासांत माझ्या कामना पूर्ण होत नव्हत्या. म्हणून, मी व्यभिचारास प्रवृत्त झालें. माझा प्रियकर रात्रंदिवस माझ्याजवळ हवा, त्याच्यावांचून एक क्षणभरदेखील मला वेगळें करमत नाही. प्रापंचिकांनो, तुम्हीं माझें नांवगाव सोडून द्या. मी आता ' अनन्ता 'च्या ठिकाणीं रत झालें आहे.

व्यभिचारिणीचें रूपक घेऊन तुकारामांनी आपल्या मनांतील आर्त भावना व्यक्त केल्या आहेत. संसार हा अपूर्ण व सान्त आहे, ही जाणीव तुकारामांस होते. ' अनन्त ' असलेल्या परपुरुषाजवळच सर्व इच्छा पूर्ण होतात; याचा साक्षात्कार तुकारामांस होतांच त्यांनी लौकिकाचा त्याग केला आणि अविनाशी अशा आत्मसुखाचा अस्वाद घेण्यासाठी अलौकिक अशा अनन्ताच्या ठिकाणीं एकरूप झाले. लौकिकाकडून अलौकिकाकडे होणारी तुकारामांची

नामगोष्टी माझी सोय सांडा आतां,
रातलें अनंता तुका म्हणे.

– २४ –

हासो रुसों आतां वाढवूं आवडी,
अंतरींची गोडी अवीट ते.
सेवासुखें करूं विनोदवचन,
आम्ही नारायण एकाएकीं

---

वाटचाल या अभंगांत स्पष्टपणें प्रतीत होते. लोकांच्या दृष्टीने तुकाराम आता संसारांतून उठले आहेत. त्यामुळें लोक त्यांना नांवें ठेवूं लागले. मात्र तुकाराम लोकनिंदेला भिणारे नसल्यामुळे त्यांनी लोकांना ठणकावून सांगितलें, " हो, मी संसार सोडला आहे. संसारापेक्षा बळकट असा दुसरा आधार मला गवसला आहे." या भावार्थासाठी तुकारामांनी घेतलेलें व्यभिचारिणीचें रूप अत्यंत सार्थ आहे. गोकुळांतील गौळणीदेखील अशाच व्यभिचारिणी होत्या. गौळणींचा आणि तुकारामांचा अनुभव या प्रपंचाच्या बाबतींत सारखाच होता. सर्व संतांना देखील हाच अनुभव आला होता. ज्ञानेश्वर स्वतःला ' परपुरुषाशीं व्यभिचारिणी ' समजतात तें याच अर्थानें. व्यभिचारिणीच्या रूपकांतून देवभक्तामधील अव्यभिचारिणी भक्ति प्रकट होते !

२४. आता आम्ही आमचा प्रिय पति देव याच्याबरोबर कधी प्रेमानें हसूं, तर कधी लटक्या रागाने रुसूं. अशा रीतीने परस्पराविषयीं असलेलें प्रेम वृद्धिंगत करूं. अंतरंगांतील सुख हें अवीट असतें. प्रिय पतीची सेवा केल्यामुळे सुखावलेलों आम्ही आणि आमचा प्रियकर नारायण एकान्तांत परस्परांशीं थट्टामस्करी करूं. आम्हीं आमच्या देहाविषयी पूर्णतया उदासीन झालों असल्यामुळे आमचा पति स्वाधीन झालेला आहे.

मागील अभंगानंतरची पुढील पायरी म्हणजे हा अभंग. दुसऱ्या पतीच्या संसाराशीं ती पूर्णतया एकरूप झाली आहे. एवढेंच नव्हे तर पतीच्या सेवे-

तुका म्हणे आम्ही जालों उदासीन,
आपुल्या आधीन केला पति.

– २५ –

धवळले जगदाकार,
आंधार तो निरसला.
लपों जातां नाही ठाव,
प्रगट पाहें पसारा.
खरियाचा दिवस आला,
वाढी बोला न पुरे.
तुका म्हणे जिवें साटीं,
पडिली मिठी धुरेसी

---

मुळें, भक्तीमुळे पति हा तिच्या आधीन झाला आहे. तुकारामांना आत्म-साक्षात्कार झाल्याची ही बोलकी खूण आहे.

२५. सारें जग सच्चिदानंदामुळे प्रकाशित अज्ञानाचा अंधार नाहीसा झाला. सर्वत्र प्रकाशमय झाल्यामुळे लपतां येण्यासाठी जागाच उरली नाही. आज खऱ्या आत्मज्ञानाचा दिवस उगवला आहे. त्याच्या प्रकाशाच्या विस्ताराचें वर्णन केवळ अशक्य आहे. जीवत्वाचा बळी दिल्यामुळे आज परब्रह्मस्वरूपाचा साक्षात्कार झाला आहे.

तुकारामांचे अभंग वाचीत असतांना एका सामान्य मनाने असामान्यत्वाकडे कसा कसा प्रवास केला, याचें चित्र डोळ्यांपुढे उभें राहतें. त्यांच्या अभंगांतून त्यांच्या विकसनशील व्यक्तित्वाचा विमुक्त आविष्कार प्रत्ययास येतो. जसा अनुभव आला, तसें त्यांचे शब्द स्वरूप धारण करतात. साधकदशेंतील, काळोख विरून चिदानंदाची प्रभा अंत:करणांत फाकल्याने त्यांचें जडत्व गळालें व त्यांतील चैतन्य ब्रह्मरूपाशीं एकरूप झालें. अत्यंत तरल, निसटता अनुभव तुकारामांनी येथे शब्दांकित करण्यांत फार मोठें यश मिळविलें आहे.

– २६ –

स्थिरावली वृत्ति पांगुळला प्राण,
अंतरींची खूण पावूनियां.
पुंजाळले नेत्र जाले अर्धोन्मीळित,
कंठ सद्‌गदित रोमांच आले.
चित्त चाकाटलें स्वरूपामाझारीं,
न निघे बाहेरी सुखावलों.
सुनील प्रकाश उदेजला दिन,
अमृताची पान जीवन कळा.
शशिसूर्या जाली जीवें ओवाळणी,
आनंदा दाटणी आनंदाची.

---

२६. आत्मतत्त्वाचा साक्षात्कार झाल्यामुळे वृत्ति स्थिर झाल्या, प्राणांचें कार्य थांबलें. सतेज झालेले नेत्र अर्धवट उघडले गेले; गळा भरून आला, सर्व शरीर रोमांचित झालें. अंत:करण आत्मस्वरूपामध्ये (आत्मरूपदर्शनामुळे) मग्न झालें. तें तेथे इतकें सुखावलें की पुन: बाहेर आलें नाही. सर्वत्र निळसर प्रकाश पडला. त्यामुळे (खरा) दिवस उगवला. त्या दिवसापासून अमृतमय असलेल्या सत्राव्या जीवनकलेंतून स्रवणाऱ्या अमृताचें पान होऊं लागलें. इडा आणि पिंगळा (शशिसूर्या) या नाड्यांची जीवात्म्याला ओवाळणी झाली (जीवनदशा नाहीशी झाली.) त्यामुळे सर्व आनंदरूप झालें ! आता निश्चितपणें समाधान पावलों.

या अभंगांतील परिभाषा कुंडलिनीची आहे. षट्चक्रभेदन करून कुंडलिनी ऊर्ध्वपथाने जात असतांना ही दशा प्राप्त होते. त्यावेळेस शरीरांत एकसारखा अनहत नाद उमटतो. इडा, पिंगळा आणि सुषुम्ना या नाड्यांतून प्राण, ब्रह्मरंध्राकडे जातो. तेथे सतराव्या अमृतकलेंतून अमृताचें पान होतें. या सर्व प्रकारामुळे शरीर पुलकित होतें. डोळ्यांतून आनंदाश्रु वाहतात. महासुखाच्या ब्रह्मरसांत मन तल्लीन होऊन जातें.

तुका म्हणे सुखें प्रेमासी डुलत,
वीरालो निश्चित निश्चितीने.

— २७ —

अनुहातीं गुंतला नेणें बाह्य रंग,
वृत्ति येतां मग बळ लागे.
मदें माते तया नाही देहभाव,
आपुले अवयव आवरितां,
आणिकांची वाणी वेद तेणें मुखें,
उपचार दुःखें नाठवती.

---

ज्ञानेश्वरांनी ह्या अनुभवाचें ह्याच शब्दांत वर्णन केलें आहे.

चित्त चाकाटलें आटु घेत,
वाचा पांगुळली जेथींची तेथ,
आपादकंचुकित,
रोमांच आले ।।
अर्धोन्मीलित डोळे,
वर्षताती आनंदजळें
आंतुलिया सुखोर्मिचेनि बळें
बाहेरी कापे ।।

अशा रीतीने महासुखाच्या ब्रह्मरसामुळे जीवदशा नष्ट होते.

२७. अनुहत नादाच्या ठिकाणीं रममाण झालेल्या अंतर्मुख माणसाला प्रपंचादि बाह्य गोष्टीचें भान नसतें; आणि प्रपंचाबद्दल त्याच्या ठिकाणीं प्रवृत्ति निर्माण होत नाही. ब्रह्मानंदांत परिपूर्ण मग्न झाल्यामुळे तो देह. भावना विसरतो. त्यामुळे आपल्या अवयवांवर त्याचा ताबा नसतो. इतरांची जी सामान्य वाणी, ती त्याच्या मुखांतून वेदवत् होते. अशा स्थितप्रज्ञ व अधिकारी व्यक्तीला दुःखादिक उपचारांचा उपसर्ग पोचत नाही. त्या ब्रह्मानंदाच्या सुखाचें वर्णन इतर सामान्य लोकांना अशक्य, वेडगळपणाचें वाटतें. अशा व्यक्तीचें अंतःकरण ब्रह्मरसानें शांत झालें असल्यामुळे बाह्य उपाधि विठ्ठलरूप दिसतात.

तें सुख बोलतां आश्चर्या या जना,
विपरीत मना भासतसे.
तुका म्हणे बाह्य रंगतो विठ्ठल,
अंतर निवाले ब्रह्मरसें.

– २८ –

आपुलें मरण पाहिलें म्यां डोळा,
तो जाला सोहळा अनुपम्य.
आनंदें दाटली तिन्ही त्रिभुवनें,
सर्वात्मकपणें भोग जाला
एकदेशीं होतों अहंकारें आथिला,
त्याच्या त्यागें झाला सुकाळ हा.
फिटलें सुतक जन्ममरणाचें,
मी माझ्या संकोचें दुरी जालों.

---

या अभंगांत दोन महत्त्वाचे पाठभेद आहेत. 'आणिकांची वाणी वेद तेणें मुखें' या ऐवजीं 'आणिकांची वाणी वदे तेणें मुखें' 'वदे' पाठ स्वीकारल्यास 'तो स्वत:चें कांही एक बोलत नसून त्याचें बोलणें परप्रेरित (ईश्वरप्रेरित) असतें' असा करतां येईल. 'बोलवितां धनी वेगळाचि' असें म्हणतां येईल. तसेंच 'बाह्यरंग तो विठ्ठल' ऐवजीं 'बाह्य रंग ते विटले, असा पाठ आहे. दुसरा पाठ स्वीकारल्यास 'ज्याचें अंत:करण ब्रह्मरसाने शांत झालें आहे अशा माणसाला बाह्य उपाधींविषयी कंटाळा आलेला असतो.' असा करतां येईल. 'विटणें, या शब्दांतून प्रपंचादि बाह्य गोष्टींचें उपभोगमूल्य त्याच्या दृष्टीनें कमी झालें आहे' असा अर्थ निघतो.

स्पष्टीकरणासाठी 'स्थिरावली वृत्ति' हा अभंग पाहा.

२८. मी माझ्या देहबुद्धीच्या मरणाचा सोहळा माझ्या प्रज्ञाचक्षूंनी पाहिला. तो सोहळा खरोखर अतुल होता ! मी विश्वरूप झाल्यामुळे माझा आनंद त्रिभुवनांत मावेनासा झाला. आतापर्यंत मी अहंभावी असल्यामुळे माझो

नारायणें दिला वसतीस ठाव,
ठेवूनिया भाव ठेलों पायीं.
तुका म्हणे दिलें उमटूनि जगीं,
घेतलें तें अंगीं लावूनियां.

– २९ –

धर्म रक्षावयासाठी,
करणें आटी आम्हासि.
वाचा बोलों वेदनीती,
करूं संतीं केलें तें.

---

दृष्टि एकदेशीं (माझ्यापुरती मर्यादित) होती. आज निरहंकार झालों असल्यामुळे ही आनंदाची घडी आली आहे. आता मी ‘ मी व माझें ’ या संकोचशील वृत्तीपासून दूर झालों. व त्यामुळे जन्ममरणाचें बंधन सुटलें. (‘ हें विश्वचि माझें घर ’ अशी व्यापक दृष्टि लाभली.) नारायणाने मला आपल्या पायाजवळ आश्रय दिला. मीहि पायावर श्रद्धा ठेवून सर्वभावें त्याचा दास झालों. त्या परमात्म्यापासून जें मी घेतलें. तेंच आचरणानें तुम्हांस दाखवून देत आहें.

मजेदार विरोधाभासांतून आपल्या जीवनांतील अनुभवविश्व सुंदर रीतीनें या ठिकाणीं तुकारामांनी रेखाटलें आहे. देहबुद्धि नष्ट होणें, अहंभावना नष्ट होणें हेंच मरण असें रूपक कल्पून अभंगाची रचना झाली आहे. ‘ मरणाही आधी राहिलों मरुनी ’ हें कसें याचें विवेचन या अभंगांत आलें आहे. ‘जीवन्मुक्त’ अशी संज्ञा अशांनाच देतां येते. विषयाच्या बाबतींत मेलेलीं हीं माणसें ब्रह्मस्वरूपाच्या बाबतींत जिवंत असतात–जगाच्या कल्याणासाठी !

२९. धर्माचें रक्षण करण्यासाठी आम्हास हा खटाटोप करावा लागतो. आम्ही आमच्या वाणीच्या द्वारें वैदिक नितिधर्माचा प्रचार करूं, आणि मागे संतांनीं जें करून दाखविलें तेंच आचरणांत आणूं. वैराग्याची पूर्ण अवस्था प्राप्त झाली नसतां, कर्माचा त्याग करणारा पाखंडी समजला पाहिजे.

न बाणतां स्थिति अंगीं,
कर्मत्यागी लंड तो.
तुका म्हणे अधम त्यासी,
भक्ति दूषी हरीची.

— ३० —

आम्ही वैकुंठवासी, आलों याचि कारणासी,
बोलिले जे ऋषी, साच भावें वर्ताविया.

---

(विहितकर्मांचें आचरण करणें ही परमेश्वराची भक्ति आहे.) ह्या हरीच्या भक्तींत जो दोष निर्माण करतो, तो नीच होय.

तुकारामांचें अवतारकार्य या दृष्टीनें या अभंगाचें महत्त्व फार आहे. तसेंच या अभंगांतून तुकारामांचा जीवनविषयक दृष्टिकोण स्पष्ट होतो. तुकाराम हे निवृत्तिवादी कीं प्रवृत्तिवादी हा वाद व्यर्थ आहे. तुकाराम निवृत्तीवादीहि नाहींत, किंवा प्रवृत्तिवादीहि नाहींत तर जीवनवादी आहेत. निष्काम कर्मयोगाचा सक्रिय पुरस्कार त्यांनी आपल्या आचरणाद्वारें केला आहे. 'वेदनीति' या शब्दांतून 'वैदिक धर्म' हा अर्थ निघतो. आणि 'संतांनी केलेला त्या धर्माचा आचार' म्हणजे निष्काम कर्मयोग. जगाच्या कल्याणासाठी हे संतमहात्मे स्वार्थ विसरून जातात, जगाला खऱ्या धर्माचें दिग्दर्शन हीच वडीलधारी मंडळी करीत असते. किंबहुना 'येथ वडील जें जें करिती तया नांव धर्मु ठेविती;' असें ज्ञानेश्वरांनी स्पष्ट म्हटलें आहे. निष्काम कर्मयोगाचा पुरस्कार करणाऱ्या या संतश्रेष्ठाने 'स्वकर्मकुसुमाची पूजा' ईश्वराच्या संतोषासाठीं करावी असेंच म्हटलें आहे. स्वकर्म न करणारीं माणसें ही 'गावंढळ' आहेत, असें ज्ञानेश्वरांनी पुनः पुनः सांगितलें आहे. संतांचें सामाजिक कार्य तें हेंच.

३०. वास्तविक आम्ही वैकुठांत राहणारे. पण पूर्वी ऋषिमुनींनी आचार धर्माच्या बाबतींत जें सांगून ठेवलें आहे, तें सचोटीनें करून दाखविण्यासाठी आम्हीं मृत्युलोकांत आलों आहोंत. पूर्वी, संतांनी दाखविलेले हिताचे मार्ग

सांडूं संताचे मारग, आडरानें भरलें जग,
उच्छिटाचा भाग, शेष उरलें तें सेवूं.
अर्थे लोपलीं पुराणें, नाश केला शब्दज्ञानें,
विषयलोभी मन, साधनें बुडविलीं.
पिटूं भक्तीचा डांगोरा, कळिकाळासी दरारा,
तुका म्हणे करा, जयजयकार आनंद.

— ३१ —

परिमळ म्हूण चोळूं नये फूल,
खाऊं नये मूल आवडतें, १

---

अज्ञानामुळे अदृश्य झाले आहेत. ते साफ करून लोकांना दाखवूं. कारण आज जग आडरानाने (दोषांच्या काटचाकुटचांनी) भरलें आहे. साधुसंतांनी ज्या परमार्थमार्गाचें सेवन केलें आहे, त्याचाच उरलेला उच्छिष्ट भाग आम्हीं सेवन करू. पुराणें आहेत, पण त्यांतील रहस्यार्थाचा लोप झाला आहे. पंडित लोक शब्दाचे वरवरचे अर्थ घेतात, आणि त्यामुळे मूळ अर्थाचा नाश झाला आहे. विषयांकित मनें असलेल्या लोकांनी सर्व पारमार्थिक साधनें नष्ट केलीं आहेत. अशा या परिस्थितींत आम्हीं भक्तीचा डंका पिटूं. यामुळे कळिकाळास देखील धाक बसेल. (मग इतर दुष्टांची काय कथा !) अशा तऱ्हेचें भक्तीचें बळकट साधन उपलब्ध झाल्यामुळे तुम्हीं आनंदाने जयजयकार करा.

या अभंगावरून सिद्ध होतें की तुकारामांच्या काळीं आजच्याप्रमाणे वेदपुराणांतून, आपल्या पुस्तकी ज्ञानाच्या बळावर वाटेल तसे निष्कर्ष काढीत असले पाहिजेत. अर्थात् हें तुकारामांस सहन होणें अशक्य. सद्धर्माचा प्रचार आणि प्रसार हें तुकारामांचें अवतारकार्य या अभंगातून स्पष्ट होतें.

३१. फुलाला सुगंध आहे म्हणून त्याला कुस्करूं नये. मूल फार आवडतें आहे म्हणून त्यास खाऊं नये. मोत्याचें पाणी मनोहर असलें तरी त्याची चव घेऊं नये. वाद्य चांगलें आहे म्हणून तें फोडून त्यांतील नाद शोधण्याचा

मोतियाचें पाणी चाखूं नये स्वाद,
यंत्र भेदुनि नाद पाहूं नये. २
कर्मफळ म्हणुनी इच्छूं नये काम,
तुका म्हणे वर्म दावूं लोकां. ३

– ३२ –

सेवितों हा रस वाटितों आणिकां,
घ्या रे होऊं नका राणभरी.
विटेवरी ज्याचीं पाउलें समान,
तोचि एक दानशूर दाता.

---

प्रयत्न करूं नये. हें माझ्या कर्माचें फळ आहे असें समजून एखाद्या गोष्टीचा उपभोग घेऊं नये. हें मर्म आम्ही लोकांना समजावून देऊं असें तुकाराम म्हणतात.

वासनांच्या पूर्ततेची ओढ ही मानवाला अनादि कालापासून आहे. वासनांचा त्याग केला तरच आपल्याला जीवनाचें रहस्य समजूं शकेल. पण आजची स्थिति उलट आहे. लोक वाईट गोष्टी करतात आणि त्याचें समर्थनहि करतात. ते शहाजोगपणें म्हणतात, 'अहो, वाईट काम करण्याची आमची का इच्छा आहे ? पण आमचें कर्म–फळ. त्याला आम्ही काय करणार ?' हा युक्तिवाद सरळ असला तरी घातक आहे. आणि तुकारामांना हेंच वर्म लोकांना दाखवून द्यायचें आहे. कर्मफळ म्हणून जरी भोग उत्पन्न होत असले तरी त्या भोगाबद्दल आसक्ति ठेवतां कामा नये.

३२. मी स्वत: भक्तिरसाचें सेवन करतों व तुम्हांलाहि तोच रस देणार आहें. तो रस तुम्ही यथेच्छ सेवन करा. उगीच रानभर होऊं नका. (इतर साधनांच्या पाठीमागे धावूं नका.) ज्याचीं पावलें विटेवर सारखीं आहेत असा दानशूर विठ्ठलच या रसाचा देणारा आहे. (त्यामुळे हा रस कधीहि संपूं शकत नाही.) जर तुम्ही यांच्या चरणांवर निष्ठा ठेवली तर तुमच्या सर्व इच्छा पूर्ण होतील. आपले संकल्प पूर्ण करवून घेण्यासाठी परमेश्वराची

अनु. क्र. ३३२५२ ... नों. दि. २५।१।५४ ... २५०६४

मनाचे संकल्प पाववील सिद्धी,
जरी राहे बुद्धी याचे पायीं.
तुका म्हणे मज धाडिलें निरोपा,
मारग हा सोपा सुखरूप.

– ३३ –

आम्हा घरीं धन शब्दांचींच रत्नें,
शब्दांचींच शस्त्रें यत्न करूं.
शब्दचि आमुच्या जीवाचें जीवन,
शब्दें वाटूं धन जनलोकां.

---

भक्ति हा सर्वांत सोपा मार्ग आहे, असा निरोप देण्यासाठी भगवंताने मला इथे पाठविलें आहे.

तुकारामांनी निश्चित केलेलें आपलें जीवनकार्य या अभंगांतून स्पष्ट होतें. तुकाराम हे भक्तिसंप्रदायाचे कट्टर प्रचारक. 'पिटूं भक्तीचा डांगोरा' हें ध्येय त्यांच्यासमोर होतें. रानावनांत जाऊन परमेश्वरप्राप्तीसाठी योगादिक साधनें करण्याची गरज नाही, तर केवळ नामसंकीर्तनानेंच तें होऊं शकतें असा विश्वास तुकारामांनी लोकांत निर्माण केला. संसार न सोडतां घर-बसल्या परमेश्वरप्राप्तीचें हें सोपें साधन त्यांनी लोकांस दाखवून दिलें. 'मी ईश्वराचा प्रेषित (दूत) आहें; त्याच्या भक्तीचें रहस्य उकलवून दाखविण्या-साठी मी येथे आलों आहें,' ही तुकारामांची भूमिका, अध्यात्मिक वाटचाल करीत असतांना त्या प्रवासांतील ही परमोत्कर्षाची खूण म्हणून लक्षांत ठेवण्यासारखी आहे.

३३. शब्दांचीं मूल्यवान् रत्नें हें आमच्या घरचें धन आहे. आमचीं शस्त्रें शब्दच असून त्यांच्या बळावर आम्ही प्रयत्न करूं. शब्द आमच्या जीवाचें सर्वस्व आहे. शब्दरूपी धनच आम्ही इतर लोकांना वाटूं. किंबहुना शब्द हाच आमचा देव; आणि त्या शब्दनारायणाची पूजाहि शब्दांनीच !

तुका पाहा शब्दचि हा देव,
शब्देंचि गौरव पूजा करूं.

— ३४ —

घोंटवीन लाळ ब्रह्मज्ञान्याहातीं,
मुक्ता आत्मस्थिती सांडवीन.
ब्रह्मभूत होते काया च कीर्तनीं,
भाग्य तरी ॠणी देव ऐसा.
तीर्थभ्रामकासी आणीन आळस,
कडु स्वर्गवास करिन भोग.

---

शब्दामागे व्यक्तीचें कर्तृत्व उभें असल्यास त्या शब्दाला फार मोल येतें. 'बोले तैसा चाले' अशा व्यक्तींचे शब्द कसे असतात याचें वर्णन वरील अभंगांत केलें आहे. शब्दांचें माहात्म्य अवर्णनीय आहे! शब्दांत देवाचेंहि दर्शन होतें. मात्र शब्दांचा योग्य जाणकार हवा. कबीर म्हणतात, 'शब्द बराबर धन नहीं, जो कोई जानै बोल.'

**३४.** मी ब्रह्मज्ञान्यांना देखील शरण आणीन व मुक्त झालेल्यांना देहस्थिति धरावयास लावीन. कारण कीर्तन करीत असतांना शरीर ब्रह्मस्वरूप होतें व एवढें भाग्य प्राप्त होतें की प्रत्यक्ष परमेश्वर सेवेस हजर असतो! तीर्थाटन करणाऱ्यांना तीर्थांचा कंटाळा (उबग) निर्माण करीन; स्वर्गवास व तेथील सुखोपभोग हे कडू वाटावयास लावीन; ऋषिमुनींकडून त्यांच्या तपाचा अभिमान टाकवीन; आणि कीर्तनामुळे होणाऱ्या पुण्याच्या बळावर यज्ञ व दान यांच्यामुळे होण्याऱ्या पुण्यास लाजवीन. चिरंतन तत्त्वांचा ठेवा असलेला पुरुषार्थ (मोक्ष) हा भक्ति, भाग्य आणि ईश्वरप्रेम यांच्यासह मिळवीन. एवढेंच नव्हे तर या लोकांत राहणाऱ्या लोकांकडून असें वदवीन की, "आम्ही खरोखरच धन्य आहों; अहो, आम्ही प्रत्यक्ष तुकारामास पाहण्याचें भाग्य संपादिलें!"

सांडवीन तपोनिधा अभिमान,
यज्ञ आणि दान लाजवीन.
भक्तिभाग्यप्रेमा साधीन पुरुषार्थ,
ब्रह्मींचा जो अर्थ निजठेवा.
धन्य म्हणवीन येह लोकीं लोकां,
भाग्य आम्हीं तुका देखियला.

– ३५ –

आम्ही जातों आपुल्या गांवा,
आमुचा रामराम घ्यावा.
तुमची आमची हेचि भेटी,
येथुनियां जन्मतुटी.

---

तुकाराम वैकुंठास गेले. तत्पूर्वीचा हा अभंग. नामसंकीर्तन करीत असतांनाच तुकाराम ब्रह्मरूपी लीन झाले. या अभंगांत त्या कीर्तनाचें महत्त्व व स्वतःचा आत्मविश्वास बोलून दाखविला आहे. तुकारामांची आत्मविश्वासाची भाषा कशी धारदार असते, याचें प्रत्यंतर या अभंगांत येतें. या शब्दांच्या मागे तपस्येचे प्रचंड डोंगर उभे आहेत. तुकारामांनी शब्दांतून 'देखीचे पर्वत' कधीच निर्माण केले नाहीत. ह्या अभंगांत तुकारामांच्या व्यक्तित्वाचा कळस झाला आहे. 'भाग्य आम्हीं देखियला' असें इतरांनी म्हणावें, यांत 'तुका झालासे कळस' यांचें प्रत्यंतर येतें. रामेश्वरभट्टांनी म्हटल्याप्रमाणें–

'तुकितां तुळणेसी ब्रह्म तुकासी आलें,
म्हणोनि रामेश्वरीं चरणीं मस्तक ठेविलें.'

अशीच आपली स्थिति होते.

३५. आता, मी माझ्या मूळ गावाला जातो. माझा शेवटचा नमस्कार आपण स्वीकारावा. आम्हाला यापुढे जन्मास येणें नसल्यामुळे तुमची आमची हीच शेवटची भेट. तुमच्या पायां लागून एकच विनवणी करतों की, माझ्यावर

आतां असों द्यावी दया,
तुमच्या लागतसें पायां.
येतां निजधामीं कोणी,
विठ्ठल विठ्ठल बोला वाणी.
रामकृष्ण मुखीं बोला,
तुका जातो वैकुंठाला.

– ३६ –

हें चि दान देगा देवा,
तुझा विसर न व्हावा.

---

कृपालोभ असू द्या. निजधामाला येतांना प्रत्येकाने विठ्ठल विठ्ठल म्हणावें, रामकृष्णांच्या नांवांचा गजर करा. आता तुकाराम वैकुंठाला जात आहे.

भावनांना हालविणारा तुकारामांचा हा अभंग अनन्यसाधारण आहे. शेवटचा दिवस गोड होण्याकरिता तुकारामांनी जीवनांत अनेक संकटांना तोंड दिलें. वैकुंठाची वाटचाल करीत असतांना, ज्यांनी वाटेंत काटे पसरविले त्या शत्रूंनाहि मित्र समजून त्यांनी वागणूक दिली. ज्यांचे अंगीं मोठेपण आहे, त्यांचा मार्ग यातनांनी भरलेला असतो, अशी त्यांनी मनाशी खूणगाठ बांधली. साक्षात्कार झाल्यानंतरहि लीनतेचा त्याग केला नाही. निजधामास निघेपर्यंत जनहिताची कळकळ बाळगणारे तुकाराम धन्य होत ! भावनेनें आर्द्र झालेला तुकारामांचा हा अभंग तुकारामांचा आत्मविश्वासहि दाखविणारा आहे. ‘ अंत:काळीं विठो आम्हासी पावला, कुडीसहित झाला गुप्त तुका ’ या म्हणण्यांत सत्यासत्य काय हा विवादास्पद प्रश्न आहे हें खरें; पण तुकारामांचें व्यक्तिमत्व आकाशाएवढें विकसित व व्यापक झालें होतें. ‘ विरालों निश्चित निश्चितीने ’ अशी स्थिति त्यांची झाली होती.

३६. तुझा विसर पडू नये, हेंच एक दान मला दे. मोठ्या आनंदाने तुझें गुणगान करीन. तेंच माझें सर्वस्व होय ! मला संपत्ति किंवा मोक्ष

गुण गाईन आवडी,
हे चि माझी सर्व जोडी.
न लगे मुक्ति आणि संपदा,
संत संग देईं सदा.
तुका म्हणे गर्भवासी,
सुखें घालावें आम्हासी.

– ३७ –

मऊ मेणाहून आम्ही विष्णुदास
कठिण वज्रास भेदूं ऐसे.

---

यांचा लोभ नाही. फक्त संतांचा सहवास सतत दे. इतकें दान दिल्यावर मग खुशाल मला जन्माला घाला.

तुकारामांची कविता ही सहजोद्गारांसारखी वाटते. आबालवृद्धांना वेड लावणाऱ्या या अभंगांतून तुकारामांचें अलौकिक व्यक्तिमत्त्व दृष्टींत भरतें. देवानें त्यांना मागणें मागण्याचा आग्रह केला असेल ! पण मागण्याच्या बाबतींत तुकारामांचें निश्चित धोरण ठरलें होतें. ‘ कांही मागणें हें आम्हां अनुचित, वडिलांची रीत जाणतसों. ’ तुकारामांनी इतकें निक्षून सांगितल्यावरहि देवाचा आग्रह चालूच असेल. म्हणून वरील मागणें तुकारामांनी मागितलें. त्यांतील शब्द फार महत्त्वाचे आहेत. दान द्यावयाचें असेल तर ‘ हेंचि ! ’ (इतर दिल्यास घेणार नाही.) भक्तीच्या जोडीला संतसंग मागण्यांतहि फार कुशलता दिसून येते. संतांच्या सहवासांत भक्तीची गोडी आणखीच वाढते. इतकेंच विचारपूर्वक मागणें मागितल्यानंतर पुनर्जन्माची भीति ती काय ? त्यासाठी एकच जन्म काय,–

घेईन जन्मांतरें, हेंचि करावया खरें.

३७. आम्ही विष्णुदास मेणाहून मऊ आहोंत; पण प्रसंगविशेषीं अभेद्य अशा वज्रासहि फोडून टाकूं, इतके कठीण आहोंत. शरीराच्या विषयाच्या संदर्भांत आम्ही मेलेले असलों तरी आत्मज्ञानाच्या दृष्टीने जिवंत आहों. संसाराच्या बाबतींत आम्ही झोपलेले असलों तरी परमार्थाच्या बाबतींत जागृत

मेले जित असो, निजोनियां जागे,
जो जो जें जें मागे तें तें देऊं.
भले तरि देऊं कासेची लंगोटी,
नाठ्याळा चि गांठी देऊं माथा.
मायाबापाहून बहु मायावंत,
करूं घातपात शत्रूहूनि.
अमृत तें काय गोड आम्हांपुढे,
विष तें बापुडे कडू किती.
तुका म्हणे आम्ही अवघेचि गोड,
ज्याचें पुरे कोड त्याचे परी.

---

आहों. जो जें मागेल त्याला तें देण्याइतके आम्ही उदार आहों. मागणारा सज्जन असेल तर त्याला कासेची नेसती लंगोटीहि देण्यास आम्ही तयार असतों; पण दुष्टाला मात्र त्याच्या डोक्यांत काठी घालून शासन करूं. आम्ही आईबापांपेक्षा मायाळू आहोंत; पण प्रसंगीं शत्रूपेक्षाहि जास्त घात करूं. वास्तविक आमच्या वागणुकीपुढे अमृताची गोडीदेखील फिकी वाटेल; पण प्रसंगीं विषानेहि लाजावें इतकी घातक वागणूक असते आमची. वास्तविक आम्हीं संपूर्णपणें गोड आहोंत. ज्याची जशी इच्छा असेल तशी आमच्याकडून पूर्ण होईल.

विष्णुदासांचीं मनें कशीं अतर्क्य असतात, याचें दर्शन या अभंगांत विस्ताराने होतें. समोरचें पात्र पाहून दान बदलविणारे हे महात्मेच समाजाची धारणा करीत असतात. नाही तर दुष्टांकडून अशा समाजोद्धारकांचा नाश होण्यास कांही वेळ लागणार नाही. साधूंचीं मनें कशीं आत्यंतिक असतात, हें विरोधाभासाने सुंदर पटवून दिलें आहे.

इतर गाथ्यांत तिसऱ्या चरणाचा उत्तरार्ध, 'नाठाळाचे काठी देऊं माथां' असा आहे. अर्थाच्या दृष्टीने तो सुगम आहे.

– ३८ –

विष्णुमय जग वैष्णवांचा धर्म,
भेदाभेदभ्रम अमंगळ.
अइका जी तुम्ही भक्त भागवत,
कराल तें हित सत्य करा.
कोणा ही जिवाचा न घडो मत्सर,
वर्म सर्वेश्वरपूजनाचें.
तुका म्हणे एका देहाचे अवयव,
सुखदु:ख जीव भोग पावे.

३८. वस्तुवस्तूंतील श्रेष्ठकनिष्ठपणाच्या चुकीच्या कल्पनांतून निर्माण होणारे भेदाभेदाचे भ्रम हे अपवित्र आहेत. या जगांतील सर्वच वस्तू विष्णुमय, आणि म्हणून एकसारख्या, आहेत असें मानणें हाच खरा वैष्णवांचा धर्म आहे. भगवंताच्या भक्तांनो, माझें सांगणें तुम्हीं नीट ऐका. तुम्हांला जें कांही करावयाचें असेल तें शाश्वत कल्याण करणारें होईल असें करा. कोणत्याहि प्राणिमात्राचा द्वेष करूं नका. (कारण सर्व विष्णुमय आहे.) यांत परमेश्वराच्या पूजनाचें मर्म साठविलेलें आहे. हातपाय वगैरे एकाच देहाचे अवयव असल्यामुळे त्यांना होणाऱ्या सुखदु:खाचा अनुभव हा जीवात्म्याला येतोच.

येथे, तुकारामांनी जग व ईश्वर यांतील एकरूपता (अद्वैत) स्पष्ट केली आहे. सर्व प्राणिमात्र हे ईश्वराचेच अंश असल्यामुळे त्यांचा द्वेष करणें किंवा त्यांना दु:ख देणें हें पर्यायानें परमेश्वराचा द्वेष करणें किंवा परमेश्वराला दु:ख देणें होय. म्हणून ज्याला वैष्णवधर्माचें पालन करावयाचें असेल त्यांनी हें मर्म समजावून घेतलें पाहिजे. केवळ गंध, माळा हीं भूषणें वैष्णवत्व प्राप्त करून देत नाहीत. ('एक बोटाची निशाणी' हा अभंग पाहा.)

– ३९ –

विष्णुमय सर्व वैष्णवासी ठावें,
येरांनी वाहावे भार माथां.
साधनें संकटें सर्वांलागीं सीण,
व्हावा लागे क्षीण अहंमान.
भाव हा कठीण वज्र हें भेदवे,
परि न छेदवे मायाजाळ.
तुका म्हणे वर्म भजनेंचि सांपडे,
येरांसी तों पडे ओस दिशा.

---

३९. हें सर्व विश्व विष्णुमय कसें आहे याचा प्रत्यय फक्त विष्णुभक्त (वैष्णव) यांनाच येतो. इतरांनी केवळ शाब्दिक ज्ञानाचा भार डोक्यावर वाहावा. ईश्वराच्या प्राप्तीकरिता वापरलेलीं निरनिराळीं साधनें हीं संकटेंच आहेत, त्यामुळे ईश्वरप्राप्ति न होतां, शारीरिक, मानसिक शीण मात्र होतो. ईश्वरप्राप्तीसाठी अहंकार नष्ट व्हावा लागतो तोंपर्यंत या साधनांचा उपयोग नाही. अहंकाराचा नाश करणें हीं गोष्ट सोपी नाही. एक वेळ अभेद्य समजल्या जाणाऱ्या वज्राचा भेद करतां येईल; परंतु हें मायाजाळ, हा अहंकार यांचा समूळ नाश करणें कठीणच. हें वर्म फक्त ईश्वरभजनानेच सापडूं शकेल. इतर साधनांना दिशा ओस पडतील. (त्यांना कांहीच प्राप्त होऊं शकणार नाही.)

तुकारामांनी भक्तिमार्गाचें माहात्म्य या अभंगांत वर्णन केलें आहे. भक्तियोग हा असा योग आहे की यानेच अहंभाव नष्ट होऊं शकतो; व अहंभाव नष्ट झाल्याशिवाय परमेश्वरप्राप्ति कोठली ? ज्याची वृत्ति भक्तीच्या योगानें विश्वरूप झालेली आहे त्या ज्ञानी भक्तास ईश्वर-प्राप्ति होते. एवढेंच नव्हे तर भगवान श्रीकृष्ण म्हणतात,

मग याहीवरी पार्था, माझ्या भजनाची आस्था
तरी तेयातें मी माथां, मुकुट करी.

– ४० –

दीप घेऊनियां धुंडिती अंधार,
भेटे; हा विचार अघटित. १
विष्णुदास आम्ही न भ्यों कळिकाळा,
भुलों मृगजळा न घडे तें. २
उधळितां माती रविकळा मळे,
हें कैसें न कळे भाग्यहीना. ३
तुका म्हणे तृणें झाके हुताशन,
हें तव वचन वाउगें चि. ४

---

४०. दिवा हातांत घेऊन काळोखाचा शोध घ्यावयाचा ठरविलें तर तो सापडेल हा विचार चमत्कारिक आहे; ही न घडणारी घटना आहे. धूळ उडविल्याने सूर्याचें तेज मळत नाही हें ह्या दुर्दैवी लोकांना कसें कळत नाही? गवताने अग्नि झाकतां येईल हें बोलणें व्यर्थच होय. तद्वत् आम्हीं विष्णुदास संसाराच्या मृगजळाला फसूं ही गोष्ट अशक्यच. आम्ही विष्णुदास कळिकाळालादेखील भीत नाही.

या अभंगांत विष्णुदासाचें श्रेष्ठत्व वर्णिलें आहे. आत्मानुभवाचें सामर्थ्य पुरतें अंगीं बाणलें म्हणजे डोळ्यांसमोर असलेलें मायेच्या रूपाचें पटल दूर सरतें. ईश्वराचें असीम रूप इवल्या डोळ्यांत साठवितां येतें. पण हें भाग्य साऱ्यांनाच लाभतें असें नाही. काही दुर्दैवी लोक असे असतात की धुळीने सूर्य मळेल अशी अपेक्षा ते करतात. पण तें शक्य नसतें. ज्ञानप्रभा अंतःकरणांत फाकलेली नसल्याने त्यांना हें कळत नाही. मग 'कळिकाळाला देखील भिणार नाही' असें सामर्थ्य विष्णुदासावांचून इतरांना कसें येणार? 'तुका म्हणे तेथें पाहिजे जातीचे.'

– ४१ –

ब्रह्मज्ञान दारीं येतें काकुळती,
अव्हेरिलें संतीं विष्णुदासीं.
रिघों पाहे माजीं बळें त्याचें घर,
दवडिती दूर म्हणोनिया.
तुका म्हणे येथे न चले सायास,
पडिलें उदास त्याच्या गळां.

– ४२ –

वैष्णव तो जया,
अवघी देवावरी माया.

---

४१. संतांनी आपला स्वीकार करावा म्हणून ब्रह्मज्ञान त्यांच्याकडे अगदी दीनपणें येतें. परंतु विष्णूच्या भक्तांनी त्याला दूर ढकललें. संत त्याला दूर सारतात म्हणून तें आणखी हट्टानें त्यांच्या घरांत प्रवेश करूं पाहतें. वास्तविक पाहतां, ब्रह्मज्ञान मिळविण्यास इतरांचें प्रयत्न देखील अपुरे पडतात. उलट ब्रह्मज्ञानाच्या बाततींत उदासीन असलेल्या संतांच्या गळयांत तें आपणहून पडतें !

विष्णूचे दास किती सामर्थ्यशाली असतात, याचें विवेचन स्वानुभवावरून तुकारामांनी प्रतिपादिलें आहे. विष्णूच्या भक्तांना ब्रह्मज्ञानासाठी झोळी पसरावी लागत नाही. विष्णूचे भक्त दिसतात भोळे, ' पण त्यांचे पायीं ज्ञान लोळे ! '–स्वत: तुकाराम कट्टर वैष्णव. या वैष्णवाचें सामर्थ्य कसें ?–

'तुका सहज बोले वाणी,
त्याचे घरीं वेदान्त वाहे पाणी. '

४२. ज्याचें सर्व प्रेम देवावर केंद्रित झालें आहे, ज्याला (देवाशिवाय) इतर कोणतीहि गोष्ट सारभूत वाटत नाहीं, ज्याला शरीर, पैसा, लोक यांचा मोह पडत नसून तीं तृणवत् वाटतात, जो कठीण संकटें आलीं असतांनाहि

नाहीं आणिक प्रमाण,
तन धन तृण जन.
पडतां जड भारी,
नेमा न टळे निर्धारीं.
तुका म्हणे याती,
हो का तयाची भलती.

– ४३ –

जे कां रजलें गांजलें,
त्यासि म्हणे जो आपुलें.

---

ईश्वरोपासनेच्या नेमांत निश्चितपणें खंड पडूं देत नाही, तोच खरा वैष्णव होय; मग त्याची जात कोणती का असेना !

या अभंगांत खऱ्या वैष्णवांचीं लक्षणें तुकारामांनी स्वानुभवावरून स्पष्ट केलीं आहेत. तुकाराम जरी कुणबी होते तरी ते खरे वैष्णव होते. शिवबानें दिलेलें धन तुकारामांनी अव्हेरिलें हें प्रसिद्धच आहे. 'सोनें आणि माती, आम्हा समान हें चित्ती' अशी त्यांची धारणा. प्रत्यक्ष आचरणाने तुकारामांनी जनतेसमोर आदर्श उभा केला होता. देवासाठी केलेला निर्धार हा कोणत्याहि कारणामुळे मोडतां कामा नये. प्रसंगीं प्राण गेला तरी हरकत नाही, पण या नेमाचें पालन झालेंच पाहिजे. तरच देवाशीं मैत्री होऊं शकेल. देव तुमची भक्ति पाहतो; जात नव्हे. म्हणून रामदासांनी म्हटल्याप्रमाणे—

देवाच्या सख्यत्वासाठीं, पडाव्या जीवलगासि तुटी,
सर्व अर्पावें शेवटीं, प्राण तोही वेचावा.

असा निर्धार हवा.

४३. रंजल्या–गांजलेल्यांना जो प्रेमाने आपलें म्हणतो, त्यालाच साधु समजावें आणि त्याच्या ठिकाणीं देवाची वसति आहे, असें जाणावें. या सज्जनांचें चित्त लोण्याप्रमाणे अंतर्बाह्य मऊ असतें. निराधारांना जो प्रेमाने हृदयीं धरतो, (आपले समजून त्यांच्यावर प्रेम करतो,) आणि सेवका-

तोचि साधु ओळखावा,
देव तेथें चि जाणावा.
मृदु सबाह्य नवनीत,
तैसें सज्जनाचें चित्त.
ज्यासि आपंगिता नाही,
त्यासि धरी जो हृदयीं.
दया करणें जें पुत्रासी,
तेचि दासां आणि दासी.
तुका म्हणे सांगू किती,
तोचि भगवंताची मूर्ती.

---

दिकांवर जो पुत्रवत् दया दर्शवितो, त्याच्याविषयी मी आणखी काय सांगू ? अहो, तो भगवंताची प्रत्यक्ष प्रतिमाच आहे.

साधु कसा असावा ह्याचें दिग्दर्शन तुकारामांनी स्वानुभवाने या अभंगांत दिलें आहे. सर्वत्र प्रेममय दृष्टि हें साधुत्वाचें पहिलें लक्षण. " वैष्णव जन तो तेणे कहीए, जो पीड पराई जाने रे " असें नरसी मेहत्याने उत्कटपणें म्हटलें आहे; ते 'जे कां रंजले गांजले ' या ओळीवरून आठवतें. पीडिताविषयी अपार सहानुभूति आणि सर्वत्र समदृष्टि वैष्णवाला लाभली असल्यामुळेच त्याची आध्यात्मिक उंची वाढली असें म्हणतां येईल.

'रंजले गांजले' यांतील 'रंजले' या पदाच्या अर्थाविषयी मतभेद आहेत. 'रंजले' म्हणजे 'सुखी समाधानी' असा अर्थ घेऊन, " सुखी असो कीं दुःखी असो " असा पहिल्या चरणाचा अर्थ करतां येईल. रंजन यांतील संस्कृत धात्वर्थ लक्षांत घेतां हाच अर्थ योग्य वाटतो. असा अर्थ घेतल्यास 'कां' या पदाचा 'किंवा' असा अर्थ घेतां येतो.

उलट 'रंजले' या शब्दाचा 'रंजीस आलेले' असा अर्थ (रज्ज् हा मूळ शब्द फार्शी धरून) केला असतां, 'रंजले गांजले' या शब्दांत द्विरुक्ति होते आणि 'कां' या पदाला कांहींच अर्थ उरत नाही. म्हणून पहिला अर्थ स्वीकरणीय समजावा.

— ४४ —

हिरा ठेवितां ऐरणीं,
वांचे, मारितां जो घणीं.
तोचि मोल पावे खरा,
करणीचा होय चुरा.
मोहरा होय तोचि, अंगें,
सूत न जळे ज्याचें संगें.
तुका म्हणे तोचि संत,
सोसी जगाचे आघात.

---

४४. ऐरणीवर ठेवून घणाचे तडाखे दिले असतांनाहि फुटत नाही, तोच खरा हिरा होय. कृत्रिम असला तर त्याचें केंव्हांच चूर्ण होतें. ज्याच्या अंगाभोवतीं गंडाळलेलें सूत अग्नीमुळे देखील जळत नाही तोच खरा मोहरा होय. त्याप्रमाणे लोकनिंदेचे घाव जो सहन करतो, तोच खरा संत होय.

संत हे जगाच्या कल्याणाकरिता अवतरलेल्या विभूति होत. जगांत व्यक्ति तितक्या प्रकृति. त्यामुळे कांही संतांची स्तुति करतात, तर कांही त्यांची निंदा करतात. कांही लोक अज्ञानामुळे संतांना त्रासहि देतात. पण हें सारें अज्ञानामुळे आहे, असें समजून संतांनी तें सहन केलें पाहिजे. तद्वत् लोकांचीं दुःखेंहि संतांनी सहन केली पाहिजेत. यांतच खरें संतपण आहे. ज्ञानेश्वर, एकदा, लोकांवर रागावून घरांत जाऊन बसले व त्यांनी दार लावून घेतलें. त्यावेळेस मुक्ताबाईने त्यांची घातलेली समजूत संतपणावर उत्कृष्ट प्रकाश टाकते.

योगी पावन मनाचा, साही अपराध जनाचा
विश्व रागें झालें वह्नि, संतें सुखें व्हावें पाणी.

– ४५ –

शुद्ध बीजा पोटीं,
फळें रसाळ गोमटीं. १
मुखीं अमृताची वाणी,
देह वेचावा कारणीं. २
सर्वांगीं निर्मळ,
चित्त जैसें गंगाजळ. ३
तुका म्हणे जाती,
ताप, दर्शनें विश्रांती. ४

---

४५. शुद्ध बीं असलें तर त्यापासून निर्माण होणाऱ्या वृक्षवेलींना रसाळ व व सुरेख फळें येतात. त्याचप्रमाणे दुसऱ्याला चैतन्य देणारे अमृतमय गोड शब्द बोलावे, आणि शरीर सत्कारणीं खर्च करावें. गंगेचें पाणी जसें आंतून-बाहेरून निर्मळ असतें, तद्वत् आपण आपलें चित्त शुद्ध राखावें. अशा पवित्र माणसाच्या दर्शनाने विविध ताप नाहीसे होऊन मनाला शांति प्राप्त होते.

सज्जनाच्या संगतीचें महत्त्व तुकाराम सांगतात. व्यक्तीला प्राप्त होणारें पावित्र्य, शुचित्व हें विचार, उच्चार आणि आचार यावर अवलंबून असतें. तुकारामांनी ह्या तीनहि गोष्टींचा येथे उल्लेख केला आहे. 'मुखीं अमृताची वाणी' म्हणजे गोड उच्चार, मधाळ बोलणें. निर्मळ चित्त म्हणजे शुद्ध व पवित्र विचारांचें माहेरघर; आणि 'देह वेचावा कारणीं' म्हणजे प्रत्यक्ष कार्य, आचार. अशीच व्यक्ति महान् होते. तिच्या जीवनांतच उदात्त मूल्यांची जोपासना होते. अशांच्या संगतींत शरीर, मन आणि आत्मा यांचे आधिभौतिक, आधिदैविक आणि आध्यात्मिक ताप शांत होऊन विश्रांति मिळते.

— ४६ —

चंदनाचे हात पाय ही चंदन,
परिसा नाहीं हीन कोणी अंग.
दीपा नाहीं पाठीं पोटीं अंधकार,
सर्वांग साकर अवघी गोड.
तुका म्हणे तैसा सज्जनापासून
पाहतां अवगुण मिळे चि ना

— ४७ —

गंगाजळा पाहीं पाठी पोट नाही,
अवगुण कांही अमृतासी.

---

४६. चंदनाच्या झाडाच्या फांद्या, मूळ यांचेहि गुणधर्म चंदनाप्रमाणेच असतात. परिसाचा कोणताहि भाग हीन दर्जाचा नसतो. दिव्याला मागे पुढे कोठेच अंधार नसतो. साखरेचा कण न् कण गोड असतो. सज्जनाचेंहि तसेंच आहे. शोध करूनहि त्यांच्या ठिकाणीं दोष सापडत नाही.

या अभंगांत तुकारामांनी चार दृष्टान्ताचा वापर केला आहे. त्यांच्याद्वारें त्यांना सज्जनाचें सर्वांगीण महत्त्व पटवून द्यावयाचें आहे. प्रश्न असा आहे की, तुकारामांनी हे चार दृष्टान्त कशाला दिले? दृष्टान्ताकरिता दृष्टान्ताची योजना तुकाराम कधीहि करीत नाहीत. तुकाराम प्रत्येक दृष्टान्त हेतुपूर्वक वापरीत असल्याचें दिसून येतें. चंदनदृष्टान्ताने, 'गंध', परिस दृष्टान्ताने 'स्पर्श', दीप दृष्टान्ताने 'रूप' आणि साखरेच्या दृष्टान्ताने 'रस' यांची जाणीव रसिकास होते. तुकारामांची दृष्टान्तयोजना किती सूक्ष्म असते हें यावरून कळून येईल.

४७. गंगेचें पाणी तळापासून पृष्ठभागापर्यंत स्वच्छ असतें; अमृताच्या ठिकाणीं कोणताच दोष नसतो. सूर्य, दिवा, हिरा यांना अंधार काय ठाऊक?

रवि दीप काळिमा काय जाणे हिरा,
आणिकां तिमिरां नाश तेणें.
कर्पूर कांडणी काय कोंडा कणी,
सिंधु मिळवणी काय चाले.
परिस चिंतामणि आणिकांचा गुणी,
पालट लागोनि नव्हे तसा
तुका म्हणे तैसे जागा संतजन,
सर्वत्र संपूर्ण गगन जैसें.

— ४८ —

कस्तुरीचे अंगीं मीनली मृत्तिका.
मग वेगळी कां येईल लेखूं.

---

ते इतरांच्या ठिकाणीं असलेला अंधार दूर करणारे आहेत. कापूर कितीहि कांडला तरी त्यांतून कोंडा बाहेर येईल काय ? समुद्रांत पाण्याची आणखी भर घातली तरी काय उपयोग ? परिस, किंवा चिंतामणि हे इतरांच्या स्पर्शामुळे पालटणारे नव्हते. आकाश ज्याप्रमाणे सर्वत्र पूर्णपणे व्यापलेलें आहे, तद्वत् संत सज्जन संपूर्णतया गुणांनीच भरलेले असतात.

संतस्तुति हा या अभंगाचा विषय. संतांच्या ठिकाणीं सर्वच सद्‌गुण आहेत. त्यांच्या अंगीं निरनिराळे सद्‌गुण कसे कसे आहेत हें निरनिराळ्या दृष्टान्तांच्या साह्याने पटवून दिलें आहे. गंगाजळासारखे पवित्र, अमृतासारखे गोड आणि सजीवक, सूर्यासारखें ज्ञानरूपी प्रकाश देणारे, कापरासारखे सत्त्वशील, सागरासारखे परिपूर्ण, परिस–चिंतामणीसारखे सुखद, आणि गगनाप्रमाणे सर्वदूर समभावाने वागणारे हे संत ! या संतांजवळच जीवनमूल्यांची ठेव जोपासली जाते. उदात्त, उच्च जीवनमूल्यांचा प्रचार ते आचरणाद्वारें करीत असतात. अशा संतांच्या ठिकाणीं देवच वास करीत असतो.

४८. कस्तुरीमध्ये माती मिसळविल्यानंतर तिला कमी प्रतीची म्हणतां येईल काय ? तद्वत् देव आणि भक्त यांच्यामध्ये भेद नाही. (द्वैत नाही.) त्यांच्या

तयापरि भेद नाही देवभक्तीं,
संदेहाच्या युक्ति सरों द्याव्या.
इंधने तें आगीं संयोगाच्या गुणें,
सागरा दरुषणें वाहाळ तों चि.
तुका म्हणे माझें साक्षीचें वचन,
येथें तों कारण शुद्ध भाव.

— ४९ —

नाही काष्ठाचा गुमान
गोवी भ्रमरा सुमन.
प्रेम प्रीतीचें बांधलें,
तें न सुटे कांहीं केलें.

---

अद्वैताविषयी शंका पुरे झाल्यात ! उदाहरणार्थ, इंधनाचा अग्नीस संबंध आला असतां तें अग्निमय होतें किंवा ओहळ सागरास मिळतांक्षणींच सागरमय होऊन जातो. देव–भक्त यांच्यांत निर्माण होणाऱ्या अभेदास शुद्ध भावच कारणीभूत आहे. हे माझ्या अनुभवाचे बोल मी बोलत आहें.

अनुभवाला आलेल्या सत्याचें दर्शन कोणताहि संदेह मनांत न ठेवतां तुकाराम त्याचें वर्णन करतात, ' मी माझ्या अनुभवाचे बोल बोलत आहें ' आत्मविश्वासाचे उद्‌गार त्यांच्या काव्यांत अन्यत्रहि पुष्कळ दिसतात. शुद्ध भाव असल्यास ईश्वरदर्शन कांही अशक्य नाही. शुद्ध भावामुळे देव–भक्तांतील द्वैत नष्ट होऊन त्यांच्यांत एकात्मता निर्माण होते; हें तुकारामांच्या आत्मचरित्रावरून दिसून येईल.

४९. कठीण अशा लाकडाची तमा न बाळगणाऱ्या भुंग्याला फूल मात्र आपणांत सहज गुंतवून ठेवतें ! प्रेमबंधन हें कांही केलें तरी सुटत नाही हेंच खरें. लहान मूल आपल्या बापाच्या उपरण्याच्या पदरास पिळा घालून त्याला उभें करतें. मुलापेक्षा अधिक बलवान् बाप देखील लहान मुलाच्या प्रेमापुढे

पदरी घाली पिळा,
बाप निर्बळ साटी बाळा.
तुका म्हणे भावें,
भेणें देवें आकारावे.

---

हतबल होतो. भक्तांच्या प्रेमभावाच्या भीतीमुळे निर्गुण देवालासुद्धा अवतार घ्यावा लागतो !

या जगांत प्रेमाइतकें उच्च, उदात्त कांही नाही. किंबहुना प्रेमापुढें प्राण देखील तुच्छ वाटतात. टणक अशीं लाकडें कोरण्यांत पटाईत असलेला भुंगा मऊ अशा पुष्पांत हतबल ठरतो. प्राण गेला तरी हरकत नाही; पण आपल्या प्रिय वस्तूला त्रास होऊं नये यासाठी तो किती दक्षता घेतो; याचें दर्शन या दृष्टान्तांत घडतें. म्हणून भ्रमराचा हा दृष्टान्त संतकवींचा फार आवडता आहे.

जैसें भ्रमर भेदी कोडें । भलतैसे काष्ट कोरडें.
परि कलिके माजी सांपडे । कोवळिये
तेथ उत्तीर्ण होईल प्राणें । परि तें कमळदळ चिरूं नेणे,
तैसें कठिणकोवळेंपणें । स्नेह देखा.

हें ज्ञानेशांच्या प्रतिभेंतून निघालेलें वर्णन, आणि एकनाथांनी याच दृष्टान्ताच्या आधारें केलेलें प्रीतीचें वर्णन–

जो शुष्क काष्ट स्वयें कोरी । तो कोंवळच्या कमळामाझारीं,
भ्रमर गुंतला प्रीती वरी । केसर माझारीं कुचंबो नेदी.

लक्षांत घेण्यासारखें आहे.

भक्त देवावर असेंच एकनिष्ठ प्रेम करतात. त्या प्रेमाच्या पायीं निर्गुण, निराकार अशा ईश्वराला सगुण, साकार व्हावें लागतें. असा हा प्रेमाचा प्रभाव ! भ्रमराला कमलाचें ‘ सुमन ’ गोवून ठेवतें तर ईश्वराला भक्तांचें ‘ सु–मन ’ गोवून ठेवतें.

— ५० —

तरुवर बीजा पोटीं,
बीज तरुवरा सेवटीं.
तैसें तुम्हां आम्हां जालें,
एकीं एक सामावलें.
उदकावरी तरंग,
तरंग उदकाचें अंग.
तुका म्हणे बिंबच्छाया,
ठायीं पावली विलया.

— ५१ —

प्रारब्ध क्रियमाण,
भक्ता, संचित नाहीं जाण.
अवघा देव चि जाला पाहीं,
भरोनियां अंतर्बाहीं

---

५०. मोठ्या झाडाची उत्पत्ति ही बीजांतून होते, आणि झाडापासून नंतर बीज तयार होतें. पाण्यावर तरंग येतात; हे तरंग पाण्याचे अविभाज्य घटक असतात. वस्तु आणि वस्तूची सावली एके ठिकाणीं आली की तीं एक होतात. सावली मूळ वस्तूंत लोप पावते.

संतांच्या विभूति देवच असतात. देव व संत एकाच रूपाचे भाग असतात. तशीच जीवा शिवाची गोष्ट ! जीवात्मा हा विश्वाकार होतो; तेव्हा त्याला 'शिव' स्वरूप प्राप्त होतें. जीवाशिवांतील अद्वैत गळून जातें. ते एकमेकांत विलीन होतात.

५१. हरिभक्ताला प्रारब्ध, क्रियमाण आणि संचित यांपैकी एकहि कर्म नाही. कारण त्याच्या आंत आणि बाहेर देवच व्यापून राहिला असल्यामुळे तो संपूर्णपणें देवरूपच असतो, त्याला सत्त्व, रज किंवा तम यांपैकी कोणत्याहि

सत्त्वरजतम बाधा,
नव्हे हरिभक्तांसि कदा.
खाय बोले करी,
अवघा त्यांच्या अंगीं हरी.
देवभक्तपण,
तुका म्हणे नाही भिन्न.

— ५२ —

देऊनियां प्रेम मागितलें चित्त,
जाली फिटाफिट तुम्हा आम्हा,

---

गुणाची बाधा होत नाही. तो खातो, बोलतो, काम करतो. पण या सर्व क्रियांतून हरीची प्रेरणाच असते. अशा रीतीने देवपण आणि भक्तपण अलग नाही.

या अभंगांत देवभक्ताची एकरूपता वर्णन केलेली आहे. भक्त हा ईश्वर-स्वरूपीं मग्न असल्यामुळे तो त्रिपुटीच्या पलीकडे गेलेला असतो. ज्ञानेश्वरीच्या तिसऱ्या अध्यायांत निष्काम कर्मयोग्याचें चित्र ज्ञानेश्वरांनी रेखाटलें आहे. प्रस्तुत अभंगांतील व्यक्तित्व हें तशाच तऱ्हेचें आहे. तो सर्व कांही करीत असतो, पण फलाची अपेक्षा सोडून देऊन. त्यामुळे त्या कर्माची किंवा कर्म ज्यांतून निर्माण होतें अशा गुणांची बाधा त्यास होत नाही. 'असा मनुष्य म्हणजे मनुष्याच्या वेषांत असलेला देवच, असा अभिप्राय ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरीच्या चौथ्या अध्यायांत प्रकट केला आहे, तो याच अर्थाने. सत्त्व-रजतम या गुणांतून कर्मे निर्माण होतात; कर्मांपासून सुखदु:खादिक फळें मिळतात. हा हरिभक्त परमेश्वररूपीं मग्न असल्यामुळे त्याला सुख काय अन् दु:ख काय दोन्ही सारखींच. म्हणजे त्याच्यावर कर्मांचा परिणाम होत नाही; म्हणजेच गुणांची बाधा होत नाही.

५२. हे देवा, तुम्हीं प्रेम दिलें, आणि प्रेमाच्या मोबदल्यांत आमचें चित्त मागून घेतलें. त्यामुळे तुमच्या–आमच्यांत घेणें–देणें संपलें! एक नेता,

काशानें उदार तुम्हांशी म्हणावें,
एक नेसी भावें एक देसी.
देउनिया थोडें नेसील हें फार,
कुंटिसी विचार अवघियांचा.
तुका म्हणे आम्हां भांडवल चित्त,
देऊनी दुश्चित पाडियेलें.

---

तेव्हा त्याच्या भावांत दुसरें देतां; असा तुमचा व्यवहार आहे. मग तुम्हांला उदार तरी कसें म्हणावें ? उलट थोडें देतोस आणि नेतोस फार. त्यामुळे अवघ्यांचा विचार कुंठित होतो. आमचें संपूर्ण भांडवल असें जें चित्त तेंच तूं नेलें असल्यामुळे आम्ही कफल्लक बनलों आहों. (आमचें संसारांत मन रमत नाही.)

अंत:करणांतील शुद्ध भावानेच परमेश्वर भेटतो. चित्त हें व्यवहाराचें एकमेव साधन. असलें एकमेव साधन गेल्यामुळें सारीं इंद्रियें निकामी होतात. त्यांच्या ठिकाणीं आसक्ति उरत नाही. असें हें जबरदस्त मन घेऊन परमेश्वर आपलें प्रेम देत असतो.

तुकारामांचे कांही अभंग फारच गोड आहेत. देवभक्तांतील लाडिक संवादाचे अभंग तर फारच गोड आहेत. लटिक्या रागामुळे त्यांत आलेली खुमारी अवर्णनीय आहे. देव उदार म्हणून प्रसिद्ध आहे. पण संतांनी त्याचें उदारपणाचें ढोंग बाहेर काढलें. कांही एक न घेतां देतो, तो उदार. परमेश्वराच्या औदार्याविषयी नामदेव लिहतात,

‘ घेसी तेव्हा देसी ऐसा अससी उदार ’ !

‘ देउनी दुश्चित पाडियेलें ’ ऐवजी ‘ नेंऊनी दुश्चित पाडियेलें असा अर्थपोषक पाठ आहे; तो स्वीकारावा.

– ५३ –

आम्हा वैष्णवांचा कुळधर्म कुळींचा,
विश्वास नामाचा एका भावें.
बरीच हरीचे दास म्हणवितां श्लाघीजे,
निर्वासना कीजे चित्त आधीं.
गाऊं नाचूं प्रेमें आनंदें कीर्तनीं,
भुक्ति मुक्ति दोन्ही न मगों तुज.
तुका म्हणे देवा ऐसी यांची सेवा,
द्यावी जी केशवा जन्मोजन्मीं.

– ५४ –

तेथे सुखाची वसति, गाती वैष्णव नाचती
दिंड्या पताका झळकतीं, गर्जती हरिनामें.

---

५३. प्रभूच्या नांवावर एकनिष्ठपणें श्रद्धा ठेवावी, हा आम्हां वैष्णवांचा परंपरागत कुळधर्म आहे. प्रथम अंतःकरणांतून मोह घालविला पाहिजे; तरच (निर्मोह झाल्यावरच) 'वैष्णव' म्हणवून घेणें भूषण ठरेल ! आम्ही वैष्णव प्रभूच्या कीर्तनांत आनंदाने गाऊं आणि नाचूं. संसाराचा उपभोगच काय पण मुक्तिदेखील आम्ही तुला मागणार नाही. अशा आचरणाचे जे खरे वैष्णव असतात, त्यांची मला जन्मोजन्मीं सेवा घडूं दे.

वैष्णव केवळ नांव असून चालत नाही. त्यासाठी वैष्णवांचा आचार अंगीं बाणला पाहिजे हें नेहमीचें सूत्र तुकाराम येथे सांगतात. भक्तिभाव हा सर्वांत श्रेष्ठभाव, वैष्णवांना वाटतो. त्या भक्तीच्या समोर मोक्षाची देखील मातब्बरी वाटत नाही.

५४. ज्या ठिकाणीं दिंड्यापताका झळकत आहेत, वीर वैष्णव आनंदाने नाचत, गात, हरिनामाचा जयजयकार करीत आहेत. त्या ठिकाणींच खरें सुख असतें. दोषांवर निकराचा हल्ला झाल्यामुळे त्यांना पळतां भुई थोडी झाली.

अनुक्रम ... दि: ... नों दि ...

दोषा झाली धर्मभारी, पळतां भरले दिशा चारी
न येती माघारीं, नाही उरीं परताया.
विसरोनि देवपणा, उभा पंढरीचा राणा
विटोनि निर्गुणा, रूप धरिलें गोजिरें.
पोट सेविता न धाये, भूक भुकेलीच राहे,
तुका म्हणे पाहे, कोण आस मुक्तीची.

---

ते चारहि दिशांत पांगले. पुन: ते परतले नाहीत, कारण परतण्यासाठी ते शिल्लकच उरले नाहीत. (किंवा परत येण्यासाठीं त्यांना हिंमतच उरली नाही.) स्व:तचा देवपणा विसरून, भक्तांसाठी श्रीविठ्ठल विटेवर उभा राहिला. निर्गुण अवस्थेला कंटाळून भक्तीची गोडी चाखण्यासाठी सगुणसुंदर रूप धारण केलें. अशा त्या गोजिऱ्या मूर्तीकडे पाहतांना किवीहि सेवन केलें तरी पोट भरत नाही, भूक कधीहि पूर्ण होत नाही, मुक्तीची इच्छाहि उरत नाही.

चंद्रभागेच्या तीरावर भागवतधर्माचें विद्यापीठ ज्ञानदेव–नामदेव यांनी स्थापन केलें. तुकारामाने त्यावर कळस चढविला. चंद्रभागेच्या वाळवंटांत आषाढी–कार्तिकीला वैष्णव जमूं लागले. आनंदाने हरिनामाची गर्जना होऊं लागली. नामदेव म्हणतात,

निर्गुणीचें वैभव आलें भक्तिमिषें,
तें हें विठ्ठल वेषें ठसावलें.

एका 'जाती'चे अनेक लोक एकत्र आले. सुखाचा सोहळा सुरू झाला. त्या आनंदाचें काय वर्णन करावें ? कितीहि आनंदास्वाद घेतला तरी तृप्ति नाही. मुक्तीसारखी सर्वश्रेष्ठ समजली गेलेली बाब या भक्तीपुढे तुच्छ वाटूं लागली. कारण हा आनंद आहेच तसा अवर्णनीय ! ज्ञानेशांसारख्या प्रतिभावंत कवीने देखील या प्रसंगाचें–

तृप्ति भुकेली काय करूं माये, जीवनीं जीवन कैसे तान्हे जत जायें.
मन धालें परि न धाये, पुढुतपुढुतीं राजा विठ्ठलुचि पाहे वो.

असेंच वर्णन केलें आहे.

— ५५ —

कथा त्रिवेणीसंगम देव भक्त आणि नाम,
तेथींचें उत्तम चरणरज वंदिता
जळती दोषांचे डोंगर शुद्ध होती नारीनार
गाती ऐकती सादर जे पवित्र हरिकथा
तीर्थे तया ठाया येती पुनीत व्हावया,
पर्वकाळ पायां तळीं वसे वैष्णवां.
अनुपम्य हा महिमा नाही द्यावया उपमा,
तुका म्हणे ब्रह्मा नेणें वर्णूं या सुखा.

---

५५. देव, भक्त आणि देवाचें नांव या तीन गोष्टींचा कथेच्या ठिकाणीं संगम झाला असल्यामुळे तो त्रिवेणी संगम आहे. या ठिकाणीं असलेल्या वैष्णवांच्या पायांनी पुनीत झालेल्या धुळीस वंदन करणारे पवित्र होतात. जें भक्तिभावाने हरिकीर्तन गातात किंवा ऐकतात, ते पवित्र होतात. हरि-नामामुळे त्यांच्या पापांचे डोंगरदेखील भस्मसात् होतात. इतरांना पवित्र करणारीं तीर्थें देखील येथे पवित्र होण्यासाठीं येतात ! आणि पर्वकाळादि पवित्र मुहूर्त विष्णुभक्तांच्या पायतळीं लीन होऊन वास्तव्य करतात. हा नामाचा महिमा अतुल आहे. फार काय नामसंकीर्तनाच्या सुखाच्या गोडीचें वर्णन ब्रह्मदेव देखील करूं शकत नाही.

कथाकीर्तनाचें महत्त्व सर्व संतांनी ओळखलें होतें. महाराष्ट्राच्या खड-काळ भूमिकेंत हा भगवद्भक्तीचा वृक्ष वाढला तो कथाकीर्तनावरच. यामुळे महाराष्ट्राची संस्कृति जतन झाली. 'नामाचा महिमा नेणेचि पै ब्रह्मा' असा अनाकलनीय नाममहिमा सोप्या सोप्या शब्दांतून कीर्तनांत प्रगट होऊं लागला. कथाकीर्तनामध्ये प्रत्यक्ष देव उभा असतो अशी त्यांची श्रद्धा. आणि 'माझे भक्त गाती जेथे, नारदा उभा मी तेथे' अशी साक्षात् परमेश्वराची वाणी ! या कीर्तनानेच महाराष्ट्रास संजीवन दिलें. महाराष्ट्रांत एकता, समता स्थापना झाली ती याचमुळे.

– ५६ –

गाई गोपाळ यमुनेच्या तटी,
येती पाणिया मिळोनि जगजेठी,
चेंडू चौगुणा खेळती वाळवंटीं
चला चला म्हणती पाहूं दृष्टी वो.
ऐशा गोपिकांच्या त्या कामातुरा नारी
चित्त विव्हळ देखावया हरी,
मिस पाणियाचें करितील घरीं,
बारा सोळा मिळोनि परस्परीं वो.
चिरें चोळिया त्या धुतां विसरती,
ऊर्ध्व लक्ष लागलें कृष्णमूर्ती,

---

५६. पाणी पिण्यासाठी यमुनेच्या तीरावर जगजेठी श्रीकृष्णासह गाई, गोपाळ आले आहेत. ते त्या ठिकाणीं गुणत्रयातीत शुद्ध सत्त्व भावाचा चेंडू खेळत आहेत, तें पाहावयास आपण जाऊं असें गौळणी एकमेकींस म्हणूं लागल्या. ह्या गौळणी श्रीकृष्णावर मोहित झाल्या असल्यामुळे, त्यांचें मन कृष्णदर्शनासाठी आतुर झालें होतें. म्हणून बारासोळाजणी मिळून, पाण्याच्या मिषानें त्या यमुनेवर गेल्या. श्रीकृष्णाच्या मूर्तीकडे वर लक्ष लागलें असल्यामुळे चोळीलुगडें धुण्याचें त्या विसरतात. आपलें कुळ काय? जात काय? याचा त्यांना विसर पडला. तो खेळ पाहत असतां सर्वांच्या डोळ्यांचीं पातीं निश्चल झालीं होतीं.

इकडे गोकुळांत वाद्यें वाजत होतीं, लोकांचा गलबलाहि भरपूर होता; पण गौळणींना फक्त श्रीकृष्णाच्या बासरीचाच आवाज ऐकूं यत होता. कित्येक गौळणी तोंड धूत होत्या. त्या वेणुनादामुळे तटस्थ झाल्या. त्यांचा तोंडांतील हात तोंडांतच राहिला. अशा वेडावलेल्या गोपिकांचे मनोरथ भगवान श्रीकृष्ण निश्चितच पूर्ण करील.

ज्ञानेश्वरांपासून तों तुकोबा–निळोबा यांच्यापर्यंत सर्व साधुसंतांनी गवान् श्रीकृष्णाचें बालचरित्र वर्णिलें आहे. गौळणी हा त्यांपैकींच एक-

कोणा नाठवे कोण कुळ याती,
जाली तटस्थ सकळ नेत्रपातीं वो.
दंतधावनाचा मुखामाजीं हात,
वाद्यें वाजती नाईके जनमात.
करी श्रवण कृष्णवेणुगीत,
स्वामी तुकयाचा पुरवील मनोरथ वो.

---

भाग आहे. ह्या अभंगांत तुकोबांनी गौळणींचा अनुभव शब्दांकित केला आहे. तुकारामादिक संतांनाहि हा अनुभव आला होताच. म्हणूनच त्यांत इतकी उत्कटता उतरली आहे. शिवाय भगवंताच्या सगुण स्वरूपाचें भक्तिरसानें ओथंबलेलें चरित्रहि या गौळणींच्या द्वारें वर्णन करतां येतें. गौळणीच्या या अभंगांत वेगवेगळे भक्तीचे भाव सांगितले आहेत. वरवर पाहिलें असतां; ते सर्वसामान्य प्रापंचिक भावासारखे वाटतात. त्यामुळे गौळणींचें भाव व्यक्त करण्यासाठी वापरलेली भाषाहि त्या भावांना साजेशीच वापरली आहे. परंतु त्यांतील भक्तिभावाचें स्वरूप न कळल्यामुळे या गौळणीचा निराळाच अर्थ लावण्यांत येतो. वास्तविक या गौळणींच्या द्वारें व्यक्त होणारा आनंद हा ‘ निजानंद ’च आहे, याच्या सूक्ष्म खुणा या अभंगांत असतात. तिकडे दुर्लक्ष केल्यामुळे मूळ हातीं गवसत नाही !

या गौळणपर अभंगांत तन्मयतासक्ति भावाचें सुंदर दर्शन होतें.

बारा सोळा . . . गौळणींचा उल्लेख करतांना नामदेव, एकनाथ, तुकाराम बहुधा ‘ बारासोळा गौळणी ’ असा करतात. गौळणी म्हणजे श्रुतींनी भगवत्सेवेसाठीं घेतलेले अवतार. सोळा समाधि आणि बारा गुंफा हीं आत्मसाक्षात्कारपथावरील कांही स्थळें आहेत, त्यांतच खरें ज्ञान, ईश्वर वास करीत असतो. म्हणून त्या समाधि किंवा गुंफा यांनी घेतलेले गौळणींचे अवतार श्रीकृष्णावर मोहित झाल्यास नवल काय ?

ऊर्ध्व लक्ष लागलें कृष्णमूर्ती ...... संसार किंवा माया ही खाली आणि परमात्मा हा वर असें गीतेच्या पंधराव्या अध्यायांत वर्णन केलें आहे. खाली पाहणें म्हणजे संसारांत रममाण होणें. वर पाहणें (ऊर्ध्वगति) म्हणजे परमात्म्याकडे लक्ष असणें. पाहा—ओणव्या सोंकरीं, सेत खादलें पांखरीं.

– ५७ –

कोणी एकी भुलली नारी,
विकितां गोरस म्हणे घ्या हरी.
देखिला डोळा बैसला मनीं,
तो वदनीं उच्चारी.
आपुलियाचा विसर भोळा,
गोविंद कळा कौतुकें
तुका म्हणे हांसे जन,
नाही कान ते ठायीं.

---

५७. कोणी एक गवळण कृष्णाच्या रूपावर भाळली. जें कृष्णरूप तिने पाहिलें, तेंच तिच्या मनांत ठसलें. त्यामुळे तिच्या तोंडून देखील त्याच्याच नांवाचा उच्चार होऊं लागला ! दूध विकतांना 'दूध घ्या दूध' असें म्हणण्याऐवजीं 'हरि घ्या हरि' असें ती म्हणूं लागली ! कृष्णरूपाशीं एकरूप झाल्याने ती स्वतःची जाणीव विसरली, आणि कृष्णाच्या लीलांचेंच कौतुक गाऊं लागली. तिला जरी लोक हसत होते तरी तिचे कान तिकडे नव्हते. (तिचें तिकडे लक्षच नव्हतें.)

ईश्वर व भक्तांतील एकत्व प्रकट करण्याकरिता प्रिया व प्रियकरांचें प्रतीक अनेकदा वापरण्यांत येतें. प्रिया ही जशी आपल्या प्रियकराशीं एकरूप झालेली असते, तद्वत् भक्त देखील परमेश्वराशीं एकरूप झालेला असतो. याकरिता गौळणीचे अभंग प्रसिद्ध आहेत. गौळणीने कृष्णाला पाहिलें आणि त्याचें रूप तिच्या मनांत ठसलें. तिचें मनच कृष्णमय झाल्यामुळे तिचा प्रत्येक व्यवहार हा कृष्णमय होता. त्यामुळे तिचें लौकिक जगाकडे दुर्लक्ष झाल्यास नवल नाही !

– ५८ –

कमोदिनी काय जाणे तो परिमळ,
भ्रमर सकळ भोगीतसे १.
तैसें तुज ठावें नाही तुझें नाम
आम्हीच तें प्रेमसुख जाणों २.
माते तृण बाळा दुधाची ते गोडी
ज्याची नये जोडी त्यासी कामा ३.
तुका म्हणे मुक्ताफळ शिंपीपोटीं
नाही त्याची भेटी, भोग तिये ४.

– ५९ –

मृत्युलोकीं आम्हा आवडती परी
नाही एक हरिनामें विण १.

---

५८. कमलिनीला स्वत:च्या पाकळ्यांतील सुगंधाची काय जाणीव? तो गंध उपभोग घेणाऱ्या भ्रमरासच ठावा! तद्वत् तुझ्या नामाची गोडी तुला कळत नाही. तुझ्या नामापासून मिळणारें प्रेमसुख आम्हीच यथार्थतेनें जाणूं शकतों. बाळालाच दुधाची गोडी कळते. आईला तें तृणवत् असतें. खरेंच आहे की ज्यानें जें जोडलेलें, कमावलेलें असतें तें त्याच्या कामाला येत नाही. शिंपल्याच्या पोटीं मौल्यवान् मोतीं जन्माला येतात. पण त्याचा सहवास व उपभोग मात्र शिंपलीला लाभत नाही.

परमेश्वराच्या नांवाचा महिमा अगाध आहे. पण परमेश्वराला त्याचें काय? त्याचें महत्त्व नामावर जगणाऱ्या त्याच्या भक्तांनाच. नामसंकीर्तनाच्या जोरावर सारा प्रपंच त्यांनी लाथाडून लावलेला असतो; एवढें त्यांत प्रेमसुख आहे. त्यांतील गोडी अवीट आहे.

५९. इहलोकांत आम्हां विष्णुदासांना हरिनामावांचून दुसरी कोणतीहि गोष्ट आवडत नाही. माझें मन संसाराला विटलें आहे. त्याच्याविषयी

विटलें हें चित्त प्रपंचापासूनि
वमन हें मनीं बैसलेंसे २.
सोनें रुपें आम्हा मृत्तिकेसमान
माणिकें पाषाण खडे तैसे ३.
तुका म्हणे तैशा दिसतील नारी
रिसाचिया परी आम्हांपुढे ४.

— ६० —

बहु प्रकार गव्हाचे,
जिव्हा नाचे आवडी.

---

मनामध्ये इतकी किळस (घृणा) निर्माण झाली की त्याला पाहून ओकारीच येते. सोनें, चांदी ही मातीसारखी क्षुल्लक आणि माणिकमोतीं दगडासारखीं निरर्थक वाटतात. आम्हांला स्त्रिया ह्या अस्वलीसारख्या वाटतात. (त्या आम्हांला मोह पाडू शकणार नाहीत; उलट आम्हांला तिटकारा निर्माण होईल.)

तुकारामांच्या व्यक्तित्वाचा विकास होत असतांना त्यांच्या अनुभवास ज्या ज्या गोष्टी आल्या त्यांचें यथार्थ दर्शन त्यांनी आपल्या अभंगांतून दिलें आहे. हरिनामावांचून, संसारांत तारणारी दुसरी शक्ति नाही. याची प्रतीति त्यांना येतांच ‘ हरिनामाच्या तारूंवर तुका हमाल ’ झाला. त्यामुळे सांसारिक वस्तूंचा तिटकारा निर्माण होणें हें सहज होतें. “ देखिलिया धन मृत्तिकेसमान, नवविधा रत्नें जैसे धोंडे ” असाच अनुभव नामदेवांनी नोंदवून ठेवला आहे. संसारसुखाचें आकर्षण, त्याचा मोह कमी झाल्यावांचून देव भेटेल ही कल्पना चुकीची आहे. त्यासाठी कांताकांचनाचा त्याग हा झालाच पाहिजे.

६०. एका गव्हाचीं पुष्कळ प्रकारचीं पक्वान्नें करतां येतात. या नाना पदार्थांचा आस्वाद घेण्यासाठी जीभ नेहमीच सादर असते. पदार्थ संपतात, पण त्याविषयीची आवड मात्र कायमच राहते. सागराच्या पृष्ठभागावर

सरलें परि आवडी नवी,
सिंधु दावी तरंग.
घेतलें घ्यावें वेळोवेळां,
माय बाळा न विसंबे
तुका म्हणे रस राहिला वचनीं,
तोचि पडताळूनि सेवीतसें.

– ६१ –

नका दंतकथा येथे सांगों कोणी.
कोरडे ते मानी बोल कोण ?
अनुभव येथे व्हावा शिष्टाचार
न चलती चार आम्हांपुढे.

---

एका लाटेंतून दुसरी लाट निर्माण होते. आवडींतूनहि तशीच नवी आवड निर्माण होते. वास्तविक पाहतां लहान मुलास आईने अनेकदा कडेवर घेतलेलें असतें, परंतु तिला पुन: पुन्हा त्याला घ्यावेंसें वाटतें; ती त्याला विसरूंच शकत नाही ! त्याच्या शब्दांतील गोडी तिने अनेकदा चाखलेली असते. पण पुन: पुन्हा ती त्याचा आस्वाद घेण्यास उत्सुक असते. (तसेंच भक्तांचें आहे. भक्तांना देवाविषयी असेंच नित्यनूतन प्रेम असतें.)

भक्ताला भक्तीचा कधी कंटाळा येत नाही. निरनिराळ्या नेहमीच्या दृष्टान्तांनीं तुकारामांनी हें पटवून दिलें आहे.

**६१.** माझ्याजवळ कोणीहि कपोलकल्पित कथा सांगण्याचा प्रयत्न करूं नका. अनुभवविरहित बोल कोण प्रमाण मानील ? अनुभव हाच शिष्टाचाराचा दंडक व्हावा. आमच्यापुढे अनुभवाचा आधार नसलेले इतर उपाय चालणार नाहीत. एकत्रित असलेलें दूध व पाणी राजहंस वेगवेगळे करूं शकतो. तद्वत् (खरें ब्रह्मतत्त्व व खोटी माया यांतील भेद ओळखण्यासाठी) खराखुरा आत्मसाक्षात्कारी संतच हवा. त्या ठिकाणीं अलबत्यागलबत्यांचें काम नाही.

निवडी वेगळें क्षीर आणि पाणी,
राजहंस दोन्ही वेगळालीं.
तुका म्हणे येथें पाहिजे जातीचें,
येरा गबाळाचें काय काम

– ६२ –

शिकल्या बोलाचे सांगतील वाद,
अनुभव भेद नाही कोणा.
हे ज्ञानी करितील कथा,
न मिळतील अर्था निजसुखा.

---

तुकाराम हे निर्भीड टीकाकार होते. समाजांतील दांभिकतेला त्यांनी कसून विरोध केला. ढोंगी लोकांवर कठोर टीका केली. जनतेला नाडणाऱ्या तथाकथित संतांच्या अंगावरील कातडें ओढून काढून त्यांचें खरें स्वरूप प्रकट केलें ! ईश्वरसाक्षात्काराचा अनुभव नसतांना त्यावर बोलणारे पुष्कळच असतात. पण त्यांच्या शब्दांना कवडीची किंमत नसते. शब्दांना किंमत येण्यासाठी त्यामागे आचाराचे व अनुभवाचे डोंगर उभे हवेत. अनुभवाचें भांडार समृद्ध झाल्याशिवाय ब्रह्मज्ञान उमजू शकत नाही. म्हणून ब्रह्मज्ञानाचा अर्थ सांगण्यासाठीं साक्षात्कारी संतच हवेत.

६२. पढविलेल्या पोपटासारखे प्रतिध्वनी काढून वाद घालणारे पढीक पंडितच पुष्कळ ! अनुभवामुळे येणारें सूक्ष्म ज्ञान एकालाहि नसतें. अशा तऱ्हेचे तथाकथित पंडित कथाकीर्तनें खूप करतील; पण कथाकीर्तनाचा विषय जें ब्रह्म त्याचें सुख मात्र त्यांना मिळत नाही. (ब्रह्मसुख किंवा निजसुख हें अनुभवाशिवाय मिळत नाही.) वस्तु माहीत नसतांना, लाचलुचपत घेऊन खोटी साक्ष देणाऱ्या लोकांप्रमाणे हे अनुभवशून्य लोक असतात. त्यांनाहि ब्रह्म म्हणजे काय माहीत नसतें. पण पोट जाळण्यासाठी त्याचें पुस्तकांच्या आधारें निरूपण करतात.

...६...

तुका म्हणे जैसी लांचासाठीं ग्वाही,
देतील ते, नाहीं ठावी वस्तु.

— ६३ —

एका बोटाची निशाणी,
परीपाक नाहीं मनीं.
तरि तें संपादिलें सोंग,
कारणावांचूनियां व्यंग.
वैष्णवांचा धर्म,
जग विष्णु नेणे वर्म.

---

प्रत्यक्ष अनुभवाचें महत्त्व तुकारामांनी येथे स्पष्ट केलें आहे. अनुभवावाचून खरें ज्ञान मिळूं शकत नाही. खऱ्या ज्ञानाची प्राप्ति नसतांना निरूपण, प्रवचनें करणाऱ्या उदरंभरू हरदासांना तुकारामांनी बोचकारलें आहे. अशा तऱ्हेचे कोरडे कीर्तनकार जनतेला काय बोध देणार ? नाथानी अशा कीर्तनकाराला करकर वाजणाऱ्या घाण्याची उपमा दिली आहे ती योग्यच आहे—

जेवीं गुळउसाचा घाणा, तोंडींचा रस भरे मांदणा,
शब्दसोपटें भरोनि वदना, करि परिभ्रमणा करकरितु.

६३. कपाळावर एका बोटानें गंधाची निशाणी लावून कित्येक लोक वैष्णव म्हणून मिरवतात. पण त्यांचें मन मात्र अनुभवाच्या बाबतींत अपरिपक्व असतें. तेव्हा वैष्णवत्व अंगीं न बाणतां उगीच गंधाचे ठसे लावून घेणें वाईट दिसतें व तें ढोंग असतें. सर्व जग विष्णुमय आहे हें वैष्णवधर्माचें मुख्य रहस्य त्याला माहीत नसतें. या ढोंगामुळे त्याच्या हातून फार मोठें पाप घडतें. तुकाराम म्हणतात, मी मात्र वैष्णवधर्माचें रहस्य जाणून घेऊन तदनुसार खरें आचरण करतों.

समाजामध्ये वावरणाऱ्या ढोंगावर हा हल्ला आहे. अंतरंगापेक्षा बहिरंगावरच जोर देणारे सोंगाडे हे पापी असून ते धर्माचे शत्रु आहेत. केवळ

अतिशयें पाप,
तुका सत्य करी माप

– ६४ –

भगवें तरी श्वान सहज वेष त्याचा
तेथें अनुभवाचा काय पंथ ?
वाढवुनी जटा फिरे दाही दिशा,
तरी जंबुबेषा सहजस्थिति.
कोरोनिया भूमि करिती मधीं वास,
तरी उंदरास काय वाणी ?
तुका म्हणे ऐसें कासया करावें,
देहासी दंडावें वाउगें चि.

---

गंधाचा टिळा लावून वैष्णव होत नाही; तर जगाकडे समदृष्टीने पाहूं शकणारा हा खरा वैष्णव होतो.

६४. कांही भगत भगवीं वस्त्रें नेसून फिरतात; पण त्यांना देवाचा अनुभव मुळीच नसतो. केवळ वेषच जर पाहिला तर कुत्र्याचा नैसर्गिक वेषहि भगवाच असतो ! केवळ जटा वाढवून दहा दिशांना नग्न होऊन भटकणें हें कांही भक्ताचें लक्षण नाही. तसें पाहिलें तर कोल्हा त्या वेषांत नेहमीच असतो ! जमिनींत विवर करून राहणारे सर्वच जर साधू असते तर उंदराचें साधुत्व काय वर्णावें ? या बाह्य गोष्टींवरून साधुत्व ठरत नसतें; म्हणून विनाकारण शरीराला त्रास देऊन असले चाळे करण्यांत काय अर्थ आहे ?

दांभिक साधूंवर शब्दांचे घाव घालून त्यांची दांभिकता उघडी पाडण्याचा प्रयत्न या अभंगांत आहे. सामान्य भोळ्या जनतेला फसविणाऱ्या तथाकथित संतांची हजेरी तुकारामांनी घेतलेली आहे. 'अंतरीं पापांच्या कोडी, वरी बोडी डोई दाढी !' अंतःकरणांत प्रामाणिक तळमळ नसतांना रानावनांत जाऊन देहदंडन करणें तुकारामांस पसंत नव्हतें.

– ६५ –

तांबियाचें नाणें व चले खऱ्या मोलें
जरी हिंडवलें देशोदेशीं.
करणीचें कांही न मने सज्जना,
यावें लागे मना वृद्धाचिया.
हिरियासारखा दिसे शिरगोळा,
पारखी तो डोळां न पाहाती.
देऊनियां भिंग कामाविलें मोतीं,
पारखिया हातीं घेतां नये.
तुका म्हणे काय नटोनिया व्यर्थ,
आपुलें हें चित्त आपणा ग्वाही.

– ६६ –

अर्थेविण पाठांतर कासया करावें
व्यथचि मरावें घोकूनियां.

---

६५. तांब्याचें नाणें देशोदेशीं जरी फिरविलें तरी त्याला सोन्याच्या नाण्याची किंमत येत नाही. कृत्रिम गोष्ट सज्जनांच्या मनाला रुचत नाही. कोणतीहि गोष्ट अनुभवी लोकांच्या इच्छेस उतरली पाहिजे. शिरगोळा हिऱ्यासारखा जरी दिसत असला तरी रत्नपारखी डोळ्याने देखील पाहत नाही. (न पाहतां ओळखतात.) कांचेवर मेहनत घेऊन तिचें मोतीं जरी परीक्षकाजवळ दिलें, तरी तो हातींसुद्धा घेणार नाही. बाह्य नखरा हा व्यर्थच आहे. कारण आपलें मनच आपल्या खरेखोटेपणाबद्दल साक्षी असतें.

बाह्य ढोंग संपादून ईश्वरप्रेम मिळत नाही. अनुभवाचें महत्त्व, अंतरंगाचें महत्त्व तुकारामांनी अनेकदा वर्णन केलें आहे. 'मुलाम्याचें नाणें, तुका म्हणे सोनें, हाच विचार 'गाढव शृंगारिलें कोडें' या अभंगांतहि सांगितला आहे.

६६. अर्थ न जाणतां, उगीच 'निरर्थक पाठान्तर' कां करावें ? घोकून घोकून आयुष्य फुकट कां घालवावें ? असल्या केवळ घोकंपट्टीचा कांही

घोकूनियां काय, वेगीं अर्थ पाहे,
अर्थरूप राहे होऊनियां.
तुका म्हणे ज्याला अर्थीं आहे भेटी,
नाहीं तरी गोष्टी बोलों नका

– ६७ –

साधक झाले कळी
गुरुगुडीची लांब नळी.
पचीं पडे मद्यपान
भांगभुर्का हें साधन.

---

फायदा नाही. म्हणून अर्थ जाणून घेण्याची तत्परता दाखव; व संपूर्ण रहस्य समजून घे. तूं अर्थरूप होऊन राहा. ज्याला अर्थाचा साक्षात्कार झाला आहे, त्यानेच त्यावर बोलावें, इतरांनी त्यावर बोलूं नये.

केवळ पोपटपंची करून उपजीविका करणारे पुष्कळ असतात. मूळ न समजतांहि, त्यावर भाष्य करणारे आजहि आहेत! केवळ शाब्दिक ज्ञान उपयोगाचें नाही. त्या शब्दामागे उभी असलेली लेखकाची अनुभूति जाणून घेतली पाहिजे. नाहीतर त्यांतील अर्थतत्त्वाचा लोप होतो. इतरत्र तुकारामांनी म्हटल्याप्रमाणे 'अर्थें लोपलीं पुराणें, नाश केला शब्दज्ञानें' अशी स्थिति होते! म्हणून 'अनुभव नसतांचि जाण, व्यर्थ पुस्तकी ज्ञान' हें सूत्र नेहमी लक्षांत ठेवावें. ज्यांना साक्षात्कारी अनुभव आले असतील त्यांनीच त्यावर बोलावें. इतरांनी वाहावा भार माथां!

६७. या युगांत, गुडगुडीची लांब नळी तोंडांत धरून मोक्ष साधूं पाहणारे अनेक साधक आहेत. मद्यपान हें त्यांच्या नेहेमीच पचनी पडणारें असून भांग, तमाखूचा फक्का, हीं त्यांचीं मोक्षाचीं साधनें झालीं आहेत! ईश्वराच्या अद्वैत स्थितीचें प्रतिपादन करणारीं वचनें यांच्या मुखोद्गत असतात. पण स्वतः मात्र विषयांत अत्यंत रममाण झालेले असतात! अशा साधूंच्या ठिकाणीं चेल्याचाटचांचा आणि पिंडदंडादि (देहाचा आवदांडपणा) ऐश्वर्य-

अभेदाचें पाठांतर
अतिविषयीं पडिभर
चेल्यांचा सुकाळ
पिंड दंड भंगपाळ.
सेवा मान धन
बरें इच्छेनें संपन्न.
सोंगाच्या नरकाडी
तुका बोंडोनिया सोडी.

---

समूहाचा सुकाळ असतो. आपणास शिष्यांकडून सेवा, मान, धन मिळावीं ही त्यांची परम इच्छा ! असल्या तऱ्हेचीं सोंगें–ढोंगें करणाऱ्या साधूंचीं डोचकीं तुकाराम वोडून काढतात. (त्यांतील घाण नाहीशी करतात.)

तुकारामाच्या वेळीं दांभिक साधूंचा सुळसुळाट होता. (आणि आजहि आहे.) अशा चालचलावू साधूंवर तुकारामांनी तीक्ष्ण वाग्बाण सोडले आहेत. बाह्य गोष्टींचें अनुकरण करून जनतेस फसविणाऱ्या साधूंचीं कृत्यें तुकारामांस मुळीच खपत नसत, तर खुपत असत. त्यांचा परामर्श तुकारामांसारख्या साधूनें घेणें आवश्यक होतें. तुकारामांचें हें सामाजिक कार्य फार मोठें आहे. आजहि अशा साधूंचा सर्वत्र सुकाळ आहे ! ज्ञानेशांनीहि या बोलघेवड्या साधूंचें वर्णन,

वेदाधारें बोलती, केवळ कर्म प्रतिष्ठिती,
परि कर्मफळीं आसक्ति धरूनिया.

असें केलें आहे.

या अभंगांत ‘ भंगपाळ ’ या ऐवजीं ‘ भगपाळ ’ हा पाठभेद आहे. भग म्हणजे ऐश्वर्य. या दृष्टीनें भगपाळ हा पाठ बरा.

— ६८ —

आशाबद्ध वक्ता,
भय श्रोतियाच्या चित्ता.
गातो तेंचि नाहीं ठावें,
तोंड वासी कांही द्यावें.
जालें लोभाचें मांजर,
भीक मागे दारोदार.

---

६८. द्रव्याची अपेक्षा धरून कीर्तन करणारा वक्ता असला की 'हा कांहीतरी मागेलच' अशी भीति ऐकणाऱ्याच्या चित्तांत निर्माण होते. त्यामुळे तो काय गात आहे, हें त्याला आणि श्रोत्याला कळत नाही. लोकांनी आपणास कांही द्यावें यासाठीच तें 'तोंड वासणें' असतें! असा वक्ता म्हणजे घरोघरीं हिंडून पोटाची खळगी भरणारें लोभी मांजरच. असा मागणारा वक्ता आणि चित्तांत त्याची भीति धरणारे श्रोते असल्यानंतर कसलें कीर्तन आणि कसलें श्रवण? रिकाम्या मापामुळे गोणी कांही भरत नाही. परिणामतः दोन्ही रिकामींच राहतात! तद्वत् वक्ता आणि श्रोते भजनाच्या बाबतींत शून्यच.

वक्ता आणि श्रोते कसे नसावेत याचें सुंदर दिग्दर्शन या अभंगांत आहे. ईश्वरभजन करणारा वक्ता हा निरपेक्ष, निर्लोभी असावा लागतो. तरच तो एकाग्र चित्ताने विषयप्रतिपादन करूं शकेल. नाही तर, 'मुखीं राम, मनीं काम' अशी स्थिति होईल. तद्वत् श्रोतादेखील निःशंकपणें ऐकणारा हवा. श्रवणापेक्षा त्याचें लक्ष जर दुसऱ्या गोष्टींकडे असेल तर तो खरा श्रोता होऊं शकणार नाही. अशा तऱ्हेचे वक्ते आणि श्रोते ज्ञानाच्या दृष्टीनें रिकामेच. पोटभरू वृत्तीच्या लोकांवर तुकारामांनी उपहासाचें अस्त्र कसें उगारलें आहे, हें या अभंगावरून दिसून येईल. निष्काम झाल्याशिवाय राम मिळत नाही. आशेने मन भारलेलें असलें म्हणजे अंतःकरणांतील सर्व प्रेरणा एकत्र येऊं शकत नाहीत.

माप आणि गोणी,
तुका म्हणे रितीं दोन्ही.

– ६९ –

अज्ञानाची भक्ति इच्छिती संपत्ती,
तयाचिये मती बोध कैंचा ?
अज्ञानाची पूजा कामिक भावना,
तयाचिया ध्याना देव कैंचा ?
अज्ञानाचें कर्म फळीं ठेवी मन,
निष्काम साधन तया कैंचें ?
अज्ञानाचें ज्ञान विषयावरी ध्यान,
ब्रह्म सनातन तया कैंचें ?

---

ह्या अभंगांत पहिल्या तीन चरणांनंतर इतर गाथ्यांत आणखी दोन चरण थोडया फार फरकाने आढळतात.

वाया गेलें तें भजन, उभयतां लोभी मन.
बहिरे मुके एके ठायीं, पैसे झाले तया दोहीं.

अभंगाच्या पूर्णतेच्या दृष्टीने हे दोन चरण आवश्यक वाटतात.

६९. संपत्तीच्या मोहाने केलेली भक्ति ही अज्ञानाची भक्ति होय. या भक्तीमुळे बुद्धीला आत्मबोध कसा होणार ? लोभाची इच्छा धरून पूजा करणें हें अज्ञानाचें आहे. अशांच्या ध्यानीं देव कसा येणार ? फळावर मन ठेवून केलेलें कर्म हें अज्ञानयुक्त कर्म होय. अशा कर्मामुळे निष्काम कर्मयोग कसा साधणार ? विषयावर लक्ष ठेवून खऱ्या ब्रह्मज्ञानाची प्राप्ति होत नाही. अशा रीतीने प्राप्त होणारें ज्ञान हें विपरीत ज्ञान होय. अशा तऱ्हेने नवसासाठी भक्ति, लाभासाठी पूजा, फलाशायुक्त कर्म आणि विषयांचें ज्ञान या अज्ञानांतून निर्माण होणाऱ्या गोष्टीचा जे डंका पिटवितात, त्यांचें तोंड जळो. (म्हणजे त्यांचें वादंग माजणार नाही !)

तुका म्हणे जळो ऐसियांचें तोंड,
अज्ञानाचें बंड वाढविती.

— ७० —

ढाल तलवारे गुंतले हे कर,
म्हणे तों झुंजार कैसा झुंजों.
पेटी पडदळें सिले टोप ओझें,
हें तों झालें दुजें मरणमूळ.
बैसविलें मला येणें अश्वावरी
धावूं पळूं तरी कैसा आतां.

---

तुकारामांनी अज्ञानावर केलेली ही प्रखर टीका आहे. अज्ञानामुळे लोक भलत्या दिशेला लागतात, आणि तीच दिशा खरी आहे असें समजून त्याचा प्रचार करतात ! अज्ञानानें अज्ञान वाढत जातें; ढोंगामुळे आणखीच बुज-बुजाट होतो. अज्ञानाचा नाश होण्यासाठी असेच तीक्ष्ण व परखड बोल हवे होते !

७०. एक पळपुट्या शिपाई रणांगणावर भाषण देतो.

"ढाल आणि तलवार यांनी माझे दोन्ही हात गुंतले असतां मी लढूं तरी कसा ? अंगावर चिलखत, कमरेला तलवार अडकविण्याचा पट्टा आणि (डोक्यावर) शिरस्त्राण यांचें ओझें म्हणजे मरणाचें दुसरें कारणच ! या लोकांनी मला घोड्यावर बसविलें. आता सांगा, लढाई लढण्यासाठी मी धावूं-पळूं तरी कसा ?" इतकीं साधनें उपलब्ध असतांनाहि त्याला तीं अडचणीचीं वाटतात ! व त्यामुळे तो 'हाय, हाय' असे निराशेचे खेदोद्‌गार काढतो. तद्वत् प्रत्येक मनुष्य हा स्वतः परब्रह्मस्वरूप असतो. पण तें स्वरूप जाणून घेण्यासाठी, संतांना शरण जाणें हा एक उत्तम उपलब्ध मार्ग आहे. परंतु मूर्खांना संतांची अडगळ होते ! अनायासें प्राप्त झालेल्या संतांच्या पूजेने परब्रह्मप्राप्ति होते, हें वर्म मूर्खांना कळत नाही.

असोनि उपाय म्हणे हे अपाय,
म्हणे हाय हाय काय करूं.
तुका म्हणे हा तो स्वयें परब्रह्म,
मूर्ख नेणें वर्म संतचरण.

— ७१ —

परिसें गे सूनबाई, नको वेचूं दूध दही.
आवा चालिली पंढरपुरा, वेसीपासुनि आली घरा.
ऐकी गोष्ट सादर बाळे, करी जतन फुटकें पाळें.
माझें हातीचा कलवडू, मजवांचुनि नको फोडूं.
वळवटक्षिरीचें लिंपन, नको फोडूं मजवांचून.
उखळ, मुसळ, जातें, माझें मन गुंतलें तेथें.
भिक्षुक आल्या घरां, सांग गेली पंढरपुरा.
भक्षी परिमित आहारु, नको फारशी वरो सारूं.
सून म्हणे बहुत निकें, तुम्ही यात्रेसी जावें सुखें.
सासूबाई स्वहित जोडा, सर्व मागील आशा सोडा.
सूनमुखीचें वचन कानीं, ऐकोनि सासू विवंची मनीं.

---

आत्मस्वरूप शोधण्यासाठी संतांसारखे मार्गदर्शक आवश्यक असतात. पण मूर्ख लोक संसारांत रममाण झाल्यामुळे या सोयींच्या उपायाकडे दुर्लक्ष करून आपलें अहित करून घेतात. शेवटीं त्यांची 'नाचतां येईना अंगण वाकडें' म्हणणाऱ्या शिपायासारखी स्थिति होती !

७१. " सूनबाई, तूं माझें ऐक. दूध दही खर्च करूं नकोस. एक सासूबाई पंढरपुरास जाण्यासाठी निघाली व ती गावाच्या वेशीपासून परत घरीं आली. सूनबाई, माझें बोलणें नीट लक्षांत घे. माझें फुटकें पाळें जपून ठेव. लिंपण घालून ठेवलेला गोवऱ्यांचा ढीग आणि खीर करण्यासाठी केलेल्या शेवयांचें पात्र मी येण्यापूर्वी फोडूं नकोस. उखळ, मुसळ, जातें या वस्तूंच्या

सवतीचे चाळे खोटे, म्याँ जावेंसें इला वाटे.
आतां कासया यात्रे जाऊं, काय जाउनि तेथें पाहूं.
मुलें लेकरें घरदार, माझें येथें चि पंढरपूर.
तुका म्हणे ऐसें जन, गोवियलें मायेंकरून.

– ७२ –

चोरासी चांदणें, वेश्येसी सेजार,
परिसेंसी खापर काय होय.

---

ठिकाणीं माझें मन गुंतलेलें आहे. भिक्षुक वगैरे घरीं आल्यास त्याला सासूबाई पंढरपुरां गेली' असें सांगून परत वाटेला लाव. आणि तूं मोजकेंच खा. उगीच फारसा खर्च करूं नकोस."

यावर सून म्हणाली, "सासूबाई तुम्ही प्रंपचाची आशा सोडून आपलें खरें हित साधा. तुम्ही यात्रेला आनंदाने जावें. मीं सारें लक्षपूर्वक पाहीन."

सुनेच्या तोंडची ही भाषा ऐकल्यानंतर सासूबाईने मनांत विचार केला की, ही माझ्या सवतीसारखी आहे. हिचें सारें सांगणें खोटें आहे; केवळ मी घरांतून बाहेर जावें म्हणून 'हो ला हो' ती करीत आहे. मी कशाला बाई पंढरीला जाऊं ? व तेथें काय पाहूं ? मुलाबाळांनी भरलेलें माझें घरच मला पंढरपूर आहे.

या उदाहरणावरून लोक कसे संसाराच्या मोहांत सापडले आहेत हें दिसून येतें.

तुकाराम बहुधा संक्षिप्त लिहितात. या ठिकाणीं मात्र अभंगाची लांबी वाढलेली दिसत आहे. कारण तींत एक गोष्ट आहे. गोष्ट सांगत असतांना सूक्ष्म वर्णन कसें करावें, याचा आदर्श या अभंगांत दिसतो. तुकारामांनी टिपलेलीं कांही दृश्यें या अभंगांत मिष्किलपणें आपल्यासमोर उभीं आहेत, असें दिसतें.

७२. चोराला चांदणें, वेश्येला चांगला शेजार, व परिसाला खापर यांचा कांही एक उपयोग नाही. दगड दुधाच्या आधणांत देखील कदापि शिजणार नाहीत. तद्वत् पूर्वजन्मांतील पुण्य पदरीं असेल तरच संतांच्या सहवासांत बुद्धि रममाण होते.

दुधाचे आंधणीं वैरिले पाषाण,
कदा काळीं जाण पाक नव्हे.
तुका म्हणे जरि पूर्वपुण्यें सिद्धि,
तरीच राहे बुद्धि संतसंगीं.

— ७३ —

मृगाचिये अंगीं कस्तुरीचा वास,
असे ज्याचा त्यास नव्हे ठावा.
भाग्यवंत घेती वेचूनियां मोलें,
भारवाही मेले वाहतां ओझें.

---

संतसहवासांत मन रमण्यासाठी, मागील जन्मीचें पुण्यच पाहिजे. नाही तर संतांची भेट होऊन त्यांच्याबद्दल आपल्या मनांत प्रीति निर्माण होत नाही. संतसंगाची अनावड असलेल्या लोकांना संत तरी काय करतील ? तुकाराम हे प्रयत्नवादी होते. समाजाच्या कल्याणासाठी त्यांनी आटोकाट प्रयत्न केले. तरी पण त्यांना असें आढळलें असेल की, त्या प्रयत्नांचा कांही लोकांवर अगदीच परिणाम झाला नाही. प्रयत्न करूनहि अपयश पदरीं आलें ! प्रयत्नालाहि मर्यादा असतात. परिसाच्या स्पर्शामुळे प्रयत्नांतींहि खापराचें थोडेंच सोनें होणार आहे ?

७३. कस्तुरीमृगाच्या नाभींतून कस्तुरीचा वास येतो. पण त्या मृगांना ती कस्तुरी माहीत नसते ! भाग्यवंत, द्रव्य देऊन कस्तुरी विकत घेतात; आणि बाकीचे ओझें वाहतां वाहतां व्यर्थ मरतात. चंद्रापासून उत्पन्न होणाऱ्या अमृतापासून चकोराला समाधान लाभतें; फुलांच्या सुगंधाचा भुंगे उपभोग घेतात. रत्नपारखी केवळ दृष्टीनेच रत्नाची परीक्षा करतात; तद्वत् ज्ञाते लोक कौशल्याने चांगल्या गोष्टी ओळखून त्यांचा उपभोग घेतात. उलट आंधळ्याच्या हातीं मोतीं दिलें तरी त्यांचा कांही एक उपयोग नाही.
‘ तुझें आहे तुजपाशीं, परी तूं जागा चुकलासी ’

चंद्रामृतें तृप्ति पारणें चकोरा,
भ्रमराचा चारा सुगंधाचा.
अधिकारी येथे घेती हातवटी,
परीक्षवंता दृष्टी रत्न जैसें.
तुका म्हणे काय अंधळिया हातीं,
दिलें जैसें मोती वाया जाय.

— ७४ —

समुद्र हा पिता बंधु हा चंद्रमा,
भगिनी ते रमा शंखाची या.
मेहुणा जयाचा द्वारकेचा हरि,
शंख दारोदारीं भीक मागे.

---

अशी सर्व सामान्यांची स्थिति असते. परमात्मा हा आपल्याजवळच आहे, पण त्याचा शोध घेण्यासाठीं आपण हिंडतों रानीं वनीं. 'मींत विश्वंभर पाहणारा' हा खरा जाणकार होय. अनुभवाचे मौल्यवान् कण तो वेचून घेतो. अशा अनुभवसिद्धांनाच मुक्तीचा मार्ग सापडतो. नाही तर,

तेरा साँई तुज्झमें ज्यों पुहूपन में बास,
कस्तूरीका मिरग ज्यों फिर फिर ढुंढे घास.

अशी कबीरांनी वर्णन केल्याप्रमाणे स्थिति होते.

७४. शंख ! समुद्रासारखा बाप, चंद्रासारखा भाऊ, लक्ष्मीसारखी बहीण आणि प्रत्यक्ष द्वारकेचा प्रभू त्याचा मेहुणा ! एवढें असूनहि शंख मात्र दारोदार भिक्षा मागीत फिरत असतो. कर्मभोगाची गोष्ट अशी आहे. म्हणून दुष्टांनी आपलें हित कशांत आहे तें ओळखावें (व त्यानुरूप आचरण करावें.)

संचितानुसार भोग असतात, हा कर्मसिद्धान्त येथे सोदाहरण स्पष्ट केला आहे. कांही संप्रदायांतील लोक शंख वाजवून 'भिक्षांदेहि' करतात; त्या

दुष्ट हें जाणावें आपुलें स्वहित,
तुका म्हणे मात ऐसी आहे.

– ७५ –

निंबाचिया झाडा साकरेचें आळें,
आपलीं तीं फळें न संडी च
तैसें अधमाचें अमंगळ चित्त,
वमन तें हित करुनि सांडी.
परिसाचे अंगीं लाविलें खापर,
पालट अंतर नेघे त्याचें.
तुका म्हणे वेळू चंदनासंगतीं,
काय ते नसती जवळिकें.

---

कल्पनवर हा अभंग रचिला आहे. समुद्रमंथनांतून शंख निघाला म्हणून समुद्र हा त्याचा बाप; त्या मंथनांतून एकूण चौदा रत्नें निघालीं. त्यांत चंद्र व लक्ष्मी यांचा समावेश आहे. म्हणून चंद्र हा शंखाचा भाऊ, आणि लक्ष्मी ही बहीण. एकाच ठिकाणीं जन्म होऊनहि भाग्यानुसार कसें वेगळें जीवन जगावें लागतें हें या दृष्टान्ताच्या आधारें स्पष्ट केलें आहे.

'स्वहित' या ऐवजीं 'सुकृत' असा पाठ आहे. 'मागील जन्मीं आपण काय पाप–पुण्य केलें हें ओळखावें' असा त्याचा अर्थ होईल.

७५. निंबाच्या झाडाला साखरेचें आळें घातलें म्हणून थोडाच तो आपलीं (कडू) फळें सोडून देतो. दुष्टाचें अंतःकरणहि असेंच अमंगळ असतें; हित-कारक गोष्टीना तें दूर सारतें. खापराला परिसाचा जरी स्पर्श झाला तरी तो आपलें स्वरूप बदलवीत नाही ! वेळूचें बन चंदनवनाच्या शेजारी नसतें काय ? (असतें; पण काय उपयोग ! )

'नसती' ऐवजी 'असती' असाहि पाठ आहे. "चंदनवृक्षाच्या संग-तींत वेळू असतात; पण त्याचा काय उपयोग ?" असा अर्थ करतां येईल.

माकडें मुठीं धरिले फुटाणे,
गुंतलें ते नेणें हात तेथें.
काय तो तयाचा लेखावा अन्याय,
हित नेणें काय आपुलें तें.
शुकें नळिकेशीं गोवियले पाय,
विसरोनि जाय पक्ष दोन्ही.
तुका म्हणे एक ऐसे पशुजीव,
न चले उपाव कांही तेथें.

---

७६. कोणीं एका माकडाने मडक्यांत असलेले फुटाणे काढण्यासाठी दोन्ही हात त्यांत घातले. ओंजळ मोठी असल्यामुळे ती मडक्यांतून निघेना; आणि फुटाण्याचा लोभ सुटेना ! आपले हात तेथे गुंतले आहेत हें त्या बापड्या वानरास कळत नव्हतें. बारीक तारेंत घातलेल्या नळीवर एक पोपट बसला. त्यामुळे ती नळी फिरूं लागली. पोपट नळी सोडत नाही. कारण त्याला वाटतें आपण खाली पडूं. आपणांस दोन पंख आहेत, त्यांच्या बळावर आपण उडूं शकतो हें तो विसरूनच जातो ! अशांना आपलें हित कशांत आहे, हें कळतच नाही. हा काय त्यांचा दोष समजावा ? अशा तऱ्हेचे मूर्ख असलेले अनेक पशु जीव आहेत. त्यांच्यासमोर कांही एक उपाय चालत नाही.

माकड फुटाण्याच्या लोभाने हात बाहेर काढत नाही; त्यामुळे त्याला दूर पळतां येत नाही. या मूर्खपणाचा फायदा पारधी घेतो. पोपट आसक्तीमुळे नळी सोडत नाही; व दूर उडून जात नाही. पारधी त्याला सहजासहजीं पकडतो. या पशुपक्ष्यांप्रमाणे या संसारांत अनेक जीव असे आहेत की मूर्खपणा व आसक्ति यामुळे ते एखाद्या क्षुद्र गोष्टीमुळे एखादी फार मोठी हितकारक गोष्ट विसरून जातात. असार अशा संसारापेक्षा कांही एक श्रेष्ठ गोष्ट (परब्रह्म) आहे, याची त्यांना जाणीवच नसते. म्हणून ते संसारांतच पुरेसे मग्न असतात. वास्तविक या पाशांतून सुटण्याचें बळ मनुष्याजवळ आहे, मोहामुळे म्हणा किंवा अज्ञानामुळे म्हणा तो या पाशांतून सुटत नाही. ' अन्योक्तीचें हें एक सुंदर उदाहरण आहे.

— ७७ —

कावळ्याच्या गळां मुक्ताफळमाळा,
तरी काय त्याला भूपण शोभे.
गजालागीं केला कस्तुरीचा लेप,
तिचें तो स्वरूप काय जाणे.
बकापुढे सांगे भावार्थवचन,
वाउगा चि सीण होय त्यासी.
तुका म्हणे तैसे अभाविक जन,
त्यांसी वायां सीण करूं नये.

— ७८ —

गाढव शृंगारिलें कोडें,
कांही केल्या नव्हे घोडें.

---

७७. कावळ्याच्या गळ्यांत मोत्यांची माळ शोभून दिसेल काय ? हत्तीला कस्तुरीचा लेप दिला तर तिचें स्वरूप त्याला थोडेंच कळणार आहे. बगळ्यावर उपदेशाचा थोडासादेखील परिणाम होणार नाही. उलट बोलणारा मात्र थकून जाईल. तद्वत् अभाविक लोकांना भक्तीचा उपदेश करूं नये. त्यासून त्यांना आनंद न होतां दुःखच होतें.

नास्तिकाला कितीहि उपदेश केला तरी तो आपली मूळ वृत्ति सोडत नाही. म्हणून उगाच श्रम करूं नयेत; हा साधा विचार मांडतांनाहि तुकाराम त्या अनुभवास काव्याचें रूप देतात. त्यांची भाषा कठोर असूनहि कोरडी नाही; तिच्यांत काव्यात्मक सौंदर्य आहे.

७८. गाढवाला कितीहि कौतुकाने साजशृंगार केला तरी त्याचें घोडें होऊं शकत नाहीं, व त्याचें ओरडणें राहत नाही. तो तरी आपल्या स्वभावधर्मास

त्याचे भुंकणें न राहे,
स्वभावासी करील काये.
श्वान शिबिके बैसविलें,
भुंकतां न राहे उगलें.
तुका म्हणे स्वभावकर्म,
कांही केल्या न सुटे धर्म.

ग्रंथ संग्रहालय ठाणे 92329

– ७९ –

हीनवर बीजवर दोघी त्या गडणी,
अखंड कहाणी संसाराची.
माझा पति बहु लहानचि आहे,
खेळावया जाय पोरांसवें.

---

काय करील ? कुत्र्याला पालखींत जरी बसविलें तरी तें न भुंकतां, स्वस्थ बसणार नाही. स्वभावधर्म कांही केलें तरी सुटत नाही !

केवळ बहिरंग बदलवून चालत नाही. अंतरंगांत प्रकाश पडला पाहिजे. 'एका बोटाची निशाणी' लावणारे अनेक वैष्णव असतात. पण ते खरे वैष्णव नव्हते. वैष्णवांचा असा खास एक स्वभावधर्म आहे; तो असला तरच 'वैष्णवजन तेने कहीए.'

७९. हीनवर आणि बीजवर अशा दोन मैत्रिणी एकमेकींजवळ आपल्या संसाराची कर्मकथा सांगतात. हीनवर म्हणते, 'माझा नवरा वयाने फारच लहान आहे; तो मुलांच्याबरोबर खेळण्यासाठी जातो.' बीजवर म्हणते, 'बाई, माझें दुःख ऐकशील तर खरें. माझा म्हातारा नवरा रात्रंदिवस सारखा खोकतच असतो.' यावर पहिली म्हणते–'खेळ खेळत संध्याकाळ-पर्यंत तो बाहेरच असतो, आणि रात्रीहि मी शय्येवर त्याची वाट पाहत तळमळत असतें ! माझें मागील जन्माचें पुण्यच चांगलें नाही. मला इतके कष्ट होतात की ते सांगवत नाहीत !' बीजवर म्हणते, 'मी स्पर्श करण्या-

माझें दुःख जरी ऐकशील बाई,
म्हातारा तो बाई खोकतसे.
खेळे सांजवरी बाहेरी तो राहे,
वाट मी वो पाहें सेजेवरी.
पूर्वपुण्य माझें नाही बाई नीट,
बहु होती कष्ट सांगों काई ?
जवळ मी जातें अंगा अंग लावूं,
नेदी जवळ येऊं कांटाळतो.
पूर्वसुकृताचा हाचि बाई ठेवा,
तुका म्हणे देवा काय बोल ?

— ८० —

शहाणियां पुरे एकचि वचन,
विशारती खुण तें चि त्यासी.

---

साठी जवळ जातें, पण तो जवळ येऊंच देत नाही. त्याला ह्या गोष्टींचा कंटाळा येतो.' मागील जन्मांत केलेल्या कर्माचें हें फळ आहे! देवाला उगीच बोल लावण्यांत काय अर्थ ?'

आपण जीं सुखदुःखें भोगतों, ती स्वकर्मानुसार. पण मनुष्यस्वभाव असा आहे की, तो स्वतःच्या कर्माला बोल न लावतां, देवावर उलटतो! 'कोठें कांही कोठे कांही. एक आहे, एक नाही,' अशी जी स्थिति आहे, तीबद्दल देवाला वेठीस धरणें योग्य नाही. 'करणी तशी भरणी' हा कर्मसिद्धान्त तुकारामांनी दोन विरुद्ध दृष्टान्तांच्या साह्याने स्पष्ट केला आहे.

८०. समजदार माणसाला इशाऱ्यादाखल म्हटलेलें एक वाक्यहि पूर्ण अर्थबोध होण्यासाठी पुरेसें ठरतें. संतांचा उपदेश हा सर्वांसाठीच असतो; पण आपल्या मनाने मात्र तो ग्रहण केला पाहिजे. आज जरी दुःख जाणवत नसलें तरी पुढेमागे तें बाहेर येईलच. मग मात्र प्राणांतिक वेदनेमुळे जीव

उपदेश असे बहुतांकारणें,
घेतला तो मनें पाहिजे हा.
फांसावेना तरि दुःख घेतें वाव,
मग होतो जीव कासावीस.
तुका म्हणे नको राग धरूं झोंडा,
नुघडितां पीडा होईल डोळे.

---

कासावीस होतो. तरी तूं वेळेवरच उपाय कर. हे आडदांड नास्तिक माणसा, तूं माझ्या उपदेशाचा राग मानूं नकोस. तूं अजूनहि डोळे उघडले नाहीस तर शेवटीं तुलाच त्रास होईल

परमार्थाच्या बाबतींत बहुतेक लोक चालढकल करतात. ते संसारांत पूर्णतया गुरफटलेले असतात. परमार्थ म्हणजे आयुष्याच्या उत्तर काळची बाब आहे, म्हातारपणीं हरि, हरि म्हणत बसावें; अशी या लोकांची खुळी समजूत. बालपण खेळांत, तरुणपण उपभोगांत आणि म्हातारपण कटकटींत निघून जातें. पण परमार्थाच्या बाबीकडे लक्ष जात नाही. विषयांच्या उप-भोगास वेळींच पायबंद घातला पाहिजे, नाहीतर शेवटीं ते दुःखदायक ठरतात, हें सत्य आहे. पण आम्ही तात्कालिक सुखाकडे लक्ष ठेवून दुःख ओढवून घेतो. ह्यांतून एखादा शहाणा असतो. संतांच्या मार्मिक उपदेशा-मुळे तो वेळींच जागा होतो. बाकीच्यांचे मात्र डोळे उघडत नाहीत ! ह्या अभंगांत, तुकाराम अशा लोकांना पुनः पुनः बजावून सांगण्याचा प्रयत्न करीत आहेत.

'फासावणें' या शब्दाचा अर्थ समजणें, उमजणें असा सरकारी प्रतींतील शब्दकोशांत दिला आहे, ' फांसावेना तरि दुःख घेतें वाव' या चरणाचा दुसराहि अर्थ करतां येतो.

'शरीरावर बेंड आलें असतां, त्याला फासण्या लावतात. त्यावेळेस थोडासा त्रास होतो; पण पुढे मात्र पूर्णपणें आराम पडतो. उलट त्या बेंडास वेळींच जर फासण्या लावल्या नाहीत तर पुढे बेंडांत अत्यंत वेदना होतात. त्यामुळे जीव हैराण होतो' हा अर्थहि सुसंगत असाच आहे.

– ८१ –

सेंदरी हें देवी दैवतें, कोण तीं पुजी भुतेंकेतें,
आपुल्या पोटा जीं रडतें, मागतीं शितें अवदान
आपुले इच्छे आणिका पीडी, काय तें देईल बराडी,
कळों ही आली तयाची जोडी, अल्प रोकडी बुद्धि अधरा-
दासीचा पाहुनर उखतें, धणी देईल आपुल्या हातें,
करुणा भाषण उचितें, हें तों रितें सतंत शक्तिहीन.
काय तें थिल्लरीचें पाणी, ओठ न भिजे न फिटे धणी,
सीण तरी आदीं आवसानीं, क्षोभे पुरश्चरणीं दिलें फळ.

---

८१. एखाद्या शिताची मागणी करणाऱ्या या भुताखेतांची, स्वतःच्या पोटासाठी रडणाऱ्या, शेंदूर फासून देव झालेल्या दैवतांची कोण पूजा करणार ? आपल्या इच्छेकरिता दुसऱ्यांना त्रासविणारीं हीं भिकारचोट दैवतें दुसऱ्यांना काय काम देणार ? त्यांची अल्पबुद्धि, अधीरपणा, व त्यांचें सामर्थ्य आम्हांला कळून चुकलें आहे ! दासीकडून पाहुणचाराची इच्छा असेल तर आधी त्या दासीला धन्याची करुणा भाकावी लागेल आणि मग धनी तिच्या योग्यतेनुसार तिला साहित्य देईल व मग पाहुण्यांना पाहुणचार मिळेल ! त्या दासीप्रमाणे हीं दैवतें नेहमीच रिकामीं असून शक्तिहीन असतात. डबक्यांतील पाणी तें काय ? ओठदेखील भिजत नाही, मग समाधान होणें दूरच. अशा डबक्यांतील पाण्यापासून आधी व शेवटीं त्रासच होणार. गायत्री मंत्राचें अनुष्ठान जर अशा डबक्यांत मांडलें तर त्याचें कांही एक कळणार नाही ! हीं दैवतें शेंदराच्या लेपानें आपलें तोंड बुजवून घेतात; आपल्या अंगावर मोठ्या खोळीचा भार उगीच वाहतात; आणि आपणच शस्त्राघात करून ती खोळ फोडून टाकतात. अशा या दैवतांना देव म्हणणारा लबाड असला पाहिजे. तसा आमचा नारायण नाही. तो जगव्यापक जनार्दन आहे. स्मरण करा म्हणजे इतर दैवतें तुमच्या पायां पडावयास येतील.

तुकारामांच्या काळींहि, आजच्याप्रमाणे, देवदेवस्कीचें तण माजलें होतें. ‘नाना परींचीं दैवतें, बहुत असतां असंख्यातें,’ तुकारामांनी निश्चित

विलेपने बुजविती तोंड, भार खोल वाहाती उदंड,
करविती आपणयां दंड, ऐसियास भांड म्हणे देव तो.
तैसा नव्हे नारायण, जगव्यापक जनार्दन,
तुका म्हणे त्याचें करा चिंतन, वंदूं चरण येती सकळें.

– ८२ –

हरिहरां भेद,
नाही, करूं नये वाद.
एक एकाचे हृदयीं,
गोडी साखरेच्या ठायीं.

---

मार्ग दाखविला. आपल्या पोटासाठी रडणारीं हीं क्षुद्र दैवतें इतरांना काय देणार? तुकारामांनी लोकांची ही खुळचट श्रद्धा दूर करण्याचा प्रयत्न केला, हें या अभंगावरून स्पष्ट दिसतें. नवसादि खुळचट बाबींचा सुळसुळाट पाहून त्यांनी त्यावर टीका केली. देवांच्या नांवावर श्रीखंड–बासुंदीच्या पंक्ति झोडणाऱ्या भोजनभाऊंचीं सालटीं काढली. तुकारामांच्या काव्यांतील ही सामाजिकता फार महत्त्वाची आहे. आत्मोद्धाराबरोबरच जगाचेंहि कल्याण करणें हाच महात्म्यांचा धर्म येथें स्पष्ट जाणवतो.

८२. विष्णु आणि शंकर यांच्यांत कांहीहि भेद नाही. साखरेच्या ठिकाणीं गोडी; आणि गोडीच्या ठिकाणीं साखर असते. तद्वत् शिवाच्या हृदयांत विष्णु आणि विष्णूच्या हृदयांत शिव वास करतो. म्हणून शैवांनो आणि वैष्णवांनो, तुम्ही आपापसांत त्यांच्या श्रेष्ठकनिष्ठपणाबद्दल वाद घालीत बसूं नका. हरि आणि हर यांच्यांत जर भेद पाहण्याची दृष्टि ठेवली तर त्यांच्यांत केवळ एका वेलांटीचीच अडचण आहे. (बाकी सारें सारखें!). ज्याप्रमाणे शरीराचे उजवे आणि डावे अवयव असे बाह्य भेद असले तरी संपूर्ण शरीर एकच असतें, त्याप्रमाणे हरि आणि हर हीं एकाच सच्चिदानंदपर ब्रह्माचीं रूपें आहेत.

भेदकासी नाड,
एक वेलांटीच आड.
उजवें वामांग,
तुका म्हणे एक चि अंग.

– ८३ –

भक्ति तों कठिण शुळावरील पोळी,
निवडे तो बळी विरळा शूर.
जेंथें पाहें तेथें देखीचा पर्वत,
पायाविण भित तांतडीची.

---

तुकारामांच्या या अभंगाचें महत्त्व अनेक दृष्टींनी आहे. त्या काळीं शैव आणि वैष्णव यांच्यांतील झगडा फार विकोपास गेला होता. या संतमंडळींनी, त्या दोघांतील ऐक्य प्रतिपादन करून त्याला आवर घातला. या अभंगावरून तुकारामांचा अभ्यासहि लक्षांत येतो. तुकाराम व्युत्पन्न पंडित नसले तरी बहुश्रुत असून त्यांनी संतवाङमयाचें मन:पूर्वक परिशीलन केलें होतें. याची साक्ष हा अभंग देतो. या अभंगांत एकनाथांच्या तीन निरनिराळ्या अभंगांचा प्रभाव स्पष्ट जाणवतो. (१) हरिहरां भेद, नका करूं अनुवाद (२) गोडीसी साखर, साखरेसी गोडी. (३) एका वेलांटीची आडी । मूर्ख नेणती बापुडीं.

मराठी कवींचा परंपरेने चालत आलेला वारसा तुकारामांनी मोठ्या आत्मीयतेने सांभाळला.

८३. सुळावरील पोळी हस्तगत करणें फार कठीण बाब आहे. भक्तीहि तशीच कठीण आहे. तिचा अंगीकार करणारा बलवान् शूर एखादाच ! जिकडे पाहावें तिकडे दिखाऊपणाचे डोंगरचे डोंगर दिसतात. कांही एक पाया नसतांना तातडीने भित रचणारे पुष्कळ. वास्तविक साहित्याची मेहनत करून पाकसिद्धि केली, तर स्वयंपाकास ओज व रुचि येते आणि पाक करणाराचें कौतुक होतें. मनाला नेहमींच विचाराचा अंकुश हवा. तरच नवीन उजाडणारा दिवस सावधपणाचा जाईल.

कामावलें तरि पाका ओज पडें,
रुचि आणि जोडें श्लाघ्यता हे.
तुका म्हणें मना पाहिजे अंकुश,
नित्य नवा दिस जागृतीचा.

— ८४ —

ओलें मूळ भेदी खडकाचें अंग,
अभ्यासासी सांग कार्यसिद्धि.

साधकाला भक्तीच्या आश्रयाने मुक्तीची वाटचाल करावी लागते. अंतःकरणांतील सर्व शक्तींची एकाग्रता साधण्याकरिता भक्ति हें प्रमुख व प्रापंचिकांना सोयीचें असें साधन आहे. याचा अर्थ ती सोपी असा मात्र नव्हे. " काया वाचा मन ठेविलें तुझ्या पायीं, आतां उरलें कांही न दिसे देवा. " अशी अवस्था प्राप्त करून घेणारासच मुक्तीची दिशा दिसते. ' भक्तिपंथ बहु सोपा ' असें तुकाराम म्हणत असले तरी भक्तिमार्ग हा सुळावरील पोळी हस्तगत करण्याइतका कठीण आहे, हा त्यांचा स्वानुभव आहे. सोपा म्हणण्याचें कारण यांत शारीरिक क्लेश नाहीत किंवा संसार सोडून द्यावा लागत नाही. म्हणून कोणाहि ' येरागबाळचाचें हें काम आहे' असा समज करून घेणें योग्य नाही ! केवळ तुळशीची माळ गळचांत घालून किंवा गोपीचंदनाचा टिळा लावून भक्तीचे पोकळ डोलारे उभे करणारे पुष्कळ असतात. तोंडाने ' राम राम ' म्हणत असलें तरी त्या रामनामोच्चाराच्या मागे विचाराचें आणि आचाराचें सामर्थ्य नसतें. ' भक्ति ते कठीण, इंगळाची खाई ' असें जनाई म्हणाली तें याच अनुभवावर ! त्या भक्तिसंपादनासाठी मनावर सतत लक्ष हवें. तें सतत परमार्थाच्या बाबतींत जागरूक ठेविलें पाहिजे.

८४. ओलें मूळ जसजसें जोरावतें तसतसें तें खडकाच्या अंगाचें छेदन करून खाली जातें. अभ्यासामुळेच कोणतेंहि कार्य पूर्णत्वास जातें. होऊं शकत नाही अशी कठीण गोष्टच या जगांत नाही. जोपर्यंत प्रयत्न नाहीत तोंपर्यंतच एखादी गोष्ट कठीण वाटते. दोराच्या सतत घर्षणामुळे काचणी पडून

नव्हे ऐसें कांही नाही अवघड,
नाहीं कईवाड तोंच वरि.
दोरें चिरा कापे पडिला कांचणी,
अभ्यासें सेवनीं विष पडे.
तुका म्हणे कैचा बैसण्यासी ठाव,
जठरीं बाळा वाव एकाएकीं.

– ८५ –

जोडोनिया धन उत्तम वेव्हारें,
उदास विचारें वेच करी.

---

दगडदेखील कापला जातो. आणि संवयीने विष देखील पचनीं पडतें. आईच्या गर्भाशयांत अर्भकाराहण्यासाठी आवश्यक असलेली जागा एकाएकी तयार होत नाही. दिसामासाने त्या मुलाच्या शरीराबरोबर आईचे गर्भाशयहि हळू हळू वाढत असतें.

संकल्प आणि सिद्धि यांत फार मोठें अंतर आहे असें म्हणतात. पण निश्चित अभ्यास आणि सतत प्रयत्न असल्यास संकल्प व सिद्धि यांतील अंतर सहज कमी होऊं शकतें. ध्येय गाठावयाचें असेल तर प्रयत्नाची पराकाष्ठा केली पाहिजे. संकल्पाची सिद्धि कर्तृत्वाचा डोंगर उभा केल्यावांचून होत नाही. मात्र एखादी गोष्ट अशक्य आहे, हें म्हणणें योग्य नाही. 'असाध्य तें साध्य करितां सायास, कारण अभ्यास तुका म्हणे.' 'म्हणोनि अभ्यासासि काही, सर्वथा दुष्कर,' नाही असें ज्ञानेश्वर म्हणतात. ज्ञानेश्वर म्हणतात, अभ्यासामुळें 'विष कीं आहारीं पडे.' हें आहे अभ्यासाचें माहात्म्य. यासाठी ज्याला जीवनाची बाग फुलवावयाची आहे त्यानें 'यत्न तो देव जाणावा,' हें रामदासाचें वचन लक्षांत ठेवलें पाहिजे.

८५. चोख व्यवहार करून संपादन केलेला पैसाअडका जो मोह न ठेवतां खर्च करतो, तो उत्तम गतीला जाईल. आणि उत्तम अशा (मनुष्य) योनींतच त्याचा जन्म होईल. दुसऱ्यावर उपकार करणारा असून त्याला दुसऱ्याची निंदा करणें माहीत नसतें. परस्त्रिया ह्या त्याला मायबहिणींसारख्या असतात.

उत्तम ची गती तो एक पावेल,
उत्तम भोगील जीव खाणी.
परउपकारी नेणें परनिंदा,
परस्त्रिया सदा बहिणीमाया.
भूतदया गाईपशूचें पाळन,
तान्हेल्या जीवन वनामाजी.
शांतिरूपें नव्हे कोणाचा वाईट,
वाढवी महत्त्व वडिलांचें.
तुका म्हणें हेंचि आश्रमाचें फळ,
परमपद बळ वैराग्याचें.

---

गाई, पशूंचें मोठ्या ममतेने पालन करतो. तृषार्तांसाठी रानावनांत पाण-पोईंची व्यवस्था करतो; अशा तऱ्हेची जीवमात्रावर तो नेहमी दया दाखवितो. तो शांत स्वभावाचा असून कोणाशीं वाईट वागत नाही. अशा रीतीने तो आपल्या वाडवडिलांची कीर्ति वाढवितो. गृहस्थाश्रमाचें खरें फळ याच आचारांतून मिळतें. ब्रह्मपदाच्या प्राप्तीसाठी आवश्यक असलेलें वैराग्याचें बळहि हेंच आहे.

तुकारामांनी केलेल्या उपदेशांत त्यांच्या व्यक्तित्वाचें स्पष्ट प्रतिबिंब पडतें. त्रुटित रचना हा तुकारामांच्या अभंगाचा विशेष नेहमी जाणवतो. ते जणू कांही आपल्याशीं बोलत आहेत या भूमिकेंत शब्दरचना करीत असतात. त्यामुळे पुष्कळदा, कित्येक शब्द ते गाळून टाकतात. त्यामुळे त्यांच्या उपदेशपर अभंगाला एक विशिष्ट धार येते. या अभंगांत प्रपंच करा असें तुकारामांनी स्पष्ट सांगितलें आहे. पण प्रपंच करण्याची पद्धतीहि सांगितली आहे. 'उदास विचारें' (निरिच्छ वृत्तीने) व्यवहार केल्यास तो अंगलट येत नाही ! कारण.

'उदासीनाचा देह ब्रह्मरूप.'

– ८६ –

उदासीनाचा देह ब्रह्मरूप,
नाहीं पुण्यपाप लागत त्या.
अनुताप अंगीं अग्निचिया ज्वाळा,
नाही मृगजळा विझों येत.
दोष ऐशा नांवें देहाचा आदर,
विटलें अंतर अहंभावें.

---

८६. प्रपंचाच्या बाबतींत उदास असणाऱ्या व्यक्तीचा देह ब्रह्मस्वरूपच असतो. त्याला पापपुण्याचा स्पर्श होत नाही. अंगांतून निघणाऱ्या अनुतापाच्या ज्वाळा प्रपंचाच्या मृगजळाने विझवल्या जात नाहीत. अंत:करणाला अहंभावाचा स्पर्श झाला आणि देहाला सर्वस्व मानून त्याचा आदर केला की दोषनिर्मिति झालीच. जोंपर्यंत विषयाबद्दलची असणारी खंती (आसक्तीमुळे निर्माण होणारी तळमळ) नाहीशीं होत नाही, तोंपर्यंतच अंत:करण बद्धावस्थेंत असतें.

निष्काम कर्मयोगाचें संपूर्ण सार या अभंगांत साठविलें आहे. कर्माचा त्याग करणें तर शक्य नाही. म्हणून कर्म हें केलेंच पाहिजे. कर्मच जर करावयाचें तर सत्कर्म (विहित कर्म) करावें. विहित कर्माच्या आचरणामुळे दोन गोष्टी साधतात. कर्म न करण्याचें किंवा निषिद्ध कर्म करण्याचें पाप लागत नाही. विहित कर्म केल्यास पुण्य होईल; आणि खऱ्या साधकाला पापहि नको आणि पुण्यहि नको ! म्हणून विहित कर्म करावें. फलाच्या व कर्तृत्वाच्या बाबतींत उदासीन राहून करावें. म्हणजे त्या कर्मापासून मिळणारें पुण्यहि त्याला मिळत नाही. या संसारांत देहापेक्षा आत्म्याला अधिक महत्त्व आहे. देह हा विनाशी तर आत्मा हा अविनाशी. म्हणून देहाचे चोचले साधकाने पुरवूं नयेत. त्याने शरीरपर होऊं नये. त्याचबरोबर कर्तेपणाचा अभिमान स्वत:कडे घेऊं नये. या प्रापंचिक विषयांपासून अशा रीतीने अलिप्त राहावें.

तुका म्हणे जाय नासोनिया खंती,
तंव चि हें चित्तीं बद्धता ते.

– ८७ –

भोग भोगावरी द्यावा,
संचिताचा करुनी ठेवा,
शांति धरणें जिवासाठीं,
दशा उत्तम गोमटी.
देह लेखावें असार,
सत्य परउपकार.

---

मग परमेश्वर दूर नाही ! किंबहुना तोच परमेश्वर आहे. भगवान् श्रीकृष्णाने स्वत: असेंच म्हटलें आहे की, असा मनुष्य म्हणजे मनुष्य वेषांत असलेलें ब्रह्मच होय.

८७. प्रारब्धानुसार जो भोगशेष आपल्या खातीं जमा आहे, त्याचा उपभोग केवळ भोगासाठीच घ्यावा. (त्या भोगांच्या ठिकाणीं स्वत:स गुरफटून घेऊं नये व आपल्यांत भोगवृत्ति निर्माण होऊं देऊं नये.) जीवात्म्याला सर्वोत्तम दशा मिळवून देण्यासाठी भोगांच्या बाबतींत अशा तऱ्हेची शांत वृत्ति ठेवणें आवश्यक आहे. (जीवभाव नाहीसा करून ब्रह्मस्थितींत शांत अवस्थेंत राहणें हीच सर्वोत्तम दशा होय.) स्वत:च्या शरीराला असार समजावें, इतरांवर उपकार करण्यांत देह खर्चीं घालणें हें सार समजावें. आत्मानंदीं लीन होणें हीच आपली पारंपरिक ठेव आहे असें समजावें. (बाकीच्या देहादि गोष्टी ह्या नवीन आल्या असून त्या जाणाऱ्या आहेत, असें समजावें.)

वासनांचा त्याग केल्यावांचून ईश्वरप्राप्ति अशक्य आहे. म्हणून प्रथम आसक्ति, मोह सोडली पाहिजेत. त्यासाठी भोगांकडे उपभोगदृष्टीने कधीच पाहूं नये. आपल्यावर पडलेली ती एक जबाबदारी आहे, असे गृहीत धरून

तुका म्हणे हे मिरासी,
बुडी द्यावी ब्रह्मरसीं.

– ८८ –

भोवंडिसरिसें,
अवघें भोंवतचि दिसे.
ठायीं राहिल्या निश्चळ,
आहे अचळीं अचळ.
एक हाकेचा कपाटीं,
तेथे आणीक नाद उठी.
अभ्रें धांवे शशी,
तुका म्हणे दुसरें भासी.

---

आचरण करावें. त्यासाठीं मनोवृत्ति शांत (निरासक्त) असाव्या लागतात. तरच खरें सुख प्राप्त होतें.

'जेथ शांतीचा जिव्हाळा नाही,
तेथ सुख विसरोनि नरिघे कहीं'

असेंच ज्ञानदेवांनी प्रतिपादिलें आहे. या शांतीमध्ये जीवनाच्या उत्कर्षाचें सार साठविलें आहे.

८८. अंगाभोवतीं गरगर फिरल्याने भोवळ येते, त्यावेळीं आसपासचीं घरें, वृक्ष फिरत आहेत असें दिसतें. भोवळ थांबल्यावर व आपल्या ठिकाणीं स्थिर राहिल्यावर घरें, वृक्ष हीं स्थिर असल्याचें जाणवतें. डोंगरांत एक हाक दिली असतां, डोंगरदऱ्यांतून तिचे पडसाद उठतात. आकाशांत ढग धावत असतांना चंद्रहि त्यांच्याबरोबर धावत आहे, असें उलटेंच भासतें.

ज्याच्या डोळ्यावर भ्रमाचें पटल आलें आहे, त्याला आत्मवस्तु विपरीत भासत असते. सच्चिदानंद वस्तु विनाशी जड व दुःखरूप वाटते. डोळ्यावर असलेली ही अज्ञानाची झापड दूर करून स्वस्थितीचें ज्ञान जोंपर्यंत होत नाही, तोंपर्यंत निजसुख प्राप्त होत नाही; असा उपदेश तुकारामांनी 'भोवळ,' 'हाक' 'शशी' या दृष्टान्तांच्या द्वारें दिली आहे.

– ८९ –

तीर्थाचिये पंथें चाले तो निदैव,
पाविजेत ठाव अंतराय.
म्हणऊनि भलें निश्चळचि स्थळीं,
मनाचिये मुळीं बैसोनियां.
संकल्पारूढ तें पराधीन जिणें,
कार्य चि कारणें वाढतसे.
तुका म्हणे कामा नाही एक मुख,
जिरवितां सुख होतें पोटीं.

---

८९. तीर्थाच्या आशेने जो रस्ता चालूं लागतो तो दुर्दैवी समजला पाहिजे. कारण त्यामुळे मूळ ठिकाणाकडे (श्रीहरीकडे) जातांना अडथळा निर्माण होतो. म्हणून मन एकाग्र करून एके ठिकाणीं शांतपणें बसलेलें बरें! मन हें संकल्पांवर आरोहित झाल्यामुळे तें परतंत्र आहे. कारणामुळे कार्य वाढतें. (जसजसे संकल्प वाढतात तसतसें मन अधिकाधिक अस्थिर होतें.) इच्छा ही कांही एकमुखी नाही. म्हणून ती आंतल्या आंत जिरविण्यांतच खरें सुख आहे.

संतपण मिळविण्यासाठी तीर्थक्षेत्रांना भेटी देणारे अनेक लोक असतात. ‘ नाहीं संतपण मिळत तें हाटीं, हिंडता कपाटीं रानीं वनीं ’ किंवा ‘ तीर्थी धोंडा पाणी, देव रोकडा सज्जनीं ’ याची त्यांना कल्पना नसते. अशा ठिकाणीं ईश्वराचा साक्षात्कार तर होतच नाहीं; उलट तो दुरावतो. ईश्वर साक्षात्कारासाठी तुकारामांनी उपाय सांगितला आहे.

‘ ठायींच बैसोनि करा एकचित्त, आवडी अनंत आळवावा. एकाग्र मन करणें ही अत्यंत आवश्यक बाब आहे. कारण–‘मनाच्या ठिकाणीं निर्माण होणारे संकल्प–विकल्प मनाला स्थिर होऊं देत नाहीत. त्यासाठी अभ्यास हवा. इच्छेच्या उपभोगाने इच्छा शमत नाही; तर तिचें दमन करण्यांतच खरें शमन असतें.

– ९० –

चाल, केलासी मोकळा,
बोल विठ्ठल वेळोवेळां.
तुज पापचि नाही ऐसें
नाम घेता जवळीं वसे,
पंच पातकाच्या कोडीं,
नामें जळतां न लागे घडी.
केलीं मागें नको राहों,
तुज जमान आम्ही आहों.

---

९०. तूं विठ्ठल, विठ्ठल या नामाचा घोष पुनः पुन: कर म्हणजे तूं मुक्त झालास असें समज, जा. विठ्ठलाचें नांव घेतल्यानंतर तुझ्याजवळ शिल्लक राहील असें पाप नाही. पंचम महापातकांच्या राशी देखील नामाचा उच्चार होतां क्षणींच जळून जातात. (मग बाकीच्या क्षुल्लक पापांची काय कथा ! ) तुझ्याकडून पापें झालीं असतील, होऊं दे. झालें गेलें गंगेला अर्पण. आता तूं मागे राहूं नकोस. (म्हणजे तुझा उद्धार निश्चित होईल.) या गोष्टीला आम्ही जामीन आहों. यापुढें तुला वाटेल तेवढीं पापें कर. त्यांच्या नांवाची यादी कशाला वाढवूं ? (तीं सर्व नामस्मरणानें भस्मसात् होऊन जातील.) विठ्ठलाच्या नांवापुढे काळ देखील प्रवेश करूं शकत नाही. तो जर आलाच तर क्षणार्धांत भस्म होऊन जाईल.

या अभंगांत ' राहों ' ऐवजीं ' पाहों ' आणि ' तुज ' ऐवजीं ' पुढे ' असे पाठभेद आहेत. तो पाठ स्वीकारल्यास चौथा चरण " केलीं मागे नको पाहों, पुढें जमान आम्ही आहों " असा होईल. त्या चरणाचा अर्थ, " मागे पापें केलींस असें म्हणतोस, तीं पाहूं नकोस. तीं निश्चितच नष्ट होतील. पुढच्या पापांच्या संबंधांत आम्ही जबाबदार आहों. " असा होईल व तो अधिक सुसंगत आहे.

करीं तुज जीं करवती,
आगिक नामें घेऊं किती,
तुका म्हणे काळा,
रीग नाही निघती ज्वाला.

– ९१ –

कामिनीस जैसा आवडे भ्रतार,
इच्छीत चकोर चंद्र जैसा,
तैसी हे आवडी विठ्ठलाचें पायीं,
लागलिया नाहीं गर्भवास.
दुष्काळें पीडिल्या आवडे भोजन,
आणिक जीवन तृषाक्रांता.

---

ह्या अभंगाची रचना सामान्यांसाठी आहे. 'पापें करीत जावीं व देवाचें नांव घेत जावें' असा उपदेश यांतून काढतां कामा नये. सामान्य माणसाला कांहीच जमत नाही. त्याला या अभंगांत भरपूर मोकळीक दिली आहे. उद्देश हा की, अशाने तरी हा मार्गावर यावा. या अभंगांत तुकारामांच्या व्यक्तित्वाचें दर्शन मोठें मायाळू आहे. नेहमी परखड वाणी काढणारे तुकाराम यांत सौम्य झालेले दिसतात. संत हे मायमाउली सारखे असतात. कधी रागावून तर कधी चुचकारून ते आपणाकडून योग्य तें करवून घेतात. या अभंगांत नाममहिमा वर्णन केला आहे. 'महादोषांचे गिरिवर, रामनामें नासती' असें रामदासस्वामी म्हणतात तें याच भावनेने.

९१. स्त्रीला आपला पति, चकोराला चंद्र, आवडतो. तद्वत् मनुष्याला विठ्ठलचरणांची आवड निर्माण झाली तर पुन: जन्म घ्यावा लागणार नाही. (त्याला मोक्ष मिळेल.) दुष्काळाने गांजलेल्या मनुष्यास अन्न आवडतें. तहानलेल्यास पाणी आवडतें किंवा कामपीडितास स्त्री ही अत्यंत आवडती असून, तिच्या उपभोगासाठीं त्याला भय किंवा लाज वाटत नाही.

कामातुर जैसा भय लज्जा सांडोनि,
आवडे कामिनी सर्वभावें.
तुका म्हणे तैसी राहिली आवडी,
पांडुरंग थडी पाववील.

– ९२ –

पैल घरीं जाली चोरी,
देहा करी बोंब.
हाबा हाबा करिसी काय,
फिराऊनि नेय्यां वायें.
सोडुनिया शुद्धि,
निजलासी गेली बुद्धी.

---

अशा तऱ्हेची संपूर्ण आवड पांडुरंगाच्या चरणीं निर्माण झाल्यास, त्या मनुष्याला संसारपाशांतून पांडुरंग मुक्त करील.

परमेश्वराबद्दल आतुरता कशी असावी व तिचे काय परिणाम होतात, याचें सुंदर दर्शन दृष्टान्ताच्या आधारें घडतें. तुलसीदासांची गोष्ट प्रसिद्धच आहे. तुलसीदास पूर्व वयांत स्त्री–लोलूप होते. एकदा त्यांची पत्नी थोड्याच दिवसांकरिता माहेरीं गेली असतां, त्यांना करमेनासें झालें. दुसऱ्या रात्रीं, रानावनांतून, खाचखळग्यांतून ते वायकोच्या माहेरीं गेले. ना भय ना लज्जा ! त्यांना पाहून त्यांच्या पत्नीस खेद झाला. ती म्हणाली, 'माझ्यावर जेवढें प्रेम करीत आहां, तेवढेच प्रेम जर प्रभु रामचंद्रावर केलें तर हा संसारसागर तरून जाल.' परिणामीं तुलसीदास हे प्रसिद्ध रामभक्त झाले.

९२. मायेच्या पलीकडे असणारा आत्मस्वरूपभाव हा देहवुद्धीने लपवून ठेवला ! त्यामुळे देहास रडत बसावे लागतें ! तरी तूं शोक करीत वसूं नकोस; फिरून पुन: या नरजन्माची संधि मिळणार नाही; मग तूं वाया जाशील. तूं गैरसावधपणें झोपलास म्हणून तुझें लक्ष राहिलें नाही. (आत्मबुद्धि टाकून दिल्यामुळे 'अहं ब्रह्मऽस्मि' याचा तुला विसर पडला.) काम-

चोरीं तुझा काढला बुर,
वेगळें भावां घातलें दूर.
भलतियासी देसी वाव,
लाहेसि तूं एवढा ठाव.
तुका म्हणे अझुनि तरी,
उरलें तें जतन करी.

– ९३ –

वोणव्या सोंकरीं,
सेत खादलें पांखरीं.

---

क्रोधादि चोरांनी तुझा कोथळा (भूस) बाहेर काढला असून तुला श्रद्धादि भावांपासून दूर केलें आहे. तूं अविवेकादि भलत्या गोष्टींना आपल्या हृदयांत जागा दिल्यामुळे तुला वाईट अवस्था प्राप्त होईल. अजूनहि वेळ गेलेली नाही. जें कांही तुझ्याजवळ उरले असेल तें जपून ठेव.

तुकारामांच्या अभंगांतून त्यांच्या अनुभूतीचा खोल ठसा उमटलेला दिसतो. त्यांच्या अभंगांतून असे अनेक विचारानुभव प्रकट झाले आहेत. एखाद्या विचारानुभवाचें प्रकटन करीत असतांना ते जें रूपक वापरतात तेंहि नावीन्यपूर्ण असतें. 'पैल घरीं जाली चोरी' या साध्या गद्यप्राय रूपकांतून त्यांनी स्पष्ट केलेला आध्यामिक अर्थ मनाला मोहविणारा आहे.

तुकारामांची शब्दरचनाहि असेंच नवें नवें रूप धारण करते. या अभंगांत बोल–भाषेंतील अनेक शब्दांचा चपखल व समर्पक उपयोग तुकारामांनी करून घेतला आहे.

९३. शेताकडे लक्ष न देतां, खाली वाकून जो राखण करतो, त्याचें शेत पाखरें खाऊन टाकतात. झोपेच्या धुंदींत राहून दगा खाऊं नकोस; तर स्वहिताच्या बाबतींत जागरूक राहा. आतापर्यंत कित्येकांनी (विषयरूपी) चोरांच्या संगतीत मार्ग आक्रमण केला; पण त्यांत त्यांचा घात झाला.

...८...

तैसा खाऊं नको दगा,
निदसुरा राहूनि जागा.
चोरासवें घाट,
चालोनि केलें तळपट.
डोळे झांकुनि राती,
कूपीं पडे दिवसा जोती.

---

दिवसाढवळ्या, डोळे झाकून घेऊन रात्र (अंधार) निर्माण करणारा निश्चितच खड्ड्यांत पडतो. वांझ गाय बाळंतणीच्याला दूध किंवा दुधावरील साय कशी बरी मिळेल ? फुटकी सांगड बांधून पोहणारा पुरांतून पैलतीरावर जाऊं शकणार नाही.

निरनिराळ्या उदाहरणांच्या द्वारें तुकारामांनी या अभंगांत परमार्थपर उपदेश केला आहे.

१ वोणव्या सोंकरीं ...खाली वाकून शेताचें रक्षण होत नाही; त्यासाठी नेहमी वरच पाहिलें पाहिजे. या देहाचें सार्थक करावयाचें असेल तर खाली संसाराकडे लक्ष देऊन चालणार नाही, त्यासाठी वर असलेल्या परमात्मस्वरूपाकडेच लक्ष दिलें पाहिजे. संसार किंवा माया ही खाली (अध:)असून परब्रह्म हें वर (ऊर्ध्व) आहे, अशी कल्पना या ठिकाणी मांडलेली आहे. आत्मसुख साधायचें असेल तर गोकुळांतील गौळणींप्रमाणे साधकाची 'ऊर्ध्व लक्ष लागलें कृष्णमूर्ती' अशी अवस्था व्हावयास पाहिजे. सोंकरी म्हणजे जो 'सोऽहंकरी' आहे, असा साधक.

२. चोरासवें वाट......संसाराचा हा मार्ग आपणास विषयांच्या संगतींत चालावा लागतो. म्हणून साधकाने या विषयरूपी चोरांपासून नेहमी सावध राहिलें पाहिजे. चोर जसे वाटसरूचें तळपट करतात, तद्वत् हे पंच विषय साधकाचा सत्यानाश करतात.

३. डोळे झांकुनि...पुष्कळदां आपण अज्ञानामुळें आपल्या हिताच्या गोष्टींकडे दुर्लक्ष करतों, कधी कधी जाणून बुजून दुर्लक्ष करतों. असला

पोसी वांज गाय,
तेथें कैची दुध साय.
फुटकी सांगडी,
तुका म्हणे न पवे थडी.

— ९४ —

उपजला प्राणी न राहे संसारीं,
बैसला शेजारीं काळ उसा.
पाहा तो उंदीर, घेउनि जाय बोका,
तैसा काळ लोका नेत असे.

---

प्रकार आत्मघातकीपणाचा होय. अशाने आपल्या हातानेच आपल्या पायां-वर दगड पाडून घेतों.

४. पोसी वांज गाय......वांझ गाईला कितीहि चारापाणी केलें तरी तिच्यांपासून दुधाची अपेक्षा बाळगूं नये. इंद्रियांना कितीहि सुखोपभोग दिले तरी त्यापासून परमार्थाची किंवा खऱ्या सुखाची अपेक्षा बाळगूं नये.

५. फुटकी सांगडी......आत्मा हा अविनाशी असून शरीर हें विनाशी आहे. तें केव्हा दगा देईल, याचा नेम नाही. म्हणून भवसागरांतून तरून जावयाचें असेल तर या शरीरावर विसंबून राहूं नये. "देह जाणार जाणार, यासी काळोबा खाणार' म्हणून या पंचमहाभूतात्मक शरीराचे चोचले न पुरवितां, आपलें लक्ष आत्म्यावर केंद्रित करावें.

९४. या जगांत प्रत्येक प्राणी जन्माला येतो; तो बरोबर मरण घेऊनच. काळ हा आपल्या डोक्याजवळ बसलेला असतो. (तो केव्हा झडप घालील, हें सांगतां येत नाही.) बोका उंदरास पळवितो, तें पाहा; काळदेखील लोकांना असेंच नकळत नेत असतो. खाटकाच्या घरचा बकरा, आणि कत्तलखान्यां-तील गाय हीं काय वांचूं शकणार आहेत ? त्याचा विचार करा. म्हणून शक्यतों लवकर आपण आपला उद्धार करावा. जाणारी घडी ही पुनः कधी परत येत नाही.

खटिकाचें घरीं अजापुत्र पाहें,
कसाबाची गाय वांचे कैसी
तुका म्हणे कांही करा काढाकाढी,
जाती ऐसी घडी पुन्हा न ये.

– ९५ –

तेलनीशीं रुसला वेडा,
रागें कोरडें खातो भिडा.
आपुलें हित आपण पाही,
संकोच तो न धरी कांही एक.

---

' आपलें आयुष्य भरपूर आहे, परमेश्वराची भक्ति पाहूं पुढे ' असें म्हणणारे पुष्कळच असतात. पण परतंत्र अशा आयुष्यावर अवलंबून राहणें अत्यंत धोक्याचें ! आयुष्याचा हा गोड प्याला काळरूपी बिडाल (मार्जार) केव्हा पिऊन टाकील याचा नेम नाही. म्हणून स्वोद्धाराची गोष्ट उद्यावर ढकलणें योग्य नाही. म्हणून समर्थ रामदास म्हणतात,

' मरणाचें स्मरण असावें. '

९५. आपलें हित कशांत आहे याचा विचार आपणच केला पाहिजे. त्या बाबतींत, लोक काय म्हणतील, याचा संकोच धरूं नये. कोणी एक भिडस्त स्वभावाचा माणूस तेलिणीवर रागवला; व रागाच्या भरांत कोरडीच भाकर खाऊं लागला ! अर्थात् हा त्याचा वेडेपणा होय. एका बाईचा नवरा लोकांना आवडत नव्हता. म्हणून त्या बाईने लोकलाजेसाठीं त्यालाच टाकून दिलें ! केशवपन करून व घराचा त्याग करून ती उगीच संसारांतून उठली ! शेजारणीशीं पटत नाही म्हणून एकीने रागाने स्वतःचें घरच सोडून दिलें ! परिणाम असा झाला की, तिच्यामागें त्या घरांत कुत्र्यांनी वस्ती केली. घरांत पिसवा फार झाल्या म्हणून एका शहाण्या (!) बाईने घरच जाळून टाकलें ! अशा गोष्टींमुळे किती नुकसान होतें, याची

नावडे लोकां टाकिला गोहो,
बोडिलें डोकें, सांडिला मोहो.
शेजारणीच्या गेली रागें,
कुत्र्यांनी घर भरिलें मागें.
पिसारागें भाजिलें घर,
नागविलें तें नेणे फार.
तुका म्हणे वांच्या रागें,
फेडिलें सावलें, देखिलें जगें.

---

त्यांना कल्पना नसते. एकीची तर चांगलीच फजिती झाली. लुगड्यांत उवा झाल्या म्हणून तिने उवांच्या रागेंरागें लुगडेंच फेडून टाकलें ! आणि ती लोकांना उघडीनागडी पाहावयास सापडली ! (उवा मात्र गेल्या नाहीत! )

एखादी कृति करतांना तिच्यामागें कोणत्या प्रेरणा असाव्यांत याचे सुंदर दिग्दर्शन या अभंगांत तुकारामांनी केलें आहे. पहिली गोष्ट म्हणजे ती गोष्ट स्वतःच्या हिताची आहे कीं नाही याचा विचार केला पाहिजे.

आपणास जी गोष्ट करावयाची आहे ती 'कराल तें हित सत्य करा.' दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे लोकमत त्या कृतीच्या आड येतां कामा नये. स्वतःच्या मनाला जें पवित्र, शुद्ध, हितकारक वाटेल तेंच माणसाने सद-सद्विवेकबुद्धि वापरून केलें पाहिजे. स्वतः तुकारामांची भूमिका हीच होती.

' सत्य–असत्यासी मन केलें ग्वाही, मानियलें नाहीं बहुमत. ' दुसऱ्यांच्या सल्ल्याने, किंवा लोक त्रास देतात म्हणून आपली भूमिका सोडणें योग्य नसतें. त्याचा परिणाम स्वतःचें नुकसान होण्यांत होतो; याचीहि स्पष्ट जाणीव तुकारामांनी दिली आहे--

'येथे कोणाचे काय बा गेलें, ज्याचें त्यानेच अनहित केलें.'

या अभंगांतील उदाहरणें कांहीशीं ग्राम्य आहेत; पण त्यामुळे आशय उत्कृष्ट रीत्या मांडला गेला आहे.

' नावडे लोकां ' ऐवजीं ' नाडिलें लोकां ' असाहि पाठ आहे. ' लोकांनी त्रास दिला म्हणून ' असा त्याचा अर्थ करतां येईल.

— ९६ —

भरणी आली मुक्त पेठा,
करा लाटा व्यापार.
उधार घ्या रे उधार घ्या रे,
अवघे या रे जातीचे.
येथें पंक्तिभेद नाही,
मोठें कांही लहान.
तुका म्हणे लाभ घ्यावा,
मुद्दल भावा जतन.

---

९६. पंढरीच्या वाळवंटांत, मुक्तीच्या मालाचा जोरदार बाजार भरला आहे. तुम्ही या पेठेंतून धडाडीने मोठा व्यापार करा. येथून माल उधार घेऊन जा. येथे कोणीहि येऊन हरिनामरूपी माल घेऊन जावा. त्यासाठी लहानमोठे, जातपात यांवर आधारलेला पंक्तिभेद मुळीच नाही. (सर्वांना समान अशी वागणूक मिळते.) या संधीचा अवश्य फायदा घ्यावा. आणि आपलें मुद्दल चांगल्या रीतीने जपून ठेवावें.

पांडुरंगासमोर कोणताहि भेदभाव नाही. शिवाय त्याच्या नामाचा व्यापार करण्यासाठी पदरीं भांडवलाची गरज नाही ! नरदेह हेंच त्याचें मुद्दल. या मुद्दलाचा खरा फायदा करून घ्यावयाचा असेल तर या संधीचा लाभ घ्यावा.

तुकारामांनी पुष्कळदा आपल्या धंद्यांतील प्रतिमांचा उपयोग काव्यात्मक रीतीने केला आहे. 'पेठ, मुद्दल, भाव, उधार' हे त्यांच्या व्यवसायांतील शब्द नवा आशय घेऊन जन्माला आले आहेत. तुकारामांच्या प्रतिमादेखील 'प्रत्यक्ष दिसे जें डोळा' अशा अनुभवावर आधारलेल्या असतात.

– ९७ –

शुद्धाशुद्ध निवडे कैसें,
चर्म मास भिन्न नाही.
कांही आधिक कांहीं उणें,
कवण्या गुणें देवासी.
उदक भिन्न असें काइ,
वाहाळ वावी सरिता नई.
सूर्यतेजें निवडी काय,
रश्मी रसा सकळां खाय.
वर्णी भिन्न दुधां नाहीं,
सकळा गाई सारिखें.
करितां भिन्न नाही माती,
मडक्या गति भिन्न नावें.
वर्ते एकविध अग्नि,
नाही मनीं शुद्धाशुद्ध.

---

९७. सर्व प्राणिमात्रांची त्वचा व मांस यांत जर भेद नाही, तर हा शुद्ध आणि हा अशुद्ध हें ठरवावें तरीं कसें ? देवाच्या ठिकाणीं कोणी अधिक वा कोणी कमी म्हणून भेदभाव नाही. ओढा, विहीर, नदी किंवा नद या सर्वांतील पाणी एकच आहे ना ? सूर्यकिरण निरनिराळ्या रसांचें सेवन करतात. सूर्य आपल्या तेजाने त्यांची निवड करीत बसत नाही. गाईंचे रंग जरी निरनिराळे असले तरी सर्व गाईंच्या दुधाचा रंग सारखाच असतो. हांडा, रांजण, मडकें तयार करीत असतांना माती एकच असते. परंतु प्रकारानुसार त्यांना निरनिराळीं नांवें मिळतात. अग्नि सर्वत्र सारखाच वागतो. त्याच्या मनांत हा शुद्ध आणि हा अशुद्ध असा भेद नसतो. भांडें कसें आहे याची

तुका म्हणे पात्र चाड,
किंवा विषें अमृत गोड.

– ९८ –

वक्त्या आधीं मान, गंध अक्षता पूजन,
श्रोता यति जाला जाण, तरी त्या नाही उचित
शीर सर्वांगा प्रमाण, यथाविधि कर चरण,
धर्माचें पाळण, सकळीं सत्य करावें.
पट्ट पुत्र सांभाळी, पिता त्याची आज्ञा पाळी,
प्रमाण सकळीं, ते मर्यादा करावी,

---

गरज आहे की त्या भांड्यांत विष आहे की अमृत आहे याची गरज आहे ? (अर्थात् आंतील अमृतावर किंवा विषावर पात्राचें महत्त्व अवलंबून आहे.)

परीक्षा करतांना नेहमीं आधी अंतरंग पाहावें. वरकरणी झिलई उपयोगी नाही. बाह्य भेदावरून भिन्न समजणें रास्त नाही.

९८. श्रोता आणि वक्ता यांत श्रोता जरी श्रेष्ठ संन्यासी असला आणि वक्ता जरी गृहस्थ असला तरी त्यावेळीं गंध, अक्षता, हार यांच्या पूजेचा मान हा त्या वक्त्याचाच. श्रोता कितीहि श्रेष्ठ असला तरी त्यावेळीं त्याचा सत्कार करणें योग्य होणार नाही. डोकें हें उत्तमांग आहे; नंतर क्रमाने हात, पाय वगैरे अवयव. म्हणून मस्तकाचा मान आधी, नंतर क्रमाने हात-पायांचा, असा धर्म आहे; व सर्वांनी त्याचें काटेकोरपणें पालन करावें. मुलगा हा बापापेक्षा लहान खरा; पण तो जर गादीवर असेल, अधिकारारूढ असेल तर बापानेहि त्याच्या आज्ञेप्रमाणे वागलें पाहिजे. जें सर्वांना प्रमाण आहे, तीच मर्यादा सर्वांसाठी समजावी. श्रेष्ठ आसनावर असलेल्या देव्हाऱ्यांतील दमडाला सामान्य समजूं नये. बाकीचीं उपकरणें हीं सोन्याचीं जरी असलीं

वरासनीं पाषाण, तो न मानावा सामान्य,
येर उपकरणें, सोमियाचीं परी तीं नीच.
सोनियाचा पैंजण, मुगुटमणि केला हीण,
जयाचें कारण, तया ठायीं अलंकार.
सेवकां स्वामीसाठी मान, त्याचें नाम त्याचें धन,
तुका म्हणे जाण, तुम्ही संत तदर्थी.

– ९९ –

दया तिचें नांव भूतांचें पालन,
अणिक निर्दळण कंटकाचें.

---

तरी या ठिकाणीं तीं हलकीं समजावीं; त्यांचें स्थान त्या दगडाच्या देवापेक्षा खालचें समजावें. पैंजण सोन्याचा झाला म्हणून डोक्यावर ठेवूं नये आणि मुकुट हीन धातूचा असला तरी पायांत घालूं नये; योग्य ठिकाणींच घालावा. ज्या कारणासाठी जी वस्तु असेल तेथेच ती शोभादायक दिसते. अन्य ठिकाणीं ती साजेशी नसते. चाकराला जो मान मिळतो, तो त्याच्या धन्यामुळे. त्याच्या धन्याचें नांव हें त्याला धनासारखें उपयोगी असतें. या सर्व बाबीं-प्रमाणे विष्णुदासहि देवाच्या नांवामुळे मान्यता पावले आहेत.

एखाद्या घटनेस जो अर्थ प्राप्त होतो तो तिच्यामागे असलेल्या संदर्भा-मुळे; ही गोष्ट तुकारामांनी निरनिराळ्या व्यावहारिक दृष्टान्तांनी पटवून दिली आहे. सेवकवर्गाला किंमत असते ती त्याच्या मालकाच्या क्रेडिटमुळे! संतांचें वजन ( credit ) हें त्यांच्या मुखीं असलेल्या परमेश्वराच्या नांवा-वर अवलंबून आहे. संतांना मान आहे तो देवामुळे.

९९. गरीब प्राणिमात्रांचें रक्षण आणि समाजकंटकाचें निर्मूलन हीच खरी दया होय. नीतीचा विचार न करितां एखादा माणूस उन्मत्त होऊन भलतींच

पाप तिचें नांव न विचारितां नीत,
भलतेंचि उन्मत करी सदा.
तुका म्हणे धर्म रक्षावयासाठी,
देवास ही आटी जन्म घेणें.

— १०० —

अन्यायासी राजा जरि न करी दंड,
बहुच ते लंड पीडिती जना,

---

नीच कृत्यें करतो, त्याला खरें पाप म्हणतात. अशा या उन्मत्त पाप्यांचा आणि दुष्टांचा नाश करून धर्माचें रक्षण करण्यासाठी देवाला पुनः पुन्हा अवतार घेण्याचा त्रास घ्यावा लागतो.

या अभंगांत तुकारामांनी 'दया' आणि 'पाप' यांच्या व्याख्या दिल्या आहेत. प्राणिमात्रांचें पालन करणें ही दया आहे. पण ती अपूर्ण. त्याचबरोबर या गरीब प्राणिमात्रांना त्रास देणारे दुष्ट यांचाहि नाश करणें हेंहि दयेचेंच कृत्य आहे. अशा तऱ्हेची दया करण्यासाठी म्हणजेच सज्जनांचा प्रतिपाळ आणि दुष्टांचा नाश करण्यासाठी परमेश्वर पुनः पुन्हा अवतार घेत असतो; असें खुद्द भगवंतानेच गीतेंत स्पष्ट म्हटलें आहे:

परित्राणाय साधूनां विनाशायच दुष्कृताम् ।
धर्मसंस्थापनार्थाय संभवामि युगे युगे ॥

१००. जर राजाने अन्याय करणाऱ्या लोकांना शासन केलें नाहीं, तर ते समाजघातक जनतेला पिळून काढतील. शेतकऱ्याने जमिनीची मशागत न करतां, तण तसेंच राहूं दिलें तर पीक कसें येईल ? त्याचप्रमाणे संतांना वाईट वागणूक देऊं नये हें खरें. पण दुष्टांना शासन करणें आवश्यक आहे. नीतीचा विचार केल्यास तें अनुचित नाही.

न करी निगा कुणबी न काढितां तण.
कैंचे येती कण हातासी ते.
तुका म्हणे संतां करूं नये अनुचित.
पाप नाहीं नीत विचारतां.

---

तुकारामांच्या कांही अभंगांतून उत्तम व्यवहारदर्शन घडतें. तुकाराम केवळ 'संत' नाहीत. समाजसुधारक तुकाराम जेंव्हा आपली वाणी वापरतात तेंव्हां तिला निराळेंच वैशिष्टच प्राप्त होतें. 'दया तिचें नांव भूतांचें पालन आणिक निर्दळण कंटकांचें' हाच सिद्धान्त या अभंगांत स्पष्ट केला आहे.

# परिशिष्ट

| सरकारी प्रतींतील क्रम : | | अभंगानुक्रम |
|---|---|---|
| ८ | आधिल्या भ्रतारें काम नव्हे पुरा | २३ |
| १८ | हासों रुसों आतां वाढवूं आवडी | २४ |
| ४६ | विष्णुमय जग वैष्णवांचा धर्म | ३८ |
| ५० | हिरा ठेवितां ऐरणीं | ४४ |
| ५६ | तेलनीशीं रुसला वेडा | ९५ |
| ६२ | शुद्ध बीजा पोटीं | ४५ |
| ६४ | परिमळ म्हूण चोळूं नये फूल | ३१ |
| ८७ | कानडीनें केला मऱ्हाठा भ्रतार | ४ |
| १२४ | हरिहरां भेद | ८२ |
| १२५ | वक्त्याआधीं मान | ९८ |
| १३२ | माकडें मुठीं धरिले फुटाणें | ७६ |
| १३४ | चाल केलासी मोकळा | ९० |
| २६६ | धर्म रक्षावया साठीं | २९ |
| २६४ | दया तिचें नांव भूतांचें पाळण | ९९ |
| २६० | कन्या सासुऱ्यासि जाये | ११ |
| २९० | चंदनाचे हात पाय ही चंदन | ४६ |
| २९३ | शिकल्या बोलांचे सांगतील वाद | ६२ |
| २९४ | प्रारब्ध क्रियमाण | ५१ |
| ३४४ | सेवितों रस तो वांटितों आणिका | ३२ |
| ३४७ | जे कां रंजले गांजले | ४३ |
| ३६६ | वैष्णव तो जया | ४२ |
| ३६८ | सद्गुरुरायें कृपा मज केली | ६ |
| ३९६ | गाई गोपाळ यमुनेच्या तटीं | ५६ |
| ४०० | कोणी एक भुलली नारी | ५७ |
| ५२० | आम्ही वैकुंठवासी | ३० |

ठाणे. स्थळ
१२९
अनुक्रमांक ... दि: ...
क्रमांक ... दि: ...


| | | |
|---|---|---|
| ५२२ | मृत्युलोकीं आम्हा | |
| ५३३ | कमोदिनी काय जाणे तो परिमळ | ५८. |
| ५५७ | न देखवे डोळां ऐसा हा आकांत | १७ |
| ५६३ | दीप घेऊनियां धुंडिती अंधार | ४०. |
| ६२१ | सेंदरीं हें देवी दैवतें | ८१. |
| ६७६ | काय खावें आतां कोणीकडे जावें | १ |
| ७५८ | जरी मी नव्हतो पतित | १३ |
| ८०७ | वाटुली पाहातां सिणले डोळुले | १२. |
| ९८७ | मऊ मेणाहून आम्ही विष्णुदास | ३७. |
| १०१० | विष्णुमय सर्व वैष्णवांसी ठावें | ३९. |
| १०२२ | नको ब्रह्मज्ञान आत्मस्थिति भाव | २१. |
| ११४८ | बोणव्या सोंकरीं | ९३. |
| १२१४ | साधक जाले कळी | ६७ |
| १३६३ | भोवंडीं सरिसे | ८८ |
| १३७२ | शाहाणिया पुरे एक चि वचन | ८० |
| १४०० | ओलें मूळ भेदी खडकाचें अंग | ८४ |
| १४८२ | आशाबद्ध वक्ता | ६८. |
| १५४१ | भक्ति तों कठिण शुळावरील पोळी | ८३ |
| १५८१ | कनकाच्या परियेळीं उजळूनि आरती | २२. |
| १५८९ | घोटवीन लाळ ब्रह्मज्ञान्या हातीं | ३४ |
| १६२१ | पतिव्रता नेणें आणिकांची स्तुति | ५० |
| १६३५ | भोग भोगावरी द्यावा | ८७ |
| १६३७ | अनुहातीं गुंतला नेणें बाह्य रंग | २६. |
| १७०७ | पैल घरीं जाली चोरी | ९२ |
| १७९६ | गंगाजळ पाहीं पाठीं पोट नाहीं | ४७ |
| १८८८ | तुम्हापाशीं आम्ही येऊनियां काय | १८. |
| १८९८ | नाहीं काष्ठाचा गुमान | ४९ |
| २००६ | माझिये जातीचें मज भेटो कोणी | ५. |
| २१८७ | कस्तुरीचे अंगीं मीनली मृत्तिका | ४८. |

| | | |
|---|---|---|
| २२४२ | तूं कृपाळू माउली | १५ |
| २२४६ | तूं माउलीहून मयाळ | १६ |
| २३०६ | हें चि दान दे मा देवा | ३६ |
| २३५७ | कथा त्रिवेणी संगम | ५५ |
| २४५८ | एका वोटाची निशाणी | ६३ |
| २४८१ | वृक्षवल्ली आम्हा सोयरीं वनचरें | १ |
| २६१३ | उदासीनाचा देह ब्रह्मरूप | ८६ |
| २६६९ | आपुलें मरण पाहिलें म्यां डोळा | २८ |
| २७६५ | तेथें सुखाची वसति | ५४ |
| २८६४ | जोडोनियां धन उत्तम व्यवहारें | ८५ |
| २८७३ | दुडीवरी दुडी | २ |
| २९६७ | जाणोनि नेणतें करी माझें मन | ३ |
| ३०६९ | तरूवर बीजा पोटीं | ५० |
| ३१२८ | नका दंतकथा येथे सांगो कोणी | ६१ |
| ३१३३ | वहु प्रकार गव्हाचे | ६० |
| ३१८९ | तीर्थाचिये पंथें चालें तो निदैव | ८९ |
| ३१९९ | आम्ही पापी तूं पावन | १४ |
| ३२५४ | हरिनाम वेली पावली विस्तारें | ८ |
| ३२६३ | इच्छिती तयांसी व्हावें जी अरूप | २० |
| ३३९६ | आम्हां घरीं धन शब्दाचींच रत्नें | ३३ |
| ३३९७ | ब्रह्मज्ञान दारीं येतें काकुळती | ४१ |
| ३४०० | निंवाचिया झाडा साकरेचें आळें | ७५ |
| ३४१९ | धवळलें जगदाकार | २५ |
| ३४६१ | शुद्धाशुद्ध निवडे कैसें | ९७ |
| ३८१४ | अन्यायासी राजा जरि न करी दंड | १०० |
| ३८१८ | देऊनियां प्रेम मागितलें चित्त | ५२ |
| ३८३१ | कावळयाच्या गळां मुक्ताफळमाळा | ७७ |
| ३८६६ | भगवें तरी श्वान सहज वेष त्याचा | ६४ |
| ३९१८ | बाळेंविण माय क्षणभरि न राहे | १९ |

| | | |
|---|---|---|
| ३९५७ | गाढव शृंगारिलें कोडें | ७८ |
| ४०४२ | आम्हां वैष्णवांचा कुळधर्म कुळींचा | ५३ |
| ४१०१ | तांवियाचें नाणें न चले खऱ्या मोलें | ६५ |
| ४१०५ | अज्ञानाची भक्ति इच्छिती संपत्ती | ६९ |
| ४१२४ | चोरासी चांदणें वेश्येंसी शेजार | ७२ |
| ४१४३ | समुद्र हा पिता बंधु हा चंद्रमा | ७४ |
| ४१४७ | संतांनी सरता केलों तैसेपरी | ७ |
| ४१५९ | स्थिरावली वृत्ति पांगुळला प्राण | २७ |
| ४२१२ | अर्थेविण पाठांतर कासया करावें | ६६ |
| ४२१९ | परिसें गे सूनबाई | ७१ |
| ४३०८ | मृगाचिये अंगीं कस्तुरीचा वास | ७३ |
| ४३४८ | ढाल तरवारें गुंतले हे कर | ७० |
| ४३५१ | उपजला प्राणी न राहे संसारीं | ९४ |
| ४४७१ | आम्ही जातों आपुल्या गांवा | ३५ |
| ४४९५ | हीनवर बीजवर दोघी त्या गडणी | ७९ |
| ४५०० | भरणी आली मुक्त पेठा | ९६ |
| ४५०२ | कामिनीसी जैसा आवडे भ्रतार | ९१ |



मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
REFBK-0012321
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
92329